# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०९/२००५

आज दि. २०/०९/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. १२/०९/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १०) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| १२) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १५) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १६) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १७) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १८) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १९) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २०) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २१) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २२) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २३) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २४) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २५) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २६) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३३) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३४) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३५) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३६) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३७) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३८) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३९) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४१) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४२) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४३) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४४) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४५) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४६) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४७) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४८) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ४९) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५०) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५१) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५२) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५३) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५४) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५५) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५६) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५७) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५९) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६०) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६१) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६२) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६३) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६४) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६५) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |
| ६६) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६७) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ६८) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६९) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७०) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| २) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ४) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| ३) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ६) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |

**मा. महापौर :-**

नमस्कार, मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब, उपस्थित असलेले मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड साहेब, सचिव श्री. हरेश पाटील साहेब, स्थायी समिती सभापती श्री. मोहन पाटील साहेब, सभागृह नेता श्री. लिओ कोलासो साहेब व महिला बालकल्याण समिती सभापती श्रीम. सुरेखा गायकवाड मॅडम तसेच उपस्थित असलेले सर्व पक्षाचे गटनेते, नगरसेवक, नगरसेविका व उपायुक्त. तसेच सर्व पदाधिकारी व पत्रकार बंधु-भगिनिंनो, प्रेक्षक गॅलरीत बसलेले बंधु-भगिनी. आजची ही सभा विषयपत्रिकेवरती दिलेल्या अनेक महत्त्वाच्या विषयावरती चर्चा करण्यासाठी आपण सर्व सन्मा. सदस्यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही सभा पार पाडण्यासाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे. नुकतेच परिवहन सेवेचे उद्‌घाटन झाले आणि आपण जनतेला ही परिवहन सेवा उपलब्ध करुन दिली. या कामी आपण सर्व सन्मा. सदस्य यांनी आपले मोलाचे सहकार्य दिले त्याबद्दल आपले सर्वांचे पुनःश्च धन्यवाद. तसेच नुकतेच पार पडलेले गणेश विसर्जन याही विसर्जन उत्सवात शांततेत आणि समाधानात पार पाडले. या सर्व आपल्या सन्मा. सदस्य, पदाधिकारी व नागरिकांनी फार चांगल्या प्रकारे आपल्याला सहकार्य केले आणि हे विसर्जन शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य केले यासाठी सर्व सन्मा. सदस्य, नागरिक व पदाधिकारी ज्यांना ह्या जबाबदाऱ्या सोपविलेल्या होत्या. त्याही अग्निशमन दल आणि आपले विशेष पदाधिकारी यांनी चांगल्या प्रकारे आपल्याला सहकार्य केले याबद्दल त्यांचे पुन्हा एकदा धन्यवाद. मागेच वेलंकनी मातेच्या उत्साहाच्या कार्यक्रमात चांगल्या प्रकारे याही कार्यक्रमात जनतेने सहकार्य केले आणि हा कार्यक्रम संपन्न झाला. याही बांधवांना आपल्याला धन्यवाद द्यायला हवेत. तरी त्यांनाही धन्यवाद. पुढे नवरात्र उत्सव सुरु होणार आहे. तरी या उत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा आणि आपण या सभेला चांगल्या प्रकारे आपल्याला सभा ही खेळीमेळीच्या वातावरणात चालविण्यासाठी सहकार्य कराल. त्याबद्दल पुनःश्च सर्वांना विनंती व धन्यवाद. प्र. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मला एक अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना एक विनंती आहे की, जोपर्यंत आपल्याला बोलण्याची परवानगी दिली जाणार नाही तोपर्यंत आपण मध्येच उठून बोलण्यास सुरुवात करु नये.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपले म्हणणे बरोबर आहे. आपल्याकडून आम्ही परवानगी मागितली आणि ती आपण दिली नाही तर आम्ही बोलायचे नाही असे नाही. ही लोकशाही आहे, मॅडम.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण बसून घ्यावे. सचिवांनी कामकाजास सुरुवात केल्यानंतर आपणांस बोलण्याची संधी दिली जाईल.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, अजुन सचिवांनी सुरुवात केलेली नाही. परंतु, आपण परिवहन सेवेबद्दल बोलले. त्याबद्दल मला एवढेच सांगायचे आहे की, कार्ड छापले, आपण सुद्धा महिला आहात आणि आम्हीसुद्धा महिला आहेत. परंतु, त्या कार्डवरती महिला बालकल्याण समितीच्या सभापती यांचे नांव छापले नाही हे मला बोलायचे आहे.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दिनांक २०/०९/२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला सभागृहात सभा सुचना क्र. ०७ दि. १२/०९/२००५ रोजीच्या सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे की, प्रश्नोत्तराच्या तासाच्या कामकाजाला सुरुवात होण्यापुर्वी मी अभिनंदनाचा ठराव मांडतो आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, सभागृहाच्या कामकाजाबाबत मी बोलत आहे की, सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, आपण परवानगी मागतांना अभिनंदनाचा ठराव मांडण्यासाठी परवानगी मागितली आहे का? आपण बोलायला सुरुवात करतात आणि अभिनंदनाचा ठराव मांडतात. मा. महापौरांचा अभिनंदनाचा ठराव सभागृहाने करणे ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु, सन्मा. सदस्यांना एवढी घाई झालेली आहे. आपण कामकाजाच्या इतर वेळेत अभिनंदनाचा ठराव मांडू शकता.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मी दिनांक १७/०९/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेतील गणेश विसर्जन घाटावर गणपती विसर्जन हे सुरळीत व शांततेत पार पाडले. त्यात

विशेष म्हणजे जेसल पार्क चौपाटीवरील गणपती विसर्जन हे मुंबईतीलच नाही तर अनेक महानगरपालिकेतील असणाऱ्या सुविधा व व्यवस्थेपेक्षा वेगळी व्यवस्था करुन शांततेत पार पाडले. याबद्दल महापलिकेतील नागरिकांना अभिमान आहे. महापालिकेच्या वतीने समुद्रात केलेली दिवाबत्तीची सोय, धक्क्यावरती केलेली दिवाबत्तीची सोय, धक्क्यावर ठेवलेल्या दहा बोटी, तसेच धक्क्याचे रुंदीकरण व सपाटीकरण, चौपाटीवरील प्रशस्त मोकळी जागा, मंडप डेकोरेटर्स यांनी केलेली व्यवस्था तसेच अग्निशमन दलाने केलेली मेहनत तसेच शंकर नारायण कॉलेज व अभिनव विद्यामंदिर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केलेली सेवा तसेच विविध सामाजिक संस्थांचा उत्स्फुर्त सहभाग यांच्यातर्फे करण्यांत आलेली खाण्याची व पाण्याची सोय, सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सुप्रिम कोर्टाच्या आदेशाचे केलेले पालन तसेच पोलिसांचे जातीने केलेले संरक्षण, डी.आय.जी., एस.पी., डि.वाय.एस.पी. यांची उपस्थिती, त्याचबरोबर महापालिकेतील मा. आयुक्त व सर्व अधिकारी यांची जातीने उपस्थिती, मा. महापौर व त्यांचे पदाधिकारी व नगरसेवक यांची उपस्थिती यामुळे मिरा भाईंदर महापालिकेतील गणेश विसर्जनाचा दैदिप्यमान सोहळा कोणताही कायदा व सुव्यवस्था न बिघडता शांततेत पार पडला. यावेळी चौपाटीवर काही त्रुटी दिसून आल्या. त्या आल्याबाबत प्रशासनाने पुढील गणेश विसर्जन येण्यापुर्वी सुधारणा करावी अशी आशा व्यक्त करुन ही मा. महासभा मा. आयुक्तांचे, मा. महापौरांचे अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडीत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

या ठरावांस अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ४० :-**

दिनांक १७/९/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गणेश विसर्जन घाटावर गणपती विसर्जन सुरळीत व शांततेत पार पाडले. त्यात विशेष म्हणजे जेसल पार्क चौपाटीवरील गणपती विसर्जन हे मुंबईतीलच नाही तर अनेक महानगरपालिका हद्दीत असणाऱ्या सुविधा व व्यवस्थेपेक्षा वेगळी व्यवस्था करुन शांततेत पार पाडले. याबाबत महापलिका हद्दीतील नागरिकांना अभिमान आहे.

महापालिकेच्या वतीने समुद्रात केलेली दिवाबत्तीची सोय, धक्क्यावरती केलेली दिवाबत्तीची सोय, धक्क्यावर ठेवलेल्या १० बोटी, धक्क्याचे रुंदीकरण, चौपाटीची प्रशस्त मोकळी जागा, मंडप डेकोरेटर्स तर्फे करण्यांत आलेली रेलिंग व बॅरेकेट, अग्निशमन दलाची मेहनत, तसेच शंकर नारायण महाविद्यालयातील व अभिनव विद्यामंदिरातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग, विविध सामाजिक संस्थांचा उत्स्फुर्त सहभाग, त्यांच्यातर्फे करण्यांत आलेली खाण्याची व पाण्याची सोय, सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सुप्रिम कोर्टाच्या आदेशाचे केलेले पालन, पोलिसांचे जातीने सहकार्य, डी.आय.जी., एस.पी. व डि.वाय.एस.पी. यांची उपस्थिती, त्याचबरोबर महापालिकेचे आयुक्त व सर्व अधिकारी यांची जातीने उपस्थिती, महापौर तसेच पदाधिकारी व नगरसेवक यांची उपस्थिती यामुळे मिरा भाईंदर महापालिकेतील गणेश विसर्जनाचा दैदिप्यमान सोहळा कोणताही कायदा व सुव्यवस्था न बिघडता शांततेत पार पडला. यावेळी चौपाटीवर काही त्रुटी दिसून आल्या. त्याबाबत प्रशासन पुढील गणेश विसर्जनापुर्वी सुधारणा करेल अशी आशा व्यक्त करुन ही मा. महासभा महापालिका आयुक्तांचे व महापौरांचे अभिनंदन करत आहे असा ठराव आम्ही मांडत आहोत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.** **अनुमोदन :- श्री. मदन सिंह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, एक तुमचे याच्यामध्ये चुकले की, एक त्याच्यामध्ये शब्द टाका. त्याच्यामध्ये मुताऱ्यांना जी नांवे दिलेली आहेत आणि ती महानगरपालिकेच्या मुताऱ्या असून त्यांना तुम्ही तुमची नांवे दिलेली आहेत. त्यांचेसुद्धा अभिनंदन करा. ज्या चौपाटीला महानगरपालिकेच्या मुताऱ्या दिलेल्या आहेत त्या मुताऱ्यांना तुम्ही तुमची नांवे दिलेली आहेत. तरी त्यांचेसुद्धा अभिनंदन करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील साहेब, तुम्ही जशा चौपाटीवरील मुताऱ्या बघितल्या तशाच इतर ठिकाणच्यासुद्धा मुताऱ्या बघा आणि जर दिसत नसतील तर आम्ही तुम्हांला दाखवतो. उगाच काहीतरी बोलू नका.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया, ऐसा पुरे भाईंदर मे कही भी नही है। एक जगह मुतारी के उपर सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील का नाम और दुसरी जगह श्री. मदन उदितनारायण सिंह ऐसे दो जगह है। यह बिल्कुल गलत है। क्योंकि, बांधकाम विभागने खर्च किया हुआ है। यह नगरसेवक निधीसे खर्च किया नही

है। मा. आयुक्त महोदय जिस मुतारी के उपर नाम लिखे उसे फौरन काटे जाये। जिसपर सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील ऐसा नाम लिखा है, उस नाम को फौरन निकाला जाए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण साहब और सन्मा. सदस्य श्री. मिलनजी पाटील यह ज्यादा काम समाज के लिए करते नही। इसलिए इनका नाम ज्यादा नही आता। इसलिए इनको तकलिफ होती है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया, यह क्या इनको नगरसेवक निधी से खर्च किया हुआ मुतारी नही है। लेकिन नगरपालिका द्वारा खरीदी हुई मुतारी के उपर सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील और सन्मा. सदस्या मदन उदितनारायण सिंह का नाम लिखा हुआ है। यह बिल्कुल गलत है। मा. आयुक्त महोदय मेरा निवेदन है की, कृपया उनको फौरन निकाला जाए।

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या सभेमध्ये काय काय लागलेले आहे, ज्या रस्त्याचे नामकरण झालेले नाही त्या रस्त्याचे नामकरण हे यांच्याकडून झालेले आहे. प्रशासनाच्या यादीमध्ये त्याचे नांव नाही. त्याबाबत ते बोलत नाही. कारण त्यांना त्या लोकांची भिती वाटते. भाईंदर स्मशानभूमीमध्ये काय चालले आहे, ते बोलत नाही. कारण भिती वाटते. कारण मुडदे उकरुन काढतील म्हणून.........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसून घ्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाशजी एवढ्या मोठ्या माणासाचे नांव मुताऱ्यावर देऊ नका. सन्मा. सदस्य श्री. रोहिदस पाटील यांचे पाणपोईवरती नांव द्या. मुताऱ्यावर नांव देऊ नका.

**मा. महापौर :-**

प्र. सचिव प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

११ वाजून ४० मिनिटांनी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. प्रश्न क्र. २७, श्रीम. निर्मला बाबुराव सावळे, मा. महापौर यांचा मागील प्रश्न आहे. प्रश्न असा आहे की, मागासवर्गीय दलित वस्ती सुधारणा योजनं अंतर्गत महापालिकेत आगामी अर्थसंकल्पात किती रक्कमेची तरतुद आहे? नसल्यास शासनाकडून तशा प्रकारची मागणी करण्यांत आली आहे का? मागणी केली असल्यास ती कधी केली आहे?

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, हे मागचे प्रश्न मागच्या वेळेला मागे घेतले होते. हे जे प्रश्न क्र. २९ सिरियल आहे ह्या त्याचा अगोदरचे प्रश्न हे मागे घेतले होते. आपण तशी घोषणा केलेली होती आणि जर असतील तर ह्या विषयपटलावर ते आहेत कुठे? पहिले एक काम करा. ते प्रश्न इकडे सर्क्युलेट करा आणि मग चर्चेला सुरुवात करा. प्रश्न क्र. २९ हा सुरु करा. मागच्या वेळेला तुम्ही मागे घेतले असे बोलले. हे सगळे प्रश्न लोकाभिमुख असल्या कारणाने ह्या प्रश्नाचे रितसर ठराव आणि विषय हे विषयपत्रिकेवर येतील असे आपण सन्मा. सदस्य मिलन पाटीलचेसुद्धा प्रश्न होते. ते आपण मागे घेतले अशी तुम्ही घोषणा केली आणि मिटींग संपवलेली आहे. आता प्रश्न क्र. २९ आहे. तो रितसर येऊ द्या. नसेल तर ते तुम्ही करा. अगोदरच्या तुमच्या घोषणेचे काय झाले? मागची प्रोसिडींग काढा आणि नीट वाचा. २०/०९/२००५ च्या अगोदरच्या सर्व प्रोसिडींग नीट वाचा. हे काय चाललेले आहे? मस्करी आहे का? प्रोसिडींग वाचून पुढचे काम करा ना. स्वतः मा. महापौर साहेबांनी ते रुलिंग दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

प्र. सचिवांनी प्रश्न क्र. २९ पासून सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

प्रश्न क्र. २९ सन्मा. सदस्य श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर यांनी विचारलेला प्रश्न आहे.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या प्रश्नाला सुरुवात करण्यापुर्वी मी मा. महापौर साहेबांना विनंती करतो की, माझ्या प्रश्नाला गेल्या तीन वर्षापासून हा प्रश्न माझा प्रलंबित होता. तरी तो आता आलेला असून मार्गी लागलेला आहे. परंतु, मागील महासभा दि. २०/०६/२००५ रोजी माझ्या प्रश्नाचे उत्तर वेगळ्या तऱ्हेने दिलेले आहे. तद्नंतर मा. महासभा दि. १२/०८/२००५ रोजी जे परत उत्तर दिलेले आहे. ते ही वेगळ्या तऱ्हेचे दिलेले आहे. आणि आज जो पुन्हा दि. २०/०९/२००५ रोजी महासभा आहे. त्याच्याही प्रश्नाचे उत्तर वेगळ्या तऱ्हेचे दिलेले आहे. तरी यांच्यात आम्ही कोणते उत्तर नीट समजावे. माझ्या एका प्रश्नाला तीन वेगवेगळी उत्तरे दिलेली आहेत. तरी त्याच्यात सक्षम नेमके उत्तर कुठले समजावे. याचा पहिल्यांदा खुलासा करावा. तीन्ही वेगवेगळी उत्तरे

आहेत. याचा अर्थ आम्ही असा समजावा की, पदाधिकारी आणि अधिकारी जे प्रशासनामध्ये काम करतात ते सक्षम नाहीत का? उत्तर एकच देऊ शकत नाही का? की, वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे निर्णय असतात?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेब, आता जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर आपल्या प्रश्नाचे सुधारित उत्तर आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मग आम्ही तेच उत्तर नक्की समजायचे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर, त्याबाबत आपल्याला प्रशासन खुलासा करेल. आपणांस त्याबाबत काय विचारायचे असेल तर प्रशासन सविस्तर खुलासा करील.

**शशिकांत भोईर :-**

याच्यात माझा पहिला प्रश्न आहे, महापालिकेची स्थायी समिती सभा व महासभा यांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी तसेच निविदा मंजुरीबाबत किती रक्कमेपर्यंत अधिकार आहेत? याबाबत शासनाचे नियम काय आहेत? याबाबत कोणत्या अधिनियमाची तरतुद आहे? तर प्रशासनाने असे उत्तर दिलेले आहे की, मा. स्थायी समिती सभेस रु. ५० लाखापर्यंत व मा. महासभेस रु. ५० लाखावरील प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देण्याचे पूर्ण अधिकार आहेत. तरी या उत्तरावर माझा एक उपप्रश्न आहे की, आपण जे मा. स्थायी समितीला रु. ५० लाखापर्यंतचे अधिकार दिलेले आहेत ते कोणत्या अधिकारामध्ये आहेत व कोणत्या नियमामध्ये आहेत? याचा प्रशासनाने खुलासा करावा. तसेच कायद्यामध्ये कोणती तरतुद आहे तीसुद्धा सांगावी.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, हा प्रश्न सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी काल दिलेला आहे का?

**शशिकांत भोईर :-**

तीन वर्ष अगोदर दिलेला होता.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, आपण मिरा भाईंदरचे प्रशासन चालवतो. एक प्रश्न त्यांनी कधी दिला आहे. त्यांनी जर काल दिलेला असेल तर आपली एवढी धावपळ ठिक आहे. आज किती महिने झाले प्रश्न देऊन. आपण एवढी धावपळ करतोय, त्यांना आपण उत्तर देऊ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्या धावपळीची चिंता सन्मा. सदस्य आपण करु नका. आपण खाली बसा. हे प्रशासन चालवतोय. कायदेशिर दृष्ट्या हे सर्व चालले आहे. प्रशासनाच्या धावपळीचे तुम्हांला पडलेले नाही. हे आपण लक्षात घ्या. आमचे प्रश्न तुम्ही फेटाळलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मी मा. महापौर मॅडमना प्रश्न विचारत आहे. मी तुम्हांला प्रश्न विचारत नाही. आपण खाली बसा.

**प्रकाश दुबोले :-**

आपण मा. महापौरांशी बोला. माझ्याशी बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या पुढाऱ्यांनी तिथे पेपरामध्ये द्यायचे. चांगले प्रशासन चालवायचे असेल तर निंदा कसली पाहिजे?

**प्रकाश दुबोले :-**

सभागृहात कुठे काय बोलायचे ते आपण सांगू नका. आम्हांला अक्कल आहे. आपणला मा. महापौरांनी परवानगी दिल्याशिवाय बोलू नये. तुम्हांला जास्त कळतं असे समजू नका.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांलाही कळत नाही. तुम्ही बसा खाली.

**प्रकाश दुबोले :-**

तुम्ही खाली बसा, मला जे कळतंय ते मी बोलतोय. तुम्ही खाली बसा. मला जो अधिकार आहे, त्या अधिकाराने मी प्रशासनाला प्रश्न विचारलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण खाली बसा.

**प्रकाश दुबोले :-**

मला प्रशासन सांगले, तुम्ही कोण बोलणारे? तुम्हांला कोणी विचारले नाही. तुम्हांला कोण सांगितले नाही. तुम्हांला येथे वकिली करण्याचा प्रश्न येत नाही. आपण खाली बसा. प्रशासनाकडून मला जी माहिती पाहिजे ती मी विचारणार. प्रशासनाकडून मी माहिती घेणार. प्रशासनाकडून माहिती घेण्याचे माझे काम आहे. तुम्ही कोण विचारणार?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोलेजी, आपण बसून घ्या.

**सुधिर नाकाडी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे. त्या संबंधामध्ये स्थायी समितीने, मा. महासभेने आर्थिक व प्रशासकिय अधिकारा संबंधीचे आहे. त्याच्यामध्ये आर्थिक प्रशासकिय मंजुरीचे स्थायी समितीला मा. महासभेने ०५/०५/२००५ च्या ११ आणि १२ या ठरावानुसार ५० लाखापर्यंतचे आर्थिक आणि प्रशासकिय मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

जर हा विषय पन्नास लाखाच्या मंजुरीची जी स्थायी समितीला मंजुरी दिली असा विषय विषयपटलावर घेतला होता का? हा माझा त्याच्यावर प्रश्न आहे.

**सुधिर नाकाडी :-**

विषयपटलावर विषय नवहता. ज्यावेळेला बांधकाम विभागाने, पाणी पुरवठा विभागाशी जे प्रशासकिय आर्थिक मंजुरीचे विषय आले होते. त्या अनुषंगाने मा. महासभेने घेतलेला निर्णय....

**शशिकांत भोईर :-**

असा रितसर विषय आला पाहिजे होता की, ५० लाखाची मंजुरी स्थायी समितीला देण्याचे अधिकार मा. महासभेला देण्याबाबतचा हा विषय यायला पाहिजे होता. तसा विषय न येता डायरेक्ट तुम्ही बांधकाम आणि पाणी पुरवठ्याच्या जेवढ्या निविदा आल्या त्याला मंजुरीच्या अनुषंगाने सर्वानुमते आपण त्या ठरावाला मंजुरी दिलेली आहे, ही चुकीची बाब आहे. विषयपटलावर विषय नसतांना आपण ५० लाखाची मंजुरी मा. महासभेला दिलेली आहे. मा. महासभेने दिली आहे ती योग्य आहे की, अयोग्य आहे ह्याच्यावर आपण उत्तर द्यावे.

**सुधिर नाकाडी :-**

लोकल स्थानिक स्वराज्य संस्थेचे शासन हे पुर्ण महासभेमध्ये विहीत असल्यामुळे महासभेने जर ठराव केला तर महासभा स्थायी समितीला आर्थिक प्रशासकिय अधिकार देऊ शकते.

**शशिकांत भोईर :-**

आपले हे अगदी योग्य उत्तर आहे. असा विषय विषयपटलावर नसतांना आपण असा ठराव करु शकतो का? असे आम्ही कुठेही विषय घेतले आणि ठराव केला तर योग्य आहे का?

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो पन्नास लाखाचा आपल्या सभेमध्ये ठराव झाला होता त्याची तारीख कोणती होती?

**सुधिर नाकाडी :-**

दिनांक ०५/०५/२००५.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

दिनांक ५ मे २००५ रोजी जो ठराव झाला होता. तो ठराव असा झाला होता की, ह्या ५० लाखाची मंजुरी सभागृह देत आहे आणि हा ठराव आपण शासनाकडे पाठवावा असा तो ठराव झाला आहे. तो ठराव आपण पाठवला होता का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त महोदय, आत्ताच पंधरा मिनिटीपूर्वी आपल्या केबिनमध्ये मी हा विषय काढला होता. ज्या गोष्टी पटलावर आलेल्या नाहीत, ठराव आलेला नाही आणि मागचे आयुक्त महोदय ह्यांनी त्याच्यामध्ये स्टेटमेंट दिले की, विधी सल्लागाराशी मी बोलणार. मागच्या सभेत मी आपणाला विचारले, आपणही बोललात की, विधी सल्लागाराचे मला काही माहित नाही. पुढच्या मा. महासभेत मी आपल्याला सांगतो. जर ठराव येत नाही, प्रस्ताव येत नाही आणि महापालिका त्याला प्रस्ताव बनवून इम्प्लिमेंट करते, ही दुर्दैवाची बाब आहे. उद्या स्थायी समितीच्या सदस्यांना आपण कोर्टासमोर हजर कराल का, काही उलटे घडले तर? यापुर्वी अशाच कारणामुळे महापालिका बरखास्त झाली होती.

(प्र. सचिवांनी सदर विषयाबाबत दि. ०५/०५/२००५ रोजीच्या स्थायी समितीमध्ये पारित झालेल्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचा प्रश्न असा होता की, ५० लाखाची मंजुरी मा. महासभा जेव्हा एखाद्या विषयावर देते, तेव्हा तशा प्रकारचा विषय आणण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही आहे का? आत्ता आज बरेचशे विषय आहेत, त्या विषयाला धरुन आम्ही दुसरे ठराव करु का? ते तुम्ही एक्सेप्ट कराला का? विषयपत्रिकेवर पर्टीक्युलर विषय नसतांना वडाची साल पिंपळाला लावलेली आहे, तुम्ही. वडाची साल पिंपळाला लावली, आपल्या गावठी भाषेत बोलायचे झाले तर. प्रशासनाला या गोष्टी माहिती पाहिजे की, ५० लाख रुपयाची तुम्ही मंजुरी देता. दिवसाला ५० लाखाचे काम केले तर तीनशे पासष्ट गुणिले पन्नास बरोबर एकशे ऐशी कोटी रुपये स्थायी समिती एका वर्षभरात खाऊन जाईल, एक एका ठरावावरती. स्थायी समितीचे अस्तित्व निर्माण करुन

महासभेचे अस्तित्व संपवायचे असा आपला विचार आहे का? मग, ह्याच्यापुढे असे म्हणा की, मा. महासभेचे ठराव करण्याचे सगळे अधिकार हे स्थायी समितीला देण्यांत येत आहेत. मग, ही मा. महासभा तरी कशाला बोलवायची? मग मा. महापौरांचा उपयोग काय? मा. आयुक्त साहेबांनी येथे येऊन बसण्याचा उपयोग काय? मग येथे सभागृह नेते व विरोधी पक्ष नेते यांचा उपयोग काय? जर स्थायी समितीला ५० लाखाचे अधिकार देण्याचा जर तुम्ही ठराव करता आणि तो ठराव करायची जर तुम्हांला आवड असली तर तो विषय तुम्ही मा. महासभेपुढे आणायला पाहिजे होता. तो विषय आपण आणला नाही आणि आपण जो ठराव केला आहे, तो पहिल्यांदा चुकीचा आहे असे प्रशासनाने स्पष्ट करावे. बरोबर असेल तर बरोबर असे स्पष्ट करावे. म्हणजे आम्ही तसे प्रोसिडींगला घेऊ. कारण ह्या संदर्भात मुख्य सचिवांकडे मी स्वतः तक्रार केलेली आहे आणि ह्याच्या संबंधात गंभिर दखल आपल्याबाबत घेण्यांत आलेली आहे. ह्याची माहिती आपणांला आगाऊ देतो. प्रत्यक्ष येईल तेव्हा वेगळी.

**लिओ कोलासो (मा. सभागृह नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सभागृहात जे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी ५० लाखाचे अधिकार स्थायी समितीला असावेत ह्याच्याबद्दल सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांच्या प्रश्नामध्ये आपली भुमिका स्पष्ट करतांना योग्य ते तांत्रिक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मला आठवते की, पन्नास लाखांचा ठराव होते वेळी मी त्या दिवशी सभागृहामध्ये नव्हतो, मी त्या दिवशी गैरहजर होतो. पण, तरीही सत्ताधारी पक्षाने बहुमताच्या जोराने हा ठराव पारित केलेला असला तरी ठराव हा बहुमतानेच झालेला आहे. त्यांची व्यथा जी आहे त्याच्याशी आम्हीही सहमत आहोत की, हे कॉन्स्टीट्युशनल आहे, घटनात्मक आहे की, ज्यांच्या त्यांच्या हक्कांच्या मर्यादा निरनिराळ्या कायद्यान्वये निश्चित करुन देण्यांत आलेल्या आहेत. स्थायी समितीने काय करायला पाहिजे? मा. महासभेने काय करायला पाहिजे? महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्यांना आणि अध्यक्षांना किती स्वरुपाचे फायनान्शियल अधिकार आहेत? ह्या सगळ्या गोष्टी खरोखर ठरलेल्या आहेत. हा ठराव जो झालेला आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोलले की, मग आम्हीही ठराव मांडू आणि तो पास करायचा तर तो ठराव पास करतांना ठरावाची एक साधारण पद्धती आहे की, ठराव पास करतांना बहुमत झाले पाहिजे. आपण जर काही ठराव आणता, उदा. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी पहिलाच अभिनंदनाचा ठराव आणला. खरं तर ते विरोध पक्षाच्या बाकावरुन अभिनंदनाचा ठराव मांडत आहेत. जर सत्ताधारी पक्षाने ठरवले असते की, ह्या ठरावाला विरोध करायचा तर विरोध झाला असता. मतदान झाले असते. मतदानामध्ये ठराव फेटाळताही येतो. परंतु, ह्या ठिकाणी एक चिंतेची गोष्ट मला निश्चितच आहे आणि प्रशासनाला मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, तो जो ठराव झाला तो त्यावेळी सभागृहाने केलेला आहे आणि तो ठराव सभागृहाने केलेला असल्यामुळे जर तो कॉन्स्टीट्युशनल असेल तर तो स्विकारला पाहिजे. त्याचे इम्प्लिमेंन्टेशन व्हायला पाहिजे. पण तो जर अनकॉन्स्टीट्युशनल असेल तर जसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी व्यक्त केले की, त्यांनी चिफ सेक्रेटरीकडे याबद्दल तक्रार केलेली आहे. लेट अस वेट फॉर देअर डिसीजन ॲण्ड देअर वर्डीक्ट. ते जे होईल ते आपल्याला सभागृहाला मान्य करावे लागेल. ही सत्ताधारी पक्षाची भुमिका आहे. ती मुद्दामहून आपल्या समोर मांडत आहे.

**रोहिदास शं. पाटील :-**

ह्याच्यावर आयुक्त साहेबांना मला सविस्तर सांगावेसे वाटते की, लिओ कोलासो साहेब त्या दिवशी गैरहजर होते, म्हणून ते असे बोलू शकले. पण सभागृहातील कामकाजाचे त्यांना माहिती नाही, असे नाही. तर ते सभागृह नेते आहेत. एखादा सर्वसामान्य नगरसेवक गैरहजर असतांना अशी पळवाट काढली असती तर ठिक आहे. सभागृहात उद्या होणारे कामकाज आणि झालेल्या कामकाजाविषयी त्यांना आज जाणीव झाली असे जर त्यांचे विधान असेल तर ते साफ खोटे आहे. आम्ही विरोधी पक्षातर्फे सर्व नगरसेवक गेले होते. जे विरोधी पक्षाचे समजतात ते आणि त्यांनी चिफ सेक्रेटरीची भेट घेऊन तिथे आम्ही निवेदन दिलेले आहे. त्याची किंमत फार मोठी मोजायला लागेल. पण ह्यांना हे असे म्हणता येणार नाही. कारण त्यांचा आता हेतू स्पष्ट झाला. राष्ट्रवादीच्या पक्षाचा आता कोणी सदस्य स्थायी समितीचा चेअरमन होणार नाही. कॉंग्रेस आयचे होणार आहे. म्हणून त्यांचे ते अधिकारी बोलले, हरकत नाही. असा त्यांचा तो प्रयत्न आहे.

**लिओ कोलासो (मा. सभागृह नेता सो.) :-**

कृपया असे आण विधान करु नये. राष्ट्रवादीचा स्थायी समितीचा अध्यक्ष का होऊ शकणार नाही. ही लोकशाही आहे.

**रोहिदास शं. पाटील :-**

आमचा प्रश्न असा आहे की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये एक त्रुटी आहे की, आयुक्तांनी त्यावेळी उत्तर दिले होते की, ह्याच्यावर विधी सल्लागारांचे मत घेऊन स्पष्ट उत्तर देण्यांत येईल. आमचा नेहमीच आग्रह असतो की, हा ठराव प्रशासनाचा की, सत्ताधाऱ्यांचा ह्याचा दोन्ही ठिकाणी उलगडा केला जात नाही. सत्ताधाऱ्यांनी आणायचा असेल तर त्यांनी नियमबाह्य आणू शकता. पण प्रशासन कधीही नियमबाह्य आणू शकत नाही आणि प्रशासन मुग गिळून बसतोय. त्याच्यात आमच्या ह्या महापालिकेचे सर्व साडे सात लाख लोकांचे नुकसान होत आहे. ह्यांच्यावर तर आमचा भरोसाच नाही. आमचा भरोसा तुमच्यावर आहे. पण तुम्ही पण जेव्हा मुग गिळून बसता किंवा मंत्रीमंडळाला घेऊन मागे बसून

राहता, त्याचे आम्हांला दुःख होत आहे. ह्याचे तुम्ही स्पष्ट निवेदन करत नाही. आज तुम्हांला ह्या गोष्टीचा फैसला करायला लागेल की, तो ठराव आत्ताच्या आयुक्तांना, त्यांच्या सल्लागारांना, त्या खात्याचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना मान्य आहे किंवा तसाच पेंन्डींग आम्ही ठेवलेला आहे. त्याच्या खाली झालेली कामे, तुम्ही ती नाकारलेली आहेत की, नाकारणार ह्याचा नीट खुलासा करायला लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, मी स्वतः स्थायी समितीला दोन वर्षे काम केलेले आहे. त्यावेळेला प्रत्येक सभेमध्ये आयुक्त साहेबांकडून दहा लाखाच्या आतले प्रस्ताव येत होते. आयुक्त साहेब, आपण ऐकून घ्या. हे खास तुमच्या पोस्टिंगकरिता सांगतोय. या ठरावाशी तुमचा संबंध आहे. हा ठराव जेव्हा झाला, बहुमताच्या जोराने जी मस्ती आलेली असते, ती कुठे ना कुठे उतरवायची कला आमच्याकडे आहे.

**लिओ कोलासो (मा. सभागृह नेता सो.) :-**

बहुमताला मस्तीच्या गोष्टी, कृपया आपण असे बोलू नका. मा. महापौर साहेबा, बहुमताचा आणि मस्तीचा काय संबंध आहे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आपण वक्तव्य करतांना शब्द जपून वापरावेत.

**मिलन म्हात्रे :-**

मी जे बोलतोय ते ऐकून घ्या. बहुमताच्या जोरावर हासुद्धा शब्द मस्तीचाच आहे. हे लक्षात ठेवा. तुम्ही जेव्हा बोलतात, त्यावेळी तुम्ही तुमच्या तोंडाला आवर घाला. आयुक्त साहेब, आपल्याला कायदेशिर दृष्टीकोनातून फक्त दहा लाखाच्या कामाचा अवलोकन करायचा अधिकार आहे. त्याच्यातसुद्धा लिमिटेशन आहे. आम्ही सर्व महानगरपालिकांची, नगरसेवकांची जी जी प्रशिक्षण असतात ती आम्ही अटेंन्ड करत असतो. आमच्याकडे भरपूर कायद्याची आणि नियमांची पुस्तके आहेत, हे आपण लक्षात ठेवा. एक चोरी झाल्यानंतर ती चोरी झाली हे कधी ठरलं, हा माल, ही बाटली किंवा ही वस्तु त्या टेबलावर जेव्हा हस्तांतरीत झाली. मग ती चोरी होती. आम्ही ते सत्ताधाऱ्यांना करु दिले. त्यांनी केलं. त्यांनी बहुमताच्या जोरावर सगळं केले आणि हे करत असतांना अति हुशार आणि महसुलमधले तज्ञ असे आयुक्त, ते गेले म्हणून नाही बोलत आहोत. मी त्यांच्या तोंडावर बोलतो. त्यांचे फक्त दहा लाखाचे पॉवर्स असतांनासुद्धा स्थायी समितीच्या सभापतींना त्यांना दहा लाखाच्या पॉवर्सच्या वरती पन्नास लाखाची पॉवर द्यायची मेहेरबानी केली, हे नियमबाह्य आहे, हे लक्षात ठेवा. तुमच्या प्रशासनाला फक्त दहा लाखाच्या पॉवर्स आहेत, म्हणजे आयुक्तांना दहा लाखाच्या पॉवर आणि सभापतीला पन्नास लाखाच्या पॉवर. ह्या अगोदर आम्ही असतांना दोन अडीच वर्ष हाऊस चालले हे सन्मा. लिओ कोलासो साहेब माझ्या बरोबर सभागृहात होते. तेव्हा दहा लाखाच्या आतली सगळी कामे आयुक्त साहेबांच्या सहीने व्हायची आणि हा नियम आहे. प्रशासनाने, आम्ही सर्व गटनेते, नगरसेवक जवळ जवळ सगळे नगरसेवक आम्ही प्रेमकुमारांना भेटलो. हे म्हणत असतील तसे नाही. त्यांच्यापुढेसुद्धा जर प्रेमकुमार जर सत्ताधाऱ्यांच्या बळावर बळी पडले किंवा काय झाले. आता एक ठरावावर उत्तर आणलेले आहे. त्याच्यावर हायकोर्टात पर्याय आहे. आम्ही ते सगळं करु. त्याला वेळ लागेल. पण आपण हे एक लक्षात घ्या व ह्यामध्ये आम्ही जो तक्रारी अर्ज केलेला आहे त्याच्यामध्ये कॉन्स्टीट्युशनला आम्ही चॅलेंज केले आहे की, असा असा कायदा आहे आणि ठराव असा असा झाला आहे. इतर महानगरपालिकांमध्येही अनेक प्रकरणे निघतात. आपण ठराव केलात, नंतर हळूहळू एक एक कामे निघतील. त्याला आमच्याकडून मंजुरी घ्याल आणि मग जो ठराव मुळ चुकीचा आहे आणि चुकीच्या ठरावावरती खर्च केलेला आहे हे आम्हांला लांच्छनास्पद कुठलेही एलिगेशन नको आहे. कारण त्या ठरावामध्ये तुम्ही नंबर टाकलेला नसतो प्रत्येक कामाला की, ह्या ठरावाच्या नंबरनुसार हे काम मंजुर करण्यांत येते. मी काय म्हणतो ते आपण निट ऐकून घ्या. तुम्ही आज हा एक घाव दोन तुकडा झाला पाहिजे आणि मला एवढे माहिती आहे की, आयुक्तांचे एक काम आहे. तुम्हांला जर कुठला बेकायदेशिर ठराव वाटत असल तर तो तुम्ही लगेच तात्काळ विखंडीत केला पाहिजे हे तुमच्या पॉवर्स आहेत. शासन काय करायचे ते करेल. पण तुम्ही काय करता? प्रशासनामध्ये ह्यांना जे काही वेसन घालायचे आहे. चुक काय बरोबर काय हे सगळं तुम्ही बघायचे आहे, तुमच्याकडे आहे. तुम्ही कलम ४५१ खाली हे केलं का नाही? विखंडीत करायला पाहिजे. कारण आम्हीसुद्धा पुस्तकं वाचतो. सभागृह नेतेसुद्धा पुस्तक वाचत असतील. मेयर मॅडमनीसुद्धा पुस्तकं वाचली पाहिजेत. जर सेक्शनमध्ये तरतुद असेल तर आम्हाला सचिवांनी सेक्शननुसार ठणठणीत सांगा की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कलम १४९ च्या कलमानुसार हे काम आम्ही केले आहे की, उपविधी आहे. ह्या उपविधीत पण कुठे काही दिलेले नाही. सचिवांनी शेवटच्या चार ओळी वाचल्या. वरचे काहीच वाचले नाही. सेक्शननुसार सांगा विषय संपवा. अन्यथा ठराव रद्द केला आहे असे डिक्लरेशन द्या. कारण

तुमच्यापेक्षा आर्थिक पन्नास लाखाच्या पॉवर तिथे आहेत. म्हणजे तुम्हांला काय काम राहिले नाही. जसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोलले की, मा. महासभेला काम ठेवले नाही. तर साहेब, तुम्हांलाही काही काम ठेवलेले नाही. म्हणजे आपण सगळे सयाजीराव राहणार आहेत, फक्त. ह्या सगळ्याचा नीट शांत डोक्याने विचार करा आणि आम्हांला ह्याच्यावर डिसीजन द्या. म्हणजे डिसीजन मेयर साहेबांनी द्यायचे आहे आणि आपण ओपिनियन द्यायचे आहे. म्हणजे तुमचे अधिकार दहा लाखाचे असल्याने तुम्हांला आता यापुढे काही काम राहिलेले नाही आणि ते सगळे सभापती साहेबांनीच करायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत, त्या अनुषंगाने सन्मा. सभागृहामध्ये मी खुलासा करु इच्छितो की, दि. ०५/०५/०५ च्या सभेमध्ये जो सभागृहाने निर्णय घेऊन स्थायी समितीला ५० लक्ष रुपयापर्यंतचे आर्थिक आणि प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याबाबत विभागामार्फत त्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करावी किंवा कसे, याबाबत जेव्हा अहवाल सादर केला गेला त्यावर तत्कालिन आयुक्त ह्यांनी दि. २६/०५/०५ रोजी त्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करावी अशा प्रकारे विभागाला निर्देशित केलेले आहे, हे मी आपल्या सभागृहाच्या लक्षात आणू इच्छितो.

**मिलन म्हात्रे :-**

कुठल्या सेक्शननुसार? आयुक्त बोलतात, म्हणजे त्यांनी नियम दिला पाहिजे. त्याच्यानंतर बरीच कामे पास झाली आहेत.

**मा. आयुक्त :-**

हा जो ठराव झालेला आहे, दि. ०५/०५/०५ च्या सभेमध्ये त्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्याबद्दल विभागीय अहवाल जो आलेला आहे, त्या अहवालाला मान्यता दिली असल्यामुळे आणि त्याप्रमाणे मा. तत्कालीन आयुक्त ह्यांनी कार्यवाही करण्यास आदेश दिले असल्यामुळे आत्तापर्यंत दहा ते बारा कामे अशी आहेत की, त्याला प्रशासकीय आणि आर्थिक मंजुरी देण्यांत आलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त महाशय, ही एवढी दुर्दैवाची बाब आहे की,.....

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. सदरचा प्रश्न कन्टीन्युमध्ये पुढच्या वेळी घेण्यांत येईल.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, प्रश्न चालू असतांना प्रशासनाने आमचा वेळ घेतला त्याचे काय? तुम्ही त्याबद्दल वेळ वाढवून द्या.

**जयंत पाटील :-**

महापौर मॅडम, खरं म्हणजे हा प्रश्न राहिलेला नाही. हा एक धोरणात्मक निर्णय आहे किंवा यासंबंधी तरतुद काय आहे, यासंबंधी ही चर्चा व्हायला पाहिजे. हा प्रश्न आता महत्त्वाचा नाही, हे आपण लक्षात घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण वेळ जरी संपवत असाल तरी दोन मिनिटांचे फक्त निवेदन करतो की, प्रश्न परत पुढच्या सभेत घ्या.

**जयंत पाटील :-**

सभागृह नेत्यांनी आपल्याला सांगितले की, चिफ सेक्रेटरीचा जो निर्णय येईल, त्याप्रमाणे आपण काय निर्णय येईल त्याच्यावर विचार करु या असे त्यांचे म्हणणे असावे. मला वाटते, चिफ सेक्रेटरी ह्यांच्या निर्णयाची जर आपल्याला वाट बघायची असेल तर मग आपल्याकडे असलेले अधिकारी ह्यांना काय नियमाचे ज्ञान नाही आहे का? ह्यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे वाचन केले नाही का? दुसऱ्या कुठल्या महापालिकेमध्ये ५० लाखाची तरतुद आहे का? आपण त्यासंबंधी माहिती घेतली आहे का? स्थायी समितीचे अधिकार ५० लाखापर्यंत दुसऱ्या कुठल्या महापालिकेला दिले आहेत का? की, फक्त आम्हाला वाटले म्हणून आम्ही येथे ठराव आणला आणि विभागीय चौकशी, विभागीय तुम्हांला जी माहिती दिली, ती कोणी दिली? विभागीय म्हणजे कोण? की, जे महापालिकेने केलेल्या ठरावावर आणि आयुक्तांना ते माहिती देतात, म्हणजे आयुक्तांपेक्षा मोठे असलेले विभागीय अधिकारी कोण आहेत? ते तरी आम्हांला कळू द्या. हा विषय प्रश्नोत्तराचा म्हणून आपण समजू नका. कदाचित, पुन्हा ठराव सुद्धा असा होऊ शकेल, येऊ शकेल. परंतु, यासंबंधी कुठल्या तऱ्हेची तरतुद, ५० लाखापर्यंत स्थायी समितीला अधिकार द्यावेत अशा तऱ्हेचे नियम कुठे आहेत? आपण हे प्रश्नोत्तराच्या उत्तरामध्येच दिले आहे की, अशा तऱ्हेचा कुठलाही नियम नाही. नियम आहे ना, मुंबई प्रांतिक अधिनियमामध्ये स्पष्ट लिहिलेले आहे की, दहा लाखाच्या वर तरतुद नाही. तुम्ही जरी आता लेटेस्ट आवृत्ती जरी पाहिली, त्याच्यातही ५० लाख केलेले नाही. त्याच्यामध्ये १० लाखाची तरतुद आहे. असे असतांना आपण ५० लाखापर्यंत अधिकार दिले, चुकीने जर दिले असतील, मघाशी तिकडे सांगितले ते तुम्ही नाकारुन टाका. नियमाच्या बाहेर आपल्याला जाता येणार नाही. नियमाच्या बाहेर

आपल्याला जायचेच नाही. आपल्याला जे नियम गव्हर्नमेंटने बनवून दिलेले आहेत, त्या नियमाप्रमाणेच जायचे आहे. ह्यासंबंधी अतिशय चौकसपणे विचार होऊन सभागृहाला आपण माहिती द्यावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

यासंबंधी महत्त्वाची बाब अशी की, मा. महापौर मॅडम, मागच्या आयुक्तांनी असे निवेदन केले होते की, विधी विभागाकडून सल्ला घेऊन मग ५० लाखाची कामे देता येतात की नाही असे आम्ही मत घेऊ. या ठिकाणी आपण जो अहवाल सांगितला, त्याच्यात विधी विभागाचे काही मत नाही. दुसरा प्रश्न, आता आपण विधी विभागाचे सल्लागारही ठेवले नाही. त्यांचा चांगला सत्कार करुन पाठवले. प्रश्न असा आहे की, ५० लाखाच्या मंजुऱ्या दिल्यानंतर आपण ७-८ कामे काढलेली आहेत. सभागृह नेते एकदम सोयीचे राजकारण करतात. ह्या सभागृहात ते उपस्थित नव्हते. ह्या विषयावर इतके पोटतिडीकीने बोलले की, प्रेमकुमार ह्यांनी ठरावावर निर्णय घ्यावा. जेव्हा ३७(१) च्या आरक्षणाच्या ठरावावर राज्य शासनाने फटकारे मारले. तसेच, दुसरे महत्त्वाचे असे की, दि. ०५/०५/०५ पासून आपल्याला बोलायला देतोय कारण तुम्हीच बोलताय, बरं आहे. कारण, आमच्या प्रश्नावर तरी तुम्हांला जागरुकता येते. एरवी सभागृह नेत्याला काही कामच नसते. आमच्या निमित्ताने तुम्हांला काम मिळाले, पुढेही मिळो. पण ५० लाखाची कामे अशी देता येत नाही. आयुक्त साहेब, प्रश्न स्पष्ट आहे की, नियम ७२(३)(क) व ७३(क) बघा. आपण त्याची तरतुद स्पष्टपणे वाचावी. ७३(क) त्यात दहा लाखाहून अधिक किंवा राज्य शासनाच्या मंजुरीने महापालिका विहित करील अशा त्याहून अधिक असणाऱ्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल अशी कोणती संविधा स्थायी समितीने आधी मान्यता दिल्याशिवाय आयुक्तांनी अशी मान्यता देऊ नये. तुम्ही सांगता की, तो ठराव केला. सचिव सांगतात की, तो ठराव शासनाकडे पाठवलाच नाही. मग तुम्हांला असे वाटले नाही की, कायद्यामध्ये अशी तरतुद आहे की, शासनाची पूर्व परवानगी घ्यावी आणि मग अशा ठरावाला मान्यता द्यावी. म्हणजे मागच्या आयुक्तांनी काय केले आहे की, कायद्यामध्ये तरतुद असूनसुद्धा तो ठराव शासनाकडे पाठवला नाही. राज्य शासनाकडे पाठवल्यानंतर तुम्ही पन्नास लाखाच्या तरतुदीला मान्यता दिली असती तर आत्तापर्यंत घेतलेले निर्णय योग्य होते. मा. महापौर मॅडम, जेव्हा एखाद्या विषयावरती ठराव करण्यासाठी विषय विषयपटलावर आणले जातात. परंतु, मागे झालेला ठराव हा चुकीचा आहे आणि त्या ठरावात दुरुस्ती होत नाही किंवा त्याच्यावर शासनाचा निर्णय होत नाही, तोपर्यंत त्याची अंमलबजावणी झाली. चार कोटीची कामे काढली गेली. ह्या चार कोटीच्या कामांना मंजुरी ज्याने दिली ते प्राधिकारी जबाबदार आहेत का? सभागृह नेते त्याला जबाबदार आहेत का? मग त्यावेळी सभागृह हे जबाबदार राहणार आहेत आणि म्हणून अशा सगळ्या कामांना आपण ताबडतोब स्थगिती द्या. कारण ते आपले अधिकार आहेत. कारण हे मा. महासभेचे अधिकार वापरण्याचे अधिकार आयुक्त साहेबांनासुद्धा नाही. ह्या ठिकाणी सगळ्या कायद्याच्या तरतुदीचा आपआपल्या सोयीनुसार वापर केला जात आहे. मा. महापौर मॅडम, एक अतिशय सिरियस बाब आपल्याला सांगतो की, गेल्या तीन वर्षामध्ये सत्ताधारी पक्ष बहुसंख्येच्या जोरावर, बहुमताच्या जोरावर ठराव मंजुर करतात. ते सन्मान पुरक ठराव होतात. परंतु, कायद्यात नसलेल्या बाबींबाबत कार्यवाही करतांना प्रशासनसुद्धा त्यांच्या एक पाऊल पुढे आहे. ते जे बेकायदेशिर करत असतील, हे टोटल प्रशासन बेकायदेशिर करतात. ह्या ठिकाणी आयुक्त साहेबांना १० लाखाची मंजुरी आहे असे म्हटले आहे. पण कुठल्या मंजुऱ्या ओत, ज्याची आर्थिक प्रशासकिय मंजुरी मिळालेली आहे. एक रुपयापासून ते करोडो रुपयाच्या अनंत कोटी रुपयाच्या खर्चाला मंजुरी ही फक्त मा. महासभा देऊ शकते. स्थायी समिती देऊ शकत नाही. असे कुठल्याही कायद्यामध्ये नाही. आपण सेक्शन ७२ बघा, ७२(ब). सेक्शन ७२ मध्ये कुठल्याही कामांना मंजुरी देतांना आर्थिक प्रशासकिय मंजुरी घेणे फार आवश्यक आहे. त्याच्यानंतर आयुक्तांचे अधिकार चालू होतात. आयुक्तांचे अधिकार हे ७३ मध्ये विहित केलेले आहेत. ७३ची कार्यवाही कधी पुर्ण होते, जेव्हा ७२ ची होईल तेव्हा. ७२ मध्ये कुठल्याही कामांना आर्थिक प्रशासकिय मंजुरी घेतल्यशिवाय आयुक्तसुद्धा दहा लाखाची कामे काढू शकत नाही. हा चुकीचा अर्थ ह्या ठिकाणी विधी विभाग आण लेखा विभाग काढत आहे. आपण कलम ७२ पुन्हा वाचा. ७२(ब), ७२(अ) पहिल्यांदा वाचतो. ज्या सरकारी वर्षात अशा अधिकारांचा वापर केला असेल, असे कर्तव्य पार पाडले असेल त्या वर्षात असा खर्च जिथपर्यंत करायचा तितपत त्या खर्चासाठी चालू अर्थसंकल्पीय अनुदानात अशा खर्चाची तरतुद केली असली पाहिजे. कुठलीही कामे जर तुम्हांला काढायची असतील तर त्याला बजेट प्रोव्हिजन पाहिजे. त्याच्यानंतर कलम ७२(ब) मध्ये अशा अधिकारांचा वापर केल्यामुळे किंवा असे कर्तव्य पार पाडल्यामुळे असे सरकारी वर्ष संपल्यानंतर कोणत्याही कालावधीसाठी किंवा कोणत्याही वेळी खर्च करावा लागणार असेल असा खर्च असेल किंवा खर्च होण्याचा संभव असेल, अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापुर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेतली पाहिजे. पोटकलम (२) मध्ये, ८६ पोटकलम (२) आणि ३५५(२) ह्यामध्ये जो काही खर्च करायचा असेल, उदा. पगाराच्या बाबी आहेत. ठेकेदारांचे परतावे आहेत. त्याच्यासाठी मा. महासभेची मंजुरी घेण्याची गरज नाही. परंतु, इतर सगळ्या खर्चाच्या किंवा निविदांच्या बाबतीत आर्थिक प्रशासकिय मंजुरी ही महापालिकेची घ्यावी लागते. दहा लाखाची निविदा काढतांनासुद्धा आयुक्तांना ही कार्यवाही पुर्ण करुन घ्यावी लागेल. मा. महासभेने १ ते १०० अशा दहा लाखापासून ते करोडो रुपयापर्यंतच्या आर्थिक प्रशासकिय मंजुरी दिल्यानंतर १ ते १०० मधली जी कामे असतील, जी त्यांना प्राधान्याने करावीशी वाटतात, आयुक्तांना, पण ती १० लाखाच्या खाली असतील तिच कामे आयुक्त स्वतःच्या अधिकारात काढू

शकतात. अशी कामे काढल्यानंतर त्यांनी १५ दिवसाच्या आत स्थायी समितीला कळविले पाहिजे. स्थायी समिती महापालिकेने मा. महासभेने दिलेल्या आर्थिक प्रशासकिय मंजुरीतील बाबींना स्थायी समितीपुढे मंजुरी देतांना त्याची लिस्ट करील आणि अशा लिस्टमध्ये जर एखादी बाब नमुद केली असेल आणि आयुक्तांच्या ते लक्षात आले की, १ ते १०० नंबरची कामे आहेत. त्याच्यामध्ये....

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, प्रश्नोत्तर का काल खत्म हो गया है। यह आपने डिक्लेअर किया उसके बाद भी इतना समय देने का क्या मतलब, प्रश्नोत्तर का समय खत्म हो गया। ऐसे मॅडम आपने रुलिंग दी है ना, तो रुलिंग का क्या मतलब हुआ? मॅडम मुझे दो मिनिट बोलने का मौका दिजिए।

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाणला खाली बसायला सांगा. नंतर आम्ही बसतो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, मुझे दो मिनिट बोलनेका मौका दिया जाए। मॅडम, यह आपके रुलिंग के बाहर बात कर रहे है।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण ह्यांना बसायला विनंती करा.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण पहिल्यांदा त्यांना बसायला सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अशी जी कामे स्थायी समितीने मंजुर केलेली आहेत अशी १ ते १० क्रमांकाच्या कामामधील कामे जर आयुक्तांना माहिती आहे की, ह्या १० कामापैकी कुठलेही ९ क्रमांकाचे काम मला घ्यायचे आहे, तर ते पंधरा दिवस असे झाल्यानंतर ते स्वतः घेऊ शकतात आणि त्याची माहिती स्थायी समितीला देऊ शकतात. या ठिकाणी सगळ्या गोष्टी चुकीच्या चालल्या आहेत. आयुक्त दहा लाखाचे अधिकार वापरत आहेत. त्यांना आर्थिक प्रशासकिय मंजुरी मा. महासभेची मिळालेलीच नाही आणि ते काम काढतात आणि अवलोकनार्थ स्थायी समितीकडे पाठवतात. स्थायीमध्ये कोण आहे हे आम्हांला माहिती नाही. पण ते कशा प्रकारचे लोक आहेत की, त्यांना कायद्याचेसुद्धा ज्ञान नसावे. पण प्रशासनाने मात्र या बाबी लक्षात आणल्या पाहिजे. आयुक्त साहेब, आपली संपुर्ण कारकिर्द एक चांगले मुख्याधिकारी म्हणून गेल्यानंतर आपणांला प्रशासनाने प्रमोट केलेले आहे. आपल्याला शासनाने प्रमोट करुन जेव्हा असे सक्षम समजले की, मिरा भाईंदर महानगरपालिकेसारख्या अशा विचित्र काम करणाऱ्या सत्ताधाऱ्यांबरोबर आम्हांला काम करायचे आहे. मग कायद्याच्या अडचणीत आपण न येता, आपण कायदेशिर कामामधूनच जाल अशी माझी तरी अपेक्षा आहे. कारण शासनाने आपला सन्मान केलेला आहे, या ठिकाणी आयुक्त म्हणून आणि कदाचित, आपल्या कारकिर्दीचे सेवेचा किती काळ आहे, मला पुर्ण माहिती नाही. आम्ही काय तुम्हांला सेवेच्या अगोदर रिटायर करायला पाहत नाही. पण आपली सेवा ह्याच महापालिकेमध्ये चांगल्या प्रकारे संपुर्ण सफल होऊ दे आणि त्याची यशस्वी कारकिर्द झाली पाहिजे. मला या ठिकाणी एकच म्हणावेसे वाटते की, आज आम्ही ठराव घेऊ शकत नाही. पण मा. महापौरांनी अशा प्रकारचे अधिकार जर स्थायी समितीला दिले तर आपण स्वतःचे अस्तित्त्व घालवून बसतात, ह्या सभागृहाचे अस्तित्व घावलून बसतात आणि मग येथे सभागृहामध्ये कुठली मिटींग घेण्याची गरज नाही. किमान कायद्यात जरी तरतुद असली तरी ती तरतुद कसली आहे? एका कामाला मंजुरी देतांना महापालिकेने ५० लाखापर्यंत शिफारस करायची. त्याची पुन्हा शासनाकडून मंजुरी आणायची. मग स्थायी समिती त्याच्यावर निविदा काढू शकते. असा कुठलाही प्रकार झाला नाही आणि आठ कामे काढली. चार कोटीच्या कामांना आपण महापौर मॅडम, आपल्य अधिकारात स्थगिती द्यावी आणि रितसर त्याची परवानगी आपल्याकडे मागावी अशी निती करतो. आमचा प्रश्न 'अ' पुरता संपलेला आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, मुझे यहाँ पर बोलनेका मौका दिया जाए। आप सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी ने जो प्रश्न किया है, वह तीन महिने पुराना ठराव है। ठराव मे स्पष्ट उत्तर है की, ५० लाखावरील प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यास पुर्ण अधिकार आहे. यह सारा अधिकार है मा. महासभाको। उसके बावजुद तीन महिने हो गए है। आपको जहाँ भी जाना था, सेक्रेटरी लेव्हल तक, कोर्ट के लेव्हल तक आप जाईए, आप सक्षम है। आपने कहा की, मस्ती निकालने की, आपके ही सदस्य ने कहा, आप कितनी मस्ती निकालेंगे? तीन साल तो हो गए, कितनी मस्ती निकालेंगे?

**प्रफुल्ल पाटील :-**

आमच्या प्रश्नावर आपण ह्यांना बोलायला देता का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मस्ती निकालनेकी बात की है। उसकी मस्ती निकलते निकलते कोर्ट मे एक दिन अंदर चले गये। यह क्या मस्ती निकालेंगे। यह मा. महासभेका डिसीजन है। घर का डिसीजन नही है और उसका जवाब दिया हुआ है। वह मस्ती क्या निकालेंगे?

**मिलन म्हात्रे :-**

महासभा तुम्हारे घर की नही है। इसमे कानून है। हम मस्ती निकाल के दिखायेंगे, हम चॅलेंज देते है। मस्ती निकाली है, वह अभी तक कम नही हुई क्या? आपकी इच्छा है तो और भी करके दिखायेंगे। हम हमारी जान पे मस्ती निकालते है। किसी के बल पे कुदते नही।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

तीन साल मे नही कर पाये तो अभी क्या करोगे? यह मा. महासभा का अधिकार है और उन्होने लिखित उत्तर दिया है।

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय. सदर प्रश्नासंदर्भात महासभेमध्ये बरीचशी चर्चा झालेली आहे. नियमबाह्य ठराव करुन महापालिकेचा हा वेळ वाया घालवलेला आहे. मा. आयुक्तांना नम्र विनंती आहे, या ठरावानुसार जे जे टेंडर्स गेलेले आहेत ती सगळी टेंडर्स स्थगित करावी.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडम, प्रश्नोत्तनराचा तास संपलेला आहे. आपण पुढच्या विषयाला सुरुवात करा.

**रतन पाटील :-**

विरोधी पक्ष नेते, मी दोन मिनिटे बोलतोय.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. पुन्हा प्रश्न रिपीट करु नका.

**रतन पाटील :-**

आपण बोलू नका. विरोधी पक्ष नेते, मी बोलतोय मला फक्त माझे मत मांडायचे आहे. काय, कशा पद्धतीने गैर काम चालते किंवा कशा पद्धतीने गैर ठराव चालतात ह्याची माहिती मी सदस्यांसमोर देत आहे. स्थायी समितीमध्ये अवलोकनार्थ जे ठराव पाठविले जातात, माझ्या स्थायी समितीमध्ये दोनच सभा झालेल्या आहेत. मा. आयुक्त साहेब ह्यांच्याकडून अवलोकनार्थ आलेले ठराव त्याच्यावर चर्चा होतच नाही. सरळ आपले धोपट बंद करतात आणि पळतात सभापती. चर्चा करत नाही. अवलोकनार्थसाठी विषय आल्यावर त्याच्यावर चर्चा करायची नाही, तर का? त्याच्यावर सुचना घ्यायच्या नसतात का? असे कुठल्या नियमात आहे का? मग ते अवलोकनार्थ आमच्याकडे कशाला पाठवतात? तुमच्याकडेच ठेवा. तुम्हीच पाठवून द्या ना, करुन टाका. आमच्याकडे पाठवण्याची गरज नाही. का पाठवता आमच्याकडे? जर ह्याच्यावर चर्चा करायची नसेल तर पाठवू नका. सगळे अधिकार त्यांना द्या आणि आणखीन कहर म्हणजे मागच्या अडीच वर्षापुर्वी सन्मा. पंतप्रधान अटलजी वाजपेयी ह्यांचा येथे दौरा होता. त्यांच्या पक्षाची चिंतन बैठक होती, केशवसृष्टीमध्ये. काय कहर बघा साहेब, मग तो विषय चालू असता मध्येच एक ठराव घुसवला जातो. अटल बिहारी वाजपेयी त्यावेळेला आलेले होते. त्यावेळेला ज्या दोन्ही रस्त्याला दोन्ही बाजुला ब्रॅकेटींग सर्वेक्षणासाठी बांबू वगैरे लावून केले होते, केशव सृष्टीमध्ये मंडप उभारले होते, त्यांच्या सन्मानासाठी त्याचे बिल महापालिकेने द्यावे. त्याला आर्थिक मंजुरी द्यावी म्हणून असा एक ठराव मधल्यामध्ये स्थायी समितीमध्ये काल घुसवण्यांत गेला. मा. स्थायी समिती दि. ३१/०८/२००५ च्या सभेत तर त्याचे बिल आहे ४१ लाख ४० हजार ८८ रुपये. हे बिल आहे आणि माझ्याकडे सगळे ठराव आहेत. हे पैसे कोणी द्यायचे आहेत. मंत्रालय गृह विभाग ह्यांनी हे पैसे द्यायचे असतांनासुद्धा आपल्या स्थायी समितीला एवढी घाई, आपल्या अधिकाऱ्यांना एवढी घाई की, महापालिकेच्या त्या स्थायी समितीमध्ये त्याची मंजुरी घेतात आणि ह्या मिरा भाईंदरमधल्या सामान्य करदाता नागरिकांच्या निधीतून जो पैसा उपलब्ध होतो त्याच्यावर डल्ला मारण्याचा सारासार विचार स्थायी समितीमध्ये होता. सर्व सन्मा. सदस्यांनी त्याला विरोध केलेला आहे. कोणीही त्याला पास केलेले नाही. पण अशा पद्धतीने जर ठराव आणायचे असेल तर ह्या महापालिकेचे काय? मा. आयुक्त साहेब, आपण संदर्भात हे बिल परत आपल्याकडे यायची शक्यता आहे. आपण पास करु नये आणि मिरा भाईंदरच्या सामान्य नागरिकांना विश्वासात घ्या. त्यांना तुमचा सल्ला द्या. जय महाराष्ट्र!

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. सचिवजी पुढील विषय घेण्यांत यावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर, ह्या विषयावर बोलण्याकरिता मला तुमची परमिशन पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त महाशय, आता अधिकाऱ्यांनी आपल्याला मागच्या आयुक्तांचे आदेश दाखवले. मी मागच्या सभेपासून बोलतोय. हा आदेश आयुक्तांनी किती तारखेला दिला हे आपण मला सांगा.

**मा. आयुक्त :-**

दि. २६/०५/२००५.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि त्यानंतर सभा झाली ही आपल्याला माहित नाही. म्हणजे प्रशासनाला प्रशासन सांगत नाही, तर आम्ही काय अपेक्षा करायची ह्या प्रशासनाकडून? आपण ह्याची दखल घ्यावी.

**प्र. सचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांची एक लक्षवेधी आलेली आहे.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौरांचे लक्ष वेधतो. ही मा. महासभा आहे आणि ही सभा चालू असते त्यावेळी आपण सन्मा. सर्व नगरसेवकांना सचिवांच्या तर्फे पत्र देऊन बोलावून घेता. सभेचे कामकाज हे काही फावल्या वेळेत होत नाही. हे नियमानुसार होत आहे आणि या ठिकाणी आपण रुलिंग देता. या शहराचा अति महत्त्वाचा प्रश्न म्हणून आपण ज्यावेळी २६, २७ जुलै रोजी पुर आला व त्याच्यानंतर जी रोगराई आली व रोगराई आल्यानंतर त्याच्यात जे मृत्युमुखी पडले. त्यांना वैद्यकिय मदत द्यावी. मृत्युमुखी पडले त्यांना, त्यांच्या कुटूंबियांना अर्थसहाय्य द्यावे असे पोटतिडकीने आम्ही विषय मांडला. तुम्ही त्याच्यावर रुलिंग दिले नाही. रुलिंग देते वेळी सांगितले की, गटाची बैठक करुन आपण त्याच्यावर रुलिंग देणार. २६ तारखेच्या बैठकीनंतर आज किती दिवस झाले?

**मा. महापौर :-**

गटनेत्यांची बैठक दुसऱ्याच दिवशी बोलावण्यांत आली होती. त्या दिवशी कुठलाही गटनेता हजर नव्हता. सभेमध्येच सांगितले होते की, उद्या २.०० वाजता गटनेत्यांची मिटींग आहे. तर आपण त्या दिवशी यायला पाहिजे होते. मा. महासभेमध्येच सुचना दिली होती.

**रोहिदास शं. पाटील :-**

आम्हांला तुम्ही बोलावले नाही. आपण वेगवेगळ्या कामासाठी मला अनेक वेळा फोन करता. पण ह्या विषयाची बैठक आहे म्हणून आपण फोनही केला नाही आणि ह्या बैठकीला तुम्ही आला नाहीत असेही सांगितले नाही. मी तुम्हांला स्वतः येऊन भेटलो तेव्हा आपण सांगितले नाही की, मी आपल्याला सांगितलेले आहे. पण त्याचा कोणत्याही अधिकाऱ्याना अजुन खुलासा केला नाही. जो खुलासा केला असेल तो आता जाहिर करा ना की, मयताच्या कुटूंबियांना एक लाख रुपये देणार. वैद्यकिय मदत म्हणून पन्नास हजार रुपये देणार असे जाहिर करा. जे नियमात आहे ते जाहिर करायला काय आहे आणि कोणाला विरोध करायचा आहे तो करु द्या. काय ठरले आहे की, ठरलेच नाही हे तरी जाहिर कराल की नाही? मॅडम, आपल्याबद्दल आम्हांला आदर आहे हे मी आपणांला सांगतो. पण तुम्हांला कोणीतरी गुमराह करतोय आणि लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबतीत तुमची गैरसमज केली जाते. तुम्हांला ह्याच्यामध्ये चुकीचे मार्गदर्शन केले जाते. हे निर्णय तुमचे आहे. या शहराची शान आहे, महापालिकेची शान आहे. अन्य महापालिकांनी सगळ्या लोकांना वैद्यकिय मदत दिली, मृतांना, त्यांच्या नातेवाईकांना मदत केली. आपली महापालिका मदत का करु शकत नाही? जर बजेटमध्ये नसेल, कायद्यात नसेल, ते करु शकत नाही. आर्थिक स्थिती नाही, तसे निवेदन करा.

**मा. महापौर :-**

ह्या विषयावर सभा संपल्यानंतर गटनेते एकत्र बसून या विषयावर चर्चा करु आणि आजच निर्णय घेऊ.

**रोहिदास शं. पाटील :-**

नाही. आम्ही सभेचे पुढचे काम चालू देणार नाही, अशी आमची तुम्हांला विनंती आहे. ह्या सभेत, ह्याच क्षणी त्याचा निर्णय लागला पाहिजे. त्याचा निर्णय आत्ताच लागला पाहिजे. हे इतके मस्करीचे विषय नाहीत. ही चावडी नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांनी आता जे वक्तव्य केले हे संबंध सभागृहाला दिशाभूल करण्यासारखे आहे. फक्त त्यांच्या एकट्यांचाच विरोध होता. भारतीय जनता पार्टीचे पंतप्रधान असो किंवा कोणत्या पक्षाचे, पण ते देशाचे पंतप्रधान आहेत. ह्या देशाचे पंतप्रधान असल्या कारणाने ते आपल्या गावात आल्यानंतर आपल्या गावाची शान वाढलेली आहे. आज संबंध विश्वामध्ये त्यांचा मॅसेज गेलेला आहे आणि एवढे मोठे पंतप्रधान आपल्या शहरात आल्यानंतर त्यांचे संरक्षण करणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. गृहमंत्रालय जेव्हा करेल तेव्हा करेल. परंतु, ते आद्य कर्तव्य महानगरपालिकेचे होते. म्हणून त्या तातडीच्या विषयावर मा. महापौर मॅडम ह्यांनी आदेश दिले की, हे काम करुन घ्यायचे आणि त्यांच्या संरक्षणाकरिता म्हणून त्याचे देयक जे होते ते साहेब आज दोन वर्षे तुंबले होते. म्हणून ते स्थायी समितीने सर्वानुमते पास केले. फक्त सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांचा एकट्याचा विरोध होता.

**गजानन भोईर :-**

आम्हीही त्यावेळी विरोध केला होता. आपण खोटं बोलू नका. आम्ही विरोध केला होता की, पंतप्रधान येऊन दोन वर्षे होऊन गेली आणि आपण हा विषय आत्ता का आणता?

**कैलासबेन जानी :-**

हम लोगोंने विरोध किया था।

**मिलन म्हात्रे :-**

महानगरपालिकेने घर खाते खोलले आहे का?

**मिलन पाटील :-**

आम्ही सांगितले सर्वानुमते.

**मिलन म्हात्रे :-**

त्या केशवसृष्टीच्या खाजगी जागेमध्ये आपण कशाला खर्च करायचा?

**मिलन पाटील :-**

आम्ही बहुमताने तो ठराव पास केलेला आहे. पण हे असे दिशाभूल करणारे......

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य दुपारनंतर ह्याच्यावर निर्णय जाहिर करणार आहे. आपण बसून घ्या.

**रोहिदास शं. पाटील :-**

ही सभा म्हणजे पान सुपारीची सभा नाही. ही मा. महासभा आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आम्हांला ह्या गोष्टी लक्षात आहेत. आपण निदर्शनात आणून द्यायची गरज नाही. आपण बसून घ्या.

**रोहिदास शं. पाटील :-**

तुम्ही जर निर्णय घेऊ शकत नसाल तर सांगा की, मी हतबल आहे. मी या सभागृहात निर्णय घेऊ शकत नाही.

**मा. महापौर :-**

आम्ही निर्णय घेऊ शकतो. आपण बसून घ्या.

**रोहिदास शं. पाटील :-**

नाही. आम्ही सगळं तुमच्या सांगण्यानुसार केले.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, मरने के बाद दवा दे दिजीए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

आत्ताच निर्णय पाहिजे.

**रोहिदास शं. पाटील :-**

तुम्हांला ह्या सभेतच सांगायला पाहिजे. तुम्ही त्यांच्याशी कन्सल्ट करा.

**मा. महापौर :-**

दुपारनंतर उत्तर देते.

**रोहिदास शं. पाटील :-**

आत्ताच सांगा, नंतर कशासाठी?

**मदन उदितनारायण सिंह :-**

दोन महिने झाले आहेत.

**रोहिदास शं. पाटील :-**

तुम्हांला सभा चालवायची नाही का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

हा निर्णय दिल्याशिवाय ही सभा चालणार नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, जो विषय चालू है, उस विषय पर बात करने के लिए रुलिंग दिजीए।

**रोहिदास शं. पाटील :-**

नियमानुसार जी रक्कम असेल ती रक्कम आपण जाहिर करा. मा. महापौर, आपण सभागृहाचा वेळ घालवू नका. आमची तुम्हांला नम्र विनंती आहे की, लेप्टोस्पायरासेसचे रुग्ण जे मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या नातेवाईकांना जे द्यायचे आहे ते जाहिर करा. वैद्यकिय मदतही आपण जाहिर करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपला सन्मान आम्ही करतो. जेवणानंतर आपल्याला ह्या विषयाचे डिक्लरेशन दिले जाईल.

**रोहिदास शं. पाटील :-**

कशासाठी?

**मा. महापौर :-**

हा विषयपटलावर विषय नाही. तरीसुद्धा आम्ही विषय घ्यायला तयार आहोत.

**रोहिदास शं. पाटील :-**

विषयपटलाचा संबंध येत नाही.

**मा. महापौर :-**

जेवणानंतर ह्या विषयावर रुलिंग देणार आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मॅडम, हा अत्यावश्यक विषय आहे. हा विषय विषयपटलावर आणण्याची गरज काय आहे?

**रोहिदास शं. पाटील :-**

आपण चर्चा केलेली आहे आणि तुम्ही निर्णय दिलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ही ह्या शहराची गरज आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, यह विषय अत्यंत गरज का विषय है। इस पर आपको ऐसा बोलने की जरुरत नही है।

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौर मॅडम, आपणच सांगितले होते की, पुढच्या सभेला जाहिर करु. आपण आधीच जाहिर करायला पाहिजे होते ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

त्यानंतर दोन सभा झाल्या तरी अजून काहीच केलेले नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ह्याच सभेमध्ये निर्णय जाहिर करणार आहोत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आत्ताच करा ना. त्यात काय अहे.

**मा. महापौर :-**

एक दोन तासामध्ये लगेच फरक पडणार आहे का?

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौर मॅडम, आपण लगेच निर्णय होता गटनेत्यांची सभा घेऊन नक्की करुन सांगणार होते. ते तुम्ही आत्ता सांगायला पाहिजे.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी आपल्याकडे जो प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि तो अत्यावश्यक आहे. परंतु, मा. महापौर साहेबांनी आपल्याला जो निर्णय देण्याचे कबुल केलेले आहे, तो निर्णय जेवणानंतर देण्याचे कबुल केलेले आहे. परंतु, आपल्याला अशी एक विनंती करण्यांत येत आहे की, ज्या विभागामध्ये लोकांचे वस्तु, अन्नधान्य गेले, त्याच्यावर अजुन कलेक्टर साहेबांनी निर्णय दिलेला नाही. इथे आपले पालकमंत्री साहेब येऊन गेले. आठ दिवसाच्या आत आम्ही निर्णय करुन देतो आणि त्यांना जे काही मानधन देणार आहोत ते आम्ही देणार आहोत. असे असतांना, आत्ता आम्ही फोन केलेला, सभेमधूनच त्यांना माझा आत्ता फोन गेलेला आहे आणि असे जे मृत्युमूखी पडले आहेत त्यांनासुद्धा आपण, डॉक्टर बावस्कर ह्यांनासुद्धा आम्ही सांगितले होते की, फोन करुन सांगितले होते. त्यांच्याकडे सुद्धा आम्ही लोक पाठवले आणि त्याच आशयाचा विषय सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी मांडलेला आहे. त्याबाबत सभा बोलवा असे आपण गेल्या सभेत सांगितले होते. मला वाटतं, आपण मलासुद्धा फोन केलेला नाही. तर अशा प्रश्नांना आपण जर उत्तर देतांना जे सगळे नगरसेवक आहेत त्यांच्या सगळ्यांच्या वॉर्डामध्ये नुकसान झालेले आहे. वॉर्डाचे लोक येतात तर त्यांनासुद्धा उत्तर द्यावे लागते. त्याच पद्धतीने प्रशासन हे आपले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका ह्याच्यामध्ये जबाबदार आहे आणि ती जबाबदारी पार पडतानासुद्धा आपण कलेक्टरांशी संपर्क साधून ह्या प्रश्नाचे उत्तर जेवणानंतर देतांना आता माझी तलाठींबरोबर चर्चा झाली. कारण तलाठीकडे कलेक्टरने पैसे पाठवले आहेत. पन्नास लाख रुपये त्यांच्याकडे आले होते आणि तेसुद्धा कलेक्टरने आत्ता परत मागवून घेतले. म्हणजे प्रत्येक वॉर्डच्या लोकांनासुद्धा, वैती साहेबांना विचारा आत्तासुद्धा किती लोक आलेली आहेत. मग त्यांना आम्ही तोंड काय द्यायचे? ते प्रशासनाने, आयुक्त साहेबांनी ह्याच्यावरती कलेक्टर साहेबांकडे निर्णय घेऊन, जो रोहिदास पाटील ह्यांनी आता जो विषय काढलेला आहे की, जे काही मृत्यूमुखी झालेले आहेत त्यांनासुद्धा जे काही अनुदान द्यायचे आहे तेसुद्धा मिळाले नाही. हे कितपत चांगले आहे आणि कधी मिळणार आहे? त्यासाठी आपण दुपारच्या नंतर जेवणानंतर ह्याचे उत्तर द्याल आणि त्यांना कधी मिळेल हेसुद्धा त्यांना आश्वासन द्या. आपल्या वतीने, आयुक्त साहेबांच्या वतीने आपण कलेक्टर साहेबांकडे फॅक्स पाठवून द्या की, आपण पुरग्रस्तांना जो निधी देणार आहात की, नाही देणार आहात, त्याचे

उत्तर मागवून घ्या. ते देत असतील तर ठिक आहे. कारण लोकांना आपण आश्वासन देऊ आणि देत नसेल तर त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देऊन सांगा की, कलेक्टर साहेबांनी आम्हांला निवेदन केले आहे की, कोणालाही अनुदान मिळणार नाही. पुरग्रस्तांना काही मदत मिळणार नाही असे अपण डिक्लेअर करुन दुपारी त्यांना उत्तर द्यावे अशी आपणांस ही नम्र विनंती आहे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, मा. महापौर मॅडम आपल्याला जेवणानंतर उत्तर देतीलच. ती रक्कम डिक्लेअर झाली आहे की, नाही ह्याची घोषणा करण्यांत यावी.

**रोहिदास शं. पाटील :-**

या गोष्टीशी कलेक्टर साहेबांचा संबंध नाही. हे महापालिकेचे, सभागृहाचे अधिकार आहेत, आयुक्तांचे आणि महापौरांचे आहे. आमच्या मते तर त्यांनी हे सभागृहात आणण्याचे कारण नव्हते. त्यांनी आधीच गटनेत्यांची बैठक घेऊन दुसऱ्या दिवशीच जाहिर करायला पाहिजे होते. पण त्याला आज दिड महिना होत आहे तरी निर्णय होत नाही. हे योग्य नाही.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आपण मागच्या सभेत एक चांगला विषय घेतला होता आणि मृतांना काय मदत देता येईल, जे आजारी होते त्यांना कशा प्रकारे मदत करता येईल या विषयात आपण गटनेत्यांची एक सभा बोलावणार होतो. या संदर्भात सर्व चर्चा झालेली आहे. परंतु, पुनःश्च एकदा आपल्याला काही लेप्टोस्पायरसचे रुग्ण होते त्यांना ही आर्थिक मदत करायची होती. तरी या विषयाची प्रत्येक पक्षाच्या गटनेत्यांशी चर्चा होईल. आपल्याकडे सगळी तयारी आहे. परंतु, एकदा चर्चा झाली म्हणजे जे जे आजारी होते त्यांनाही मदत करायची आहे. मृतांनाही मदत घोषित करायची आहे. आपण दुपारच्या सदनात ती घोषित करु शकतो.

**रोहिदास शं. पाटील :-**

घोषित करा. हवे असल्यास ही सभा थांबवा. चर्चा करायची असेल तर चर्चा करु. महापालिकेच्या क्षमतेनुसार तुम्ही मृत्तांच्या नातेवाईकांना द्या, वैद्यकिय मदत द्या. जी क्षमता तुम्हांला मान्य असेल ती.

**शिवप्रकाश भुदेका :-**

दोन महिने झाले, तुम्हांला करायचे होते, करणार होते ते आत्ता जाऊ दे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम आणि मा. उपमहापौर साहेब, सर्वात जास्त आपल्या प्रभागातील लोक आहेत. बाकीचे निर्णय विषयपटलावर न आणताच प्रस्ताव पास होतात. हा गरिबांचा विषय आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उत्तन का रोड का विषय आता है तो तभी लिओ कोलासोजी सदन मे हाजरी लगाके गायब हो जाते है। और स्थायी समितीका विषय आता है तभी सन्मा. मोहनजी पाटील रजिस्टर मे हाजरी लगाके इधर से गायब हो जाते है। ऐसा करना ये अच्छा नही है।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मला परवानगी मागावी लागेल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण बसून घ्या.

**रिटा शाह :-**

मॅडम, मी आत्ता उठली आहे आणि बाकी लोक बोलतात तेव्हा तुम्ही बोलत नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला परवानगी दिलेली नाही. आपण बसून घ्या.

**रिटा शाह :-**

तुम्ही नेहमी मला का असे करता? बाकी लोक उभे राहून बोलतात तेव्हा तुम्हांला ते चालते का? मॅडम, आपण माझा अधिकार दाबायला बघतात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या तुमचे अधिकार काय आहेत ते मलाही माहिती आहे.

**रिटा शाह :-**

मलाही माहिती आहे की, माझा अधिकार काय आहे.

**मा. महापौर :-**

मी बोलायला सुरुवात केलेली आहे. आपण बसून घ्या. आपल्याला नंतर बोलण्याची संधी देण्यांत येईल.

**रिटा शाह :-**

मी पहिल्यांदा बोलायला सुरुवात केली आणि आपण नंतर बोलायला सुरुवात केलेली आहे.

**मा. महापौर :-**

आपण खाली बसून घ्या. नंतर बोला. सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी ह्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर अगोदर देते. आपण बसून घ्या.

**रिटा शाह :-**

अगोदर मी बोलायला सुरुवात केली होती. मी बसणार नाही.

**मा. महापौर :-**

आपण खाली बसा.

**रिटा शाह :-**

मी बसणार नाही. नाहीतर, मी वॉक आऊट करेन.

**मा. महापौर :-**

उभे राहा नाहीतर तुम्ही सरळ बाहेर निघून जा.

**रिटा शाह :-**

कशाला मी बाहेर निघून जाणार?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, २६ जुलै ते २७ जुलै २००५ या दिवशी पूरग्रस्त परिस्थिती निमार्ण झालेली होती. या पुरग्रस्ता परिस्थितीमध्ये ज्या व्यक्ती मृत झाल्या, त्या मृत व्यक्तींना.........

**रिटा शाह :-**

वैती साहेब, आप हमारे पार्टी के उपमहापौर हो। हमको बैठनेके लिए बोलके हमारा वह अपमान कर रहे है।

**सुरेखा गायकवाड :-**

आपण त्यांना खाली बसा असे चुकीचे बोलता.

**रिटा शाह :-**

तुमचे हे असे बोलणे चुकीचे आहे.

**मा. महापौर :-**

यांना नेहमी सवय आहे. परमिशन नसतांना उठून उभे राहून डायरेक्ट बोलायला सुरुवात करतात. इतर सदस्यही तुमच्यासारखेच अंमलबजावणी करतात. आपण आत्ता बसून घ्या. आपल्याला जेव्हा परवानगी मिळेल तेव्हा आपण बोला.

**रिटा शाह :-**

मी खाली बसणार नाही.

**मा. महापौर :-**

जेव्हा आपल्याला परवानगी देण्यांत येईल तेव्हा आपण बोलावे.

**सुरेखा गायकवाड :-**

महापौर मॅडम, असे चालणार नाही. मुळीच असे चालणार नाही. ही लोकशाही आहे आणि लोकशाहीमध्ये तुम्ही महिलांचा आवाज बंद करणार का?

**मा. महापौर :-**

लोकशाही आहे. आपण त्याचा गैरवापर करु नका. आपल्याला जेव्हा परवानगी दिली जाते, तेव्हाच आपण बोला.

(सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह व सन्मा. सदस्या श्रीम. सुरेखा गायकवाड ह्या सभागृहात येण्या-जाण्याच्या रस्त्यावर खाली बसल्या.)

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेविका रिटा शाह आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापती महोदया श्रीम. सुरेखा गायकवाड मॅडम ह्या खाली बसलेल्या आहेत. तर मा. महापौर मॅडम, आपण त्यांचे विचार ऐकायला काही हरकत नसावी. त्यांचे जे काही म्हणणे आहे ते आपण ऐकून घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, आपण म्हणता ते बरोबर आहे. जेव्हा मी माईक समोर धरते आणि बोलायला सुरुवात करते. त्याच्याकडे लक्ष नसतांना ते बोलायला सुरुवात होते. मी बोलल्यानंतर आपण बोला. परमिशन दिलेली आहे ना आपल्याला नंतर बोलायला. का त्यावेळेस आपल्याला बोलायला पाहिजे, पिठासिन अधिकारी बोलत असतांना. म्हणजे तुम्हांला पिठासिन अधिकाऱ्यांचा सन्मान नाही का? लेडीज असून आपण लेडीजचा सन्मान करु शकत नाही का?

**जयंत पाटील :-**

कृपया, आपण त्यांना पाच मिनिट वेळ द्या आणि त्यांचे म्हणणे काय आहे ते ऐकून घ्या.

**मा. महापौर :-**

त्यांना काय सांगितले, सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी हे उभे आहेत. त्याच्या प्रश्नावर अगोदर रुलिंग देते आणि नंतर आपण बोला ना. एवढी सहनशिलता त्यांच्याकडे नाही का?

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या दोन्ही नगरसेविका सत्ताधारी पक्षाच्या आहेत आणि सभागृहात हे असे वातावरण योग्य दिसत नाही.

**कैलासबेन जानी :-**

सत्तापण तुमची आहे, विरोधी पक्षाचा नेताही तुमच्याच पक्षाचा आहे. तरीदेखील सभागृहात अशी घटना घडते. सभागृहाची ही परिस्थिती आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर की परवानगी से बोलता हूँ की, सत्ताधारी अगर आपका विरोध कर रहे है, तो समझ लिजीए, आपके राज्य मे कितना अनर्थ हो रहा है।

**मायरा मेंन्डोंसा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांना पाच मिनिटे बोलायला वेळ द्या.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडम, आपण जे त्यांना बोलता की, गप्प बसा, गप्प बसा. जर त्यांना तुम्ही एवढे सांगितले असते......

**मा. महापौर :-**

त्यांना गप्प बसायला सांगितले नाही. जेव्हा तुम्हांला परवानगी मिळेल तेव्हा तुम्ही नक्की तुमचे म्हणणे मांडा.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

बरोबर आहे मॅडम, त्यांना काहीतरी बोलायचे होते. जर त्यांना आपण दोन मिनिटांचा टाइमिंग दिला असता तर योग्य होते.

**मा. महापौर :-**

मी बोलल्यानंतर आपण बोला असे त्यांना सांगितले होते.

**परशुराम पाटील (मा. विरोधी पक्ष नेता सो.) :-**

त्यांना आत्ता दोन मिनिटांचा टाइमिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण जागेवर जाऊन बसा आणि आपले काय निवेदन आहे ते मांडा.

**रिटा शाह :-**

सगळ्यात पहिले, जो आमचा अधिकार आहे तो मिळविण्यासाठी आम्हांला खाली बसावे लागते. त्याबद्दल मी खेद व्यक्त करते. महापौर मॅडम आपण महिला महापौर आहात. आपण जेव्हा महापौर झालात तेव्हा मी स्वतः तुमचे अभिनंदन केलेले आहे. कुठल्या गोष्टीत तुमचे चुकले असेल किंवा तुमचे रुलिंग झाले नसेल तेव्हा मीच तुमची बाजू घेतली आहे की, एक महिला महापौर आहेत आणि नविन निवडून आलेल्या आहेत आणि आत्ता जेव्हा बोलायला चालू केले की, मॅडम फक्त रिटा शाहलाच परवानगी मागावी लागते. एवढे बोलण्याच्या अगोदरच तुम्ही माझ्या बरोबर बोलायला सुरु केले. हे तुम्ही ज्या सत्तेवर बसलेल्या आहेत, तुम्हांला शोभा देत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या, आपल्याला जे बोलायचे आहे ते आपण बोला.

**रिटा शाह :-**

तेच बोलते. तुम्ही जर मला तेव्हा दोन मिनिट बोलालयला दिले असते तर एवढे काय झाले नसते. तुम्ही मंथन करा, तुम्ही चिंतन करा. तुम्ही काय केले आहे ते. मी विषय आहे तेवढेच बोलते. फक्त मला एवढेच सांगायचे आहे की, हे सभागृह ११.०० वाजल्यापासून चालू झालेले आहे आणि आत्ता दुपारचे १.०० वाजले आहेत. मी उठले तेव्हा आपण मला सांगितले की, कुठल्याही नगरसेवकांनी परवानगी घेतल्याशिवाय बोलायचे नाही. ठिक आहे, मी दोन तास अशीच बसले. मी परवानगी मागितलीही नाही आणि बोललेही नाही. त्यानंतर किती नगरसेवक राष्ट्रवादीचे व आमच्या कॉंग्रेसचेसुद्धा आणि बाकी सर्व नगरसेवक मधूनमधून उभे राहून बोलतात. तेव्हा आपण काहीही रुलिंग केलेले नाही. फक्त बोलण्याचा प्रश्न तेवढाच आहे की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांचा एवढा महत्वाचा प्रश्न, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी उपस्थित केलेला प्रश्न ज्याच्यावर आपण मागच्या सभेत रुलिंग दिले होते की, अशा महत्त्वाच्या प्रश्नावर रुलिंग होत नाही आणि त्याच्यावर चर्चा होत नाही. तर ह्या सभागृहामध्ये चर्चा करण्यांत अर्थ काय राहिला. मागचा प्रश्न होता, शशिकांत भोईर ह्यांनी उपस्थित केलेला, पन्नास लाखाचा. तेव्हा आर. डी. शिंदे साहेब हे आयुक्त म्हणून होते आणि त्यांनी प्रशासनाच्या नात्याने रुलिंग दिले होते की, कायद्यात तरतुद आहे की, नाही हे मी बघून नंतर ह्याच्यावर तुम्हांला जवाब देईन. हा प्रश्न मी विचारला होता तेव्हा मी स्थायी समितीची सदस्या

होते. मी बोलले होते की, पन्नास लाख रुपये मिळायला पाहिजे. त्या बाजुला मी आहे. पण त्याच कायद्यात तरतुद आहे का? तेव्हा त्यांनी असे उत्तर दिले होते. तरीही प्रशासनाने पॉझिटीव्ह अहवाल पाठवला आणि त्याच्यावर पन्नास लाखाचे चारच्या ऐवजी सहा कामे पास झाली. मॅडम, ह्याच्यावर तुम्हांला आणि आम्हांला चिंतन, मंथन करायचे आहे. आपण सत्तारुढ पार्टी आहोत. मा. महासभत आपल्याला ठराव पास करण्याचा अधिकार आहे. आपण ठराव पास करुन दिल्यानंतर त्याच्यावर प्रशासनाने कार्यवाही करायची असते. तिथे प्रशासन चुकले आहे. आपण काहीही ठराव करुन दिला पण ते कायद्यात बसत नसेल तर त्याच्यावर पॉझिटीव्ह अहवाल द्यायला नाही पाहिजे. मग त्याच्यावर ज्याने पॉझिटीव्ह अहवाल दिलेला आहे, ज्या ही अधिकाऱ्याने, त्याच्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार तुमचा आहे आणि तुम्हांला तसे रुलिंग द्यायला पाहिजे होते. एवढेच मला बोलायचे आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलू इच्छिते की, २६ व २७ जुलै २००५ रोजी जो पाऊस झाला आणि त्या पावसात बऱ्याच लोकांचे नुकसान झाले. ९, १० आणि ११ सप्टेंबरलासुद्धा जो पाऊस झाला त्या पावसामध्ये विजय पार्क, गोकुळ धाम, प्रॉडव्हे अरेनी, बऱ्याचशा परिसरामध्ये शितल नगर, शांती नगरमध्ये सुद्धा पाणी भरले होते. चार ते पाच फुट पाणी होते. मी याबाबत तुम्हांला पत्रसुद्धा दिलेले आहे. गेल्या मा. महासभेतही बोलले होते की, विजय पार्कचे गटार आपण एक वर्ष झालेले आहे व खोदून ठेवलेले आहे आणि आजपर्यंत ते मंजुर करुन घेतलेले नाही. बऱ्याच वेळा पत्रव्यवहार करुनसुद्धा आम्ही सत्ताधारी असतांना आमची कामे होत नाहीत ह्याचे येथे वाईट वाटते आणि खेदसुद्धा मला वाटतो. आपण हे काम कधी चालू करणार आहात? रोड उंच वाढवायला पाहिजेत, गटार बांधायला पाहिजे आणि त्या ठिकाणी जे पाणी साठत आहे त्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कायमस्वरुपी काहीतरी मार्ग काढायला पाहिजे. फक्त आपण पाचजण एक जे.सी.बी. मशिन नेता आणि त्याने थोडा वेळा खोदले जाते आण परत ये रे माझ्या मागल्या. तर हे जे चालले आहे, ते चुकीचे चालले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ही खरी चुकी, त्या भागातले आपले जे नगरसेवक आहेत त्या लोकांची आणि नगररचना विभागाची चुकी आहे. सर्व बिल्डींग पाण्याच्या लेव्हलला बांधलेल्या आहेत. जरा पाऊस पडल्यानंतर खाणार काय आणि पिणार काय, पावसाची गरज आहे. म्हणून त्यावेळी बिल्डींग बांधताना नगररचनावाले आहेत त्यांना दांडे घेऊन मारा असे मी बोलतो. ह्याची सर्व चुकी आहे. कारण तुम्ही एकत्र येणार नाही तोपर्यंत या शहराचा विकास असाच चालणार आहे. जमिनीच्या लेव्हलला बिल्डींग बांधता. एक पावसाचा थेंब पडल्यावर एक माळा बुडतो ही काय परिस्थिती आहे? ही परिस्थिती कधी बदलू शकत नाही का? हे मी सर्व सभागृहाला सांगतो. ही जी परिस्थिती आहे. गोविंद नगरला जरा पाऊस पडला नाही तर एक माळा बुडतो. आमच्या विभागात आमदारांनी एक बिल्डींग बांधली आहे. तो त्यांचा एक माळा लगेच बुडून जातो, एक थेंब पाऊस पडल्याबरोबर. आपण बघायला या, परिस्थिती फार वाईट आहे. मिरा रोड पावसामध्ये नेहमी बुडलेलेच असते. कारण मी मागे आश्वासन देते वेळी सांगितले की, मिरा रोडचे कोणी आश्वासन देऊ नका. पाणी थांबणार नाही. पाणी हे थांबणार कारण बिल्डींग हे अगदी लेव्हलला बांधलेले आहे. दहा वर्षा अगोदर शांती स्टारच्या बिल्डरला मंत्रालयात खेचले होते. तिथेसुद्धा हा प्रश्न उपस्थित केला होता की, आपल्या बिल्डींग ह्या समुद्रसपाटीच्या लेव्हलला आहेत. अरे कसले इंजिनिअर, हजाम तुम्ही. तो त्या शांतीकडे एक हजाम आहे. तो नेहमी असाच करतो. ही सत्य परिस्थिती आहे. आत्ता बिल्डींग नविन बांधायला घेतलेले आहेत. ते उंच बांधायला लागलेले आहेत आणि दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा नैसर्गिक नाले होते त्याच्यावर आम्ही नेहमी बोललो आहोत. मी शिंदे साहेब असतांना तेव्हाही बोललो की, नैसर्गिक नाले खोदून तिथे बांधकाम करुन घ्या. जे नैसर्गिक नाले सर्व बंद केलेले आहेत, या ठिकाणी शिंदे साहेब आले होते त्यावेळेस सांगितले की, जे नाले आहेत, नैसर्गिक नाल्याची पाहणी करा आणि ते नाले खोदून घ्या. ह्या लोकांनी काय केले. रस्त्याचे नविन नाले काढलेले आहेत. नविन नविन कायदे करायला लागले आहेत. तर नविन नालेही काढायला लागले आहेत. नविन नाल्याने पाणी जाणार आहे का? एक थेंब पाऊस पडला की, पाणी शहरामध्ये भरतो. त्याचा तुम्ही खोल अभ्यास करायला पाहिजे. आत्तापर्यंत काही नाले शाबित आहेत. मी नेहमी बोलतो की, तुम्हांला जर काही माहिती नसेल तर आमच्या सोबत चला. आम्ही तुम्हांला दाखवतो का आम्ही ज्या गावच्या बोरी त्या गावच्या बाभळ्या आहोत. आम्ही येथे शेतामध्ये नांगर धरलेले आहे. आम्हांला माहिती आहे. आम्ही स्थानिक लोक आहोत. या ठिकाणचे भुमीपुत्र आहोत. पण आमचे कोण ऐकून घेत नाही. येथे नविन इंजिनिअर येतात, आर्किटेक्ट येतात आणि कागदावर रेघा मारतात की, येथून गटार काढा. असे कुठे चालते का? आपण इथल्या जुन्या माणसांचा सल्ला घ्या. घाटावरती रस्ते काढले, ते कोणीतरी धनगराने दाखवलेले आहेत. एखाद्या धनगराने दाखवले म्हणून ते घाट तयार झालेले आहेत, नाहीतर रस्ते होऊ शकत नाही. त्याप्रमाणे आपण आम्हा भुमीपूत्रांना विश्वासात घ्या आणि तसे गटार बनवा व बघा पाणी साठते का? आत्ता जाफर खाडी संपुर्ण बंद झाली. तिथे जाऊन बघा.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, आदरणीय म्हात्रे साहेब आत्ताच बोलले की, नगरसेवक काम करत नाहीत. मॅडम, नगरसेवक तिथे नक्कीच काम करत आहेत. ते बोलले ते त्यांचे चुकीचे वक्तव्य आहे की, नगरसेवक काम करत नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे मॅडम, मी तुम्हांला पत्र दिले आहे की, जर विजय पार्कचे काम झाले नाही, रोडचे काम आणि गटाराचे काम झाले नाही तर १० ऑक्टोबरला सुरेखा गायकवाड, मी स्वतः महानगरपालिकेसमोर उपोषणाला बसणार आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मॅडम, विषय को छोडके बात चल रही है।

**तुळशीदास म्हात्रे :-**

जेव्हापासून ही सभा चालू झाली आहे, तेव्हापासून विषय सोडून चर्चा चालू आहे. हा जो प्रश्न पाण्याचा २६ तारखेचा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी प्रश्न विचारलो आहे. तोसुद्धा विषयपटलावर विषय नाही. तरी आपण तो विषय का घेतला? विषयपत्रिकेवर जर विषय नसेल तर तो विषय आपण सभेत घेऊच नका. मग ह्यांचे विषय कसे येतात?

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी विचारलेलया प्रश्नावर रुलिंग द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

विरोधी पक्ष नेत्याला बोलायला गेले तर राग येईल. त्यांनाच काय शहराची पडली आहे. त्यांच्याच कार्यकर्त्यांकडे पाणी गेलेले आहे. आमच्या इथले लोक आहेत तिथे पाणी गेलेले नाही. त्यावेळी प्रश्नपत्रिकेवर प्रश्न आणायला पाहिजे होता.

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौर मॅडम, तुमची मेजोरिटी आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

वह पार्टी के अध्यक्ष है और अगर वह गलत भी बोलते है, तो आप सुनके लो। क्या फरक गिरता है?

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, काल पाऊस न पडतानाही नवघर गावामध्ये कमीत कमी दोन ते अडीज फुट पाणी दत्त देवळाजवळ होते. नवघर गावात पाऊस नसतांनाही पाणी घुसले होते. ह्याचे कोणत्याही अधिकाऱ्याला माहिती नाही. ते पाणी कसे काय आहे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्यावे.

**गजानन भोईर :-**

उघानाचे पाणी ठिक आहे. पण गटार खोदायचे ते गटारामध्ये राहिल अशी काही सिस्टम करा की, समुद्राचे पाणी बंद करता येईल. बंद करता येत नाही का?

**मा. महापौर :-**

२६ जुलै ते २७ जुलै २००५ या दिवशी जी पुरपरिस्थिती निर्माण झाली आणि आपल्या मिरा भाईंदर शहरामधील नऊ जण मृत्युमूखी पडले व लेप्टोस्पायरसचे चार मृत संशयित आहेत. नऊ आणि चार अशा तेरा लोकांना आपण आपल्या महानगरपालिकेतर्फे २५-२५ हजाराची मदत जाहिर करत आहे आणि ह्या विषयी ठराव मंजुर करुन घेण्यांत येईल, ठरावानुसार अंमलबजावणी करण्यांत येईल.

**रोहिदास शं. पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही मृतांच्या नातेवाईकांना २५-२५ हजार रुपये आपल्या महापालिकेच्या क्षमतेनुसार जाहिर केले व ज्याला आपण वैद्यकिय मदत म्हणतो की, ज्यांना लेप्टोस्पायरसची लागण झाली आणि त्यांना हॉस्पीटलमध्ये खर्च केला. त्याची तुम्हांला मी माहितीसाठी सांगतो, ३५-४० हजाराचे बिल बनते. आपण त्यापैकी किती खर्च उचलाल तो जाहिर करा. जे ॲथेन्टिक डॉक्युमेंन्टस् येईल ते आपल्या डिपार्टमेंटने द्यावे. ह्यात कोणाची शिफारस घ्यायचे कारण नाही.

**मा. महापौर :-**

लेप्टोस्पायरसने ग्रस्त झालेल्या रुग्णांना आपण दहा-दहा हजार रुपये जाहिर करत आहोत.

**रतन पाटील :-**

शासनाकडून मागवून घ्या ना.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ते पण तिकडे करा. आम्ही तो ठराव घेउ.

**हंसुकुमार पांडे :-**

शासनाकडे जा ना.

**परशुराम पाटील :-**

सभागृहाला तुम्ही सांगा.

**रतन पाटील :-**

विरोधी पक्ष नेते तुम्ही शासणाकडे मागा ना. शासणाकडून आण जास्तीत जास्त मिरा भाईंदरसाठी.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, ज्यांच्या घरात पाणि घुसलेले आहे त्यांच नुकसान झालेले आहे. त्यांना एक वर्षाची घरपट्टी कर माफ करावे. मा. महापौर मॅडम, अशी आपण घोषणा करा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ती जे आत सन्मा. सदस्य आसिफ शेख म्हणतात की, जे टॅक्स माफ करावा एक वर्षासाठी ते काय अडीचशे तीनशे रुपयेसाठी भिक मागतात का? त्यांना हजारो रुपयाचे जे नुकसान झालेले आहे.

**रतन पाटील :-**

विरोधी पक्षनेते तुम्ही बरोबर बोलले आहात. आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत.

**परशुराम पाटील :-**

चुकीचे आहे. त्यांच पण जिद्द पूर्ण करा की, आम्ही सभागृहामध्ये ठरावामध्ये घेउ. असे मा. महापौर साहेब तुम्ही डिक्लरेशण करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. पूढील विषयाला सुरुवात करावी. बसा खाली.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांची लक्षवेधी आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, महत्वाची सुचना आहे. अभी आपणे जो ९ और ४ इक्वल टू १३ रोगीयोकी सहायता की, उसके लिये धन्यवाद.

**प्र. सचिव :-**

लक्षवेधी पुकारलेली आहे.

**रोहीदास पाटील :-,**

आम्ही धन्यवाद दिले तुम्ही घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. आयुक्त साहेब, अभी जो मा. महापौर मॅडम, ने ९ और ४ इक्वल टू १३ रोगियोकी सहायता देणे की बात की, वो तो सुतनी योग धन्यवाद देणे योग्य हे। लेकीन वो जो १३ का फिगर है ये गलत आकडा हे। मेरी यह सुचना है की उसकी सही जानकारी लेके और भी जो रोगी है। उनकी भी जानकारी लेकर के उन सभी का सहायता दी जाये। और ये सुचना ध्यान मे रखी जाये।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, पहिले लक्षवेधी वाचून त्या सभागृहाकडे द्या.

(प्र. सचिवांनी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांच्या लक्षवेधीचे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जी घटना घडली आणि त्याची सर्व टि. वी., सर्व वर्तमानपत्रामध्ये जे घडून आलेले आहे. त्यामध्ये सर्वप्रथम भाईंदरचा जे नाव होते त्या नावाला काळा डाग लागलेला आहे. आज महापालिका लाखो रुपये खर्च करते महापालिकेच्या सर्व सुरक्षा कर्मी आपल्या या महापालिकेमध्ये कार्यरत आहेत. मा. महापौर मॅडम, अनेक सुरक्षाकर्मीकडे बंदूक आहेत. त्या बंदूकीच्या लायसन्स संपलेले आहे. किंवा जे बंदूक वापरतात ते ही अनधिकृत आहे याची संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही आणि सर्वात महत्वाची गोष्ट मा. आयुक्त साहेब, जेव्हा ही घटना घडली आणि जेव्हा तो नगरसेवक सन्मा. सभागृहातले अटक होतात ही दुर्दैवी बाब आहे. मा. महापौरांनी मा. आयुक्त साहेबांनी त्याच्यावर आपले निवेदन प्रथम केले पाहिजे होते. पण तसे न करता आपण सुरक्षाकर्मी वर कुठलीही कारवाई केली नाही असे दिसून येते. आज जे सुरक्षाकर्मी आहे प्रत्येक स्मशानभूमीमध्ये प्रत्येक पाण्याच्या टाकीमध्ये आहे. आज ही गंभीर बाब या भाईंदर स्मशानभूमीमध्ये घडली. भाईंदरमध्ये काल एका पाण्याच्या टाकीमध्ये कुणीतरी काहीतरी विषारी वस्तु टाकली तर या सर्वांचे काय दुर्दैव होणार आहे. याची दखल प्रशासन घेणार आहे काय? आणि सर्वात महत्वाची गोष्ट मा. आयुक्त साहेब, जे अधिकारी या सुरक्षाकर्मीशी संबंधित आहेत प्रथम त्यांनी हे निवेदन करावे. या घटनाबद्दल त्यांना सुरक्षाकर्मी किंवा सुरक्षा ऐजन्सीनी काय-काय पत्रव्यवहार केलेले आहे. काय-काय त्यांनी जाणीव दिलेली आहे. आणि प्रशासनाने कोण-कोणती बाब, दक्षता घेतलेली आहे. याचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांनी प्रथम खुलासा करावा. असे माझे निवेदन आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीया यांनी जी लक्षवेधी मांडलेली आहे. कवटी संबंधी हल्ली कवट्या बऱ्याच ठिकाणी मिळतात. कुठे बाजारात मिळतात, कुठे सुपर मार्केटला मिळतात हे मला माहित नाही. परंतु भाईंदर पश्चिमेच्या स्मशानातुन कवटी नेल्याच्या तिथल्या वॉचमेनने एक निवेदन पोलीसांना सादर केलेले आहे. याचा अर्थ असा होतो की, भाईंदर पश्चिमेच्या स्मशानामध्ये व्यवस्था बरोबर नाही. त्याच्या जर निविदांप्रमाणे जर घडल असेल मग, ह्या स्माशानामध्ये आपण जी सिक्युरिटी दिलेली आहे. ती सिक्युरिटी कोणाची आहे. आणि अशातऱ्हेची सिक्युरिटी मिरा भाईंदरच्या स्मशानामध्ये असेल तर ती सिक्युरिटी निविदा ताबडतोब कॅन्सल करावी. आणि चांगली सिक्युरिटी तिकडे नेमावी अशी मी मागणी करतो.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, जर त्या वार्डामध्ये स्मशानभूमी आहे त्या वार्डामध्ये जर निट व्यवस्था होत नसेल तर तिथल्या कवट्या इतर वार्डात कशाला न्यायच्या? दुसऱ्या वार्डात का नेल्या? तिथेच का जमा केल्या?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता त्या कवटया कुठून आणल्या होत्या?

**तुळशिदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आता जी लक्षवेधी सुचना मांडलेली आहे त्याच्यावर एक मिनिट बोलायचे आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, आता जी सुचना मांडली त्याबाबत अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मी मागवू इच्छितो. त्यांनी निर्णय घेतला त्याच्यावरती आरोप जे करण्यात आलेले आहे. त्या आरोपाचे थोडेसे स्पष्टीकरण पाहिजे होते. यासंबंधी अधिकाऱ्यांनी त्याचे स्पष्टीकरण द्यावे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, ये जो कवटी का बात चल रहा है। तो खरेखर मिरारोड के अंदर तो हम उदर सेवा करते है। तो वहा एकदम सिक्युरिटी भी अच्छा है। हमारे कर्मचारी भी अच्छे तरहसे काम करते है। मिरारोड के स्मशानभूमी मे कुछ अच्छा नही है। लेकीन मिरारोडे मै ये जो खोपडी कहासे आयी वो उसका बराबर प्रशासनमे भी ध्यान रखना चाहिए और कहासे आया। अपना कर्मचारी को बुलाके उसीको पुछके ओर उसको सब मालुम है। तो उस हिसाब से उसकी बराबर जाच करना चाहिए। ऐसी मेरी विनंती है। प्रशासन को भी शर्म जनक बात है। एक स्मशान के दुसरे स्मशान मे खोपडी जाती है। तो उसको क्या प्यार आया है क्या? इसी तरह कैसी खोपडी भाईंदर से मिरारोड पहुँचती है। वहॉ डे नाईट कभी भी तपास कर सकते है। वहाँ वॉचमेन अच्छी तरह से काम करते है। ओर प्रशासन ये जो कर्माजाली जो लोग है वो भी अच्छे तरह से काम करते है हमारे उधर। क्योकी हमारे दिनमे दो राउंड रहते है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदीजी, सिक्युरिटी अच्छी है। सिक्युरिटीवाले से आपका कोई लेन देन है क्या । सिक्युरिटी अच्छी है तो काम क्यु फिर ऐसा।

**चंद्रकांत मोदी :-**

जो खोपडी रखा था वो हमारे सिक्युरिटी ने देखा था । तभी इसिलिए हमको मालूम पडा की ये खोपडी बाहर से आयी ।

**शिवप्रकाश भुदेका :-**

अंदर आणे के बादमे ये सब काम होगया तभी बादमे देखा ना आपने ।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, ये जो टि. वी. पर सिरियल चल रहा है। काल कपाल महाकाल, उसी हिसा मै काल कपाल महाकाल एक जिवंत खोपडी मै मरी हूई खोपडी का कमाल दिखा दिया। मरी हूई खोपडी ने कमाल दिखाया। एक सिधी साधी नगरसेविका को फसाया खुद तो शिक्षो के अंदर गया ही वो खोपडी का ही कमाल है। ऐसा नही है भायंदर के सभी स्मशान मै सभी कर्मचारी व्यवस्थित है। लेकिन कोई अधिकार से नगरसेवक अगर खोपडी लेता है तो उस कर्मचारी की क्या गलती है? लेकिन जो मरी हुई खोपडी थी उसका कमाल है की, वो तो शांती से पडी थी लेकिन ये जीवंत खोपडी जो है, ज्यादा चलती है। कायदे कानुन मै ज्यादा उलझती है। उसको सिधा उसका रास्ता बता दिया जेल के अंदर शिक्षे मै बिठा दिया। ये खोपडी का कमाल है। किसी भी कर्मचारी की गलती नही है।

**अनंत पाटील :-**

मा. महापैर महोदय, भाईंदर पश्चिममध्ये स्मशानामध्ये जी खोपडी गेली त्या खोपडीचा सि. आय. डी. मार्फत चौकशी करावी. अशी मी मागणी करतो. आणि या सि. आय. डी. मार्फत चौकशी करुन त्याला जे जबाबदार असतील त्याला सजा द्यावी.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, मुझे लगता है वो खोपडी की बात से शांत हो जाना चाहीए वर्ना वो दुबारा कमाल दिखाएगी ।

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, हा जो खोपडीचा आहे ते जळून द्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

वो खोपडी अगर शांत हो जाती है। अदरवाईस ये खोपडी शांत नही बैठेगी ।

**अनंत पाटील :-**

सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी अशी आम्ही मागणी करतो.

**चंद्रकांत मोदी :-**

सब कर्मचारी की जाच करके जो लोग खोपडी लेके गये उसके उपर अच्छी तरह से कारवाई किया जाये।

**अनंत पाटील :-**

त्याची आम्हाला रुलिंग द्या.

**तुळशिदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, खोपडीचा विषय जो चाललेला आहे खर म्हणजे आपण या पत्रामध्ये सिक्युरिटीवर आरोप केलेला आहे. तो चूकीचा आहे. कारण मी एकच सांगु इच्छितो जेव्हा नगरसेवक दोन ज्या ठिकाणी गेले आणि दुसरा तो आतमध्ये गेला आणि एक सिक्युरिटी बरोबर बोलत राहिला.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, कर्मचारी जागृत था इसिलिए तो मालूम पडा। नही तो मालूम कैसे पडता था।

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, याची सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार आहात की नाही? तुम्ही लिहून द्या आम्हाला.

**तुळशिदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य तुम्ही चूकीचे बोलतात. जेव्हा एक नगरसेवक..........

**अनंत पाटील :-**

कारण या खोपडीमुळे मिरा भाईंदर महापालिकेचे नाव येत्या इतिहासामध्ये जमा झालेले आहे. मिरा भाईंदरच्या या शहरामध्ये जे स्मशानभूमी आहे त्या स्मशानामध्ये

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य बसून घ्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

नगरपालिका का हक्क बंद किया है। एक सदस्य ने पालिका का हक्क बंद किया है। सेक्शन १३ के अंतर्गत क्यों नही उसको शोकॉज नोटीस दिया जाये। और उसके पद से रिक्त किया जाये। उसपर जब तक केस चले और केस सेटल ना हो तबतक इस हाउस मे बेठनेका कोई अधिकार नही।

**चंद्रकांत मोदी :-**

और भावनिक धार्मिक भावनाओ को भडकानेका काम किया है।

**तुळशिदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, धार्मिक भावना भडकल्या असत्या तर महानगरपालिकेचे........

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रशासनाने काम केलेले आहे. त्या लोकांना सभेमध्ये बसविण्याची गरज नाही.

**तुळशिदास म्हात्रे:-**

सर्वांच्या भावना भडकवण्याचे काम केलेले आहे. महापालिकेच्या शहरामध्ये जर घडलं असेल तर त्याला जबाबदार कोण? म्हणून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करा आणि सी.आय.डी.मार्फत चौकशी करा.

**प्रेमनाथ पाटिल :-**

मा. महापौर मॅडम चौकशी करावी.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम आम्ही जी मागणी केलेली आहे त्या प्रत्येक स्मशानभूमीमध्ये आता प्रत्येकाला सज्ञान रहावं लागेल अज्ञाना प्रमाणे चालता येणार नाही. सिक्युरिटी वर विश्वास ठेवायचा की नाही हा प्रशासनाचा प्रश्न आहे. परंतु याची सी.आय.डी. मार्फत चौकशी करा. कारण हा खुन आहे की अन्य काही आहे याची जाच हायला पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, सिक्युरिटीवर जे आक्षेप घेतलेले आहेत की, आपली सिक्युरिटी ठिक नाही.

**अनंत पाटील :-**

एक विषय घ्या आणि एक संपवून टाका. तुम्हाला सी.आय.डी. मार्फत चौकशी करायची आहे की नाही करायची? नको असेल तर नका करु. तुम्ही आधी सांगा मला.

**शशीकांत भोईरः-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही आम्हाला उत्तर द्या.

**महेंद्रसिंग चौहाणः-**

चौकशी करने की जरूरत क्या है? ये स्पष्ट मामला है। जबरदस्ती एक कर्मचारी से खोपडी ली गई है। इसमे चौकशी करने की क्या सवाल है।

**प्रभात पाटीलः-**

सिक्युरिटी वर आपण जे आक्षेप घेतले ............

**महेंद्रसिंग चौहानः-**

शांत खोपडी को अशांत खोपडी बनानेका काम किया एक नगरसेवक ने इसमे चौकशी की क्या बात है। हर हालत मे उसे शोकॉज नोटीस देना ही चाहीए।

**प्रभात पाटीलः-**

मा. महापौर मॅडम, आपण जे सिक्युरिटीवर आक्षेप घेतले आहेत की, एक नगरसेवक किंवा एक पदाधिकारी तुमच्या मिरा भाईंदर महानगर पालिकेचा पदाधिकारी म्हणा किंवा अधिकारी म्हणा जर महानगरपालिकेच्या कोणत्याही शाळेत, कोण्त्याही मैदानात, कोणत्याही गार्डनमध्ये उदयानामध्ये जर गेलात तर तिथल्या सिक्यूरिटीने जर आपल्याला सलाम नाही केला किंवा आपला आदर नाही केला तर आपण अगदी छातीवर हात ठोकून त्याच्याविषयी आक्षेप घेतो की, त्यांने मला सलाम नाही केला, त्याने मला मान नाही दिला, त्याने माझा सन्मान नाही केला असे आक्षेप घेत असताना तो तिथला सिक्युरिटी आपल्याला कसा रोखेल की, आपण त्या गार्डनमध्ये, उद्यानामध्ये, त्या स्मशानात जाउन तो कसा रोखेल आपल्याला. तूम्हाला रोखेल की मला रोखेल तो आपल्याला सन्मानच करेल आपल्याला तो तिथे जाउ देईल आणि असं करत असताना जर तिथून काही वस्तू गेलेली असेल तर सिक्यूरिटीला जबाबदार धरता येत नाही. कारण त्यांनी तिथे आपल्याला प्रवेश दिलेला आहे. त्याच्यामुळे सिक्युरिटीवर कोणतेही आक्षेप घेण्याचे कारण नाही. त्यांच्या नियमामध्ये त्यांना तशा सूचना द्या. परंतू त्यांच्या वर तूम्हाला एलिगेशन किंवा त्यांच्यावर तुम्हाला आरोप आक्षेप करता येणार नाही. उदया त्यांनी आपला मान-सन्मान किंवा आदर केला नाही असं आरोप त्यांच्यावर करता येणार नाही.

**परशुराम पाटीलः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, हिंदू स्मशान मध्ये ज्या टाइमाला कोणतेही मयत झाले त्या टाइमाला पूर्ण परवानगी आपली महानगरपालिकेची घेतली शिवाय तिथे मयत कोणतेही पध्दतीने प्रवेश दिला जात नाही. परंतु, अशा या भाईंदर पश्चिमच्या स्मशान भुमी मधून कवटया काय आणि डोकी काय? आणि खोपडया काय? तर अशा पध्दतीने जर एखादा महानगरपालिकेचा जबाबदार नगरसेवक अशा स्मशान मध्ये जाउन अशा कवटया जर घेउन त्या इथून तर मिरारोडच्या स्मशानमध्ये जाउन तिथे टाकायचे व एखादया माणसाला बदनाम करायचे. तिथे तीन लोकांचे स्मशान आहे, ख्रिश्चन बांधवांचे आहे, मुसलमानांचे आहे,हिंदूंचे आहे, अशी तीन स्मशानभूमी आहे. गाडीतून लोक जाताना असे म्हणतात की सुंदर बुक्स स्मशानभुमी आहे. नजर टाकावी तर चांगले वाटते असे पेसेंजर म्हणतात. परंतू, अशा पध्दतीने की आपण परवानगी घेतो त्या पध्दतीने स्मशानामध्ये जाताना परवानगी घेतल्यानंतर आपण प्रवेश देतो, तरी सुध्दा नगरसेवकांनी त्या तिथून खोदून त्या कवटया आणल्या. त्या अशा काय जमीनीवर पडलेल्या होत्या की त्या चालत तिकडे गेलेल्या नाही. आणि त्याची उलटी कबर खोदली गेली. डोक्याच्या बाजूने खोदायची ती पायाच्या बाजूने खोदली गेली. पायाच्या बाजूने खोदल्यानंतर तर पायांचे पंजे तसेच्या तसे येतील म्हणजे ती जास्त कूजलेली नव्हती आणि ती ठेवली गेली डोक्याच्या बाजूने गेल्या आणि टि.वी. मध्ये, आणि वर्तमानपत्रामध्ये अशा पध्दतीने जर नगरसेवकांनी असं केलं तर शहराची बदनामी आणि प्रशासनातील महानगरपालीकेची बदनामी आहे. आणि त्याच पध्दतीने मी आपल्याला तीन तारखेला निवेदन दिलेलं आहे. की प्रशासनाचे हे काम आहे,त्यांच्यावरती कारवाई का केली नाही तर त्याच मला उत्तर देखील मिळालेलं नाही. का केलेलं नाही याचं मा. महापौर मॅडम तुम्ही मला उत्तर देता का? मा. महापौर मॅडम, तुम्ही मला उत्तर द्याल का की, नाही देणार?.

**महेंद्रसिंग चौहानः-**

तिन महिने तो सस्पेन्ड करना चाहीये।

**परशुराम पाटीलः-**

म्हणून म्हणतो की, त्यांची केस चालेल तिथपर्यंत या सभागृहामध्ये बसण्याचा त्यांना काहीही अधिकार नाही म्हणून त्यांना प्रशासनाने, मा. आयूक्त साहेबांनी, अधिकार जर असे त्याच्यावर निलंबित करावे. केस चालेल तिथपर्यंन्त माझा त्यांना सक्त विरोध आहे.

**महेंन्द्रसिंग चौहानः-**

मा. महापौर मॅडम, मैने जो सेक्सन बताया उसको पढके आपको बतादू। या अधिनियमावर निवडून आलेला कोणत्याही पालिका सदस्य आपले कर्तव्य पार पाडत असताना गैरवर्तन केल्याबद्दल किंवा कुठलेही लज्जास्पद वर्तन केल्याबद्दल दोषी आहे. इस तरह का अगर कोई भी वर्तन किया है तो इसके लिये उसको शोकॉज और उसको नोटीस दे के कूछ महिने छह महिने तक निलंबित करनेका अधिकार पुरी महानगरपालिका को है। मै आपसे निवेदन करता हूं इस तरह का आप अपना आदेश दिजीये की, कमसे कम उनको छह महिने तक सजा दी जाए।

**जयंत पाटीलः-**

मा. महापौर मॅडम, पूस्तकाचे चांगले वाचन चाललेले आहे. नियमांची यादी कसे-कसे नियम आहेत ते वाचून दाखवले. आज सुद्धा या सभागृहामध्ये ज्यांच्यावर अनेक गंभीर आरोप आहेत. ते पदावर बसलेले आहेत, परंतु त्यांच्यावर गंभीर आरोप आहेत कोर्टामध्ये केसेस चालू आहेत. हा विषय पूर्वी आलेला होता चर्चेला आज आपण बघतो राज्य सरकार मध्ये अरूण गवळी सारखा माणूस बसलेला आहे. कोर्टामध्ये हजर होतो, लोकसभेमध्ये अनेक ज्यांच्यावर कोर्टामध्ये प्रकरणे चालू आहे. उदाहरणार्थ, मी कोणाचे नाव घेउ इच्छीत नाही आपल्याला सगळे माहिती आहे. अशा तऱ्हेचे मंत्रिमंडळामध्ये लोक आहेत, मंत्रिमंडळामध्ये नेते आहेत. परंतू अशा तऱ्हेचा कुठलाही निर्णय लोकसभेमध्ये घेतला जात नाही, घेतला गेलेला नाही. कोर्टाचे निर्णय झाल्याशिवाय कोणालाही निलंबित करता येत नाही हा नियम आहे. लक्षात घ्या. कोणीतरी पुस्तक वाचून दाखवतो. कुणीतरी काहीपण बोलतोय. भाईंदर पश्चिममधले स्मशान हे हिंदू स्मशानभूमी आहे. मी, मघाशी भाईंदर पश्चिमेच्या स्मशानाबद्दल बोललो कारण, मिरारोडच जे स्मशान आहे त्या संबंधित निर्णय कोर्टामध्ये. त्या संबंधित मी वक्तव्य करणार नाही. परंतू भाईंदर पश्चिम मधील जे स्मशानभूमी आहे. आणि ज्या वॉचमेनने असे निवेदन केले किंवा असे लिहून दिले की, ह्या स्मशानातला कवट्या गेल्या. जर त्या कवट्या भाईंदर स्मशानातून गेल्या असतील तर त्या व्यवस्थीत जाळल्या गेल्या नाहीत. हिंदू स्मशानभुमीमध्ये प्रत्येक प्रेत जर मोठ्या कवट्या असतील तर त्या कवटया ज्यावेळेस कोर्टामध्ये दाखवल्या तेव्हा मी त्यावेळेला कोर्टामध्ये होतो. त्या कवट्या मोठ्या माणासाच आहे. अशा तऱ्हेच निवेदन सरकारी वकिलांनी केले. मोठ्या माणसाचे प्रेत हे हिंदू धर्मामध्ये दहन केले जाते, जाळले जाते. लहान मूलांचे प्रेत जे आहे................

**तुळशिदास म्हात्रेः-**

बेवारशी स्मशान कसे केले बेवारशी.

**जयंत पाटीलः-**

स्मशानामध्ये कुठलेही प्रेत नगरपालिकेची परवानगी घेतल्याशिवाय जात नाही. बेवारशीचा अर्थ काय? असेल बेवारशी जाळलं जात ते ही माझ्या माहितीप्रमाणे पोलीस खर्च करतात आणि काही वेळेला मी सुध्दा खर्च केलेला आहे. भाईंदर पूर्व परिसरामध्ये अशा तऱ्हेचे घटना घडल्या नंतर पोलीस एखादा समाजसेवक शोधतात. त्यांच्याकडे खर्च करायला पैसे नसतात. परंतु त्यांचा खर्च केला जातो. जर तो हिंदू असेल तर तो खर्च करतो.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

मैताची सामानाची दुकान म्हणजे.

**जयंत पाटीलः-**

मी मैताच्या सामानाचं दुकान जर चालवल तर पार्टनर आपल्याला घेईन, मी आपल्याला पार्टनरशिपमध्ये घेईन. प्रश्न दुकान चालवण्याचा नाही. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेब हिंदु धर्मामध्ये प्रेत जाळले जाते आणि कवटी जर ती जाळली गेली नसेल तर तो दोष कोणाचा? त्या स्मशान चालवण्याचा जर असेल किंवा तिथल्या सिक्युरिटीचा असेल. भाईंदर पूर्वेमध्ये नवघर रोडला जे स्मशान आहे तिकडे एक व्यक्ती अशा तऱ्हेची आहे. सिक्युरिटीबाबत म्हणत नाही. त्या स्मशानामध्ये बॉडी गेल्या नंतर हिंदू धर्माचे स्मशानात सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब आपण आला असाल मलाही कल्पना नाही. प्रेत जाळेपर्यंत राहिले नसाल तिथे एक व्यक्ती असते. ते प्रेत अगदी राख होईर्यंत, आम्ही म्हणतो त्याला की, कवटी फुटली का? कवटी फुटे पर्यंत तो माणूस थांबतो अशा तऱ्हेचे अर्धवट प्रेत कुठेही जाळले जात नाही. अर्धवट प्रेत जर जाळले गेले तर हाताचे कधी कधी तुकडे राहतात. लाकडं कमी पडतात. एखादी व्यक्ती मजबूत असते. आमचे सिंग साहेब नेहमी बोलायचे की, नवघर स्मशानामध्ये, भाईंदरच्या स्मशानामध्ये माझ्यासाठी दहन भूमीच नाही. कारण ६ फूट लांब होते. परंतू अशा तऱ्हेने तुकडे जर राहिले गेले तर पुन्हा ते जाळले जातात. म्हणुन मी म्हणतो. आणि सिक्युरिटीने मा. आयुक्त साहेबांना कळवलं पाहीजे. महापालिकेला कळवलं पाहिजे की, दोघे जण आले आणि त्याच्यातून अशा अशा कवट्या घेउन गेल्या आणि मला कुठल्याही तऱ्हेचे दम देवून गेले. अशी त्यांची आपल्यासमोर कंप्लेंट आहे का? मग तशा तऱ्हेची कंप्लेंट नसेल तर तो सिक्यूरिटीवाला त्यांच्या सोबत असेल. त्यानी पैसे खाउन दिले असतील कवटया. त्यांनी देण्यात येणार असतील म्हणजे कुठेतरी शंकेला अशा तऱ्हेचा वाव आहे. त्याचं प्रथम काम होते की, महापालिकेला कळविणे. स्मशानामध्ये किंवा इतर ठिकाणी महापालिकेच्या प्रॉपर्टीमध्ये, महापालिकेचा कुठल्याही ठिकाणी अशा तऱ्हेची घटना घडल्यानंतर त्या ठिकाणीची सिक्युरिटीला आपण पगार देतो, त्याने

महापालिकेला कळवणं अतिशय गरजेचं आहे. आणी त्याच्यामध्ये जर गलथानपणा केला तर त्याला आपण नोटीस द्यावी. आणि हि जी कोणाची सिक्यूरिटी असेल तर त्यांची सिक्यूरिटी कॅन्सल करावी हे माझे म्हणणे आहे.

**रिटा शाहः-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, हिंदूच प्रेत जाळलं किंवा मूसलमानाचं, किंवा ख्रिश्चनचं प्रेत आपण दफन केलं ते दफन तुम्ही भूमीमध्ये की, स्मशानामध्ये की, खोपडी राहिले की हातपाय राहिले की, काय राहिले. ते स्मशान चालवणारे ते जाळतात आणि दफनविधी करतात. ते त्या लोकांच कर्तव्य आहे. परंतु , दफनभुमी की स्मशानभुमी. जेवढे मनुष्य जन्माला आलेले आहेत त्यांना तिथे जायचे आहे. परंतू हा प्रकृती विरोधाचं काम होते. ज्यांनी केलेले आहे. सिक्युरिटीनी साथ दिली की, सिक्यूरिटीनी साथ नाही दिली. नगरसेवकांनी जाउन तिथे खोपडीचे बदल केलेले आहेत आणि महत्वाचा प्रश्न म्हणजे मा. महापौर मॅडम जसे सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी उपस्थित केलं की, सिक्यूरिटीने बघितलं की नगरसेवक अस असे खोपडी घ्यायला आलेले आहेत. तर त्यांनी कंप्लेन्ट करायला पाहिजे होती. मग, नगरसेवकाचं पण कर्तव्य होत की, त्यांनी खोपडया असे बघितले तिथे तर स्वतःहून चैनेल वगैरे यांना बोलवून प्रपोगंड न करता आपल्याकडे मा. महापौर आहेत, मा. आयुक्त आहेत, प्रशासन आहे, त्यांना डायरेक्ट कंप्लेन्ट करून ताबडतोब तिथे बोलवायला पाहिजे होतं आणि याचा प्रपोगंड करताना एका व्यक्तीशी आपली दुश्मनी काढायची आहे. आणि आपल्याला असा प्रपोगंड करून या मिरा-भाईंदर शहरामध्ये जातीय दंगल निर्माण होण्याची परिस्थिती त्या दिवशी उभारली होती. म्हणजे हा संपूर्ण निषेधार्य कार्य होत. अस कार्य करताना जेव्हा नगरसेवकाचं नाव येतं. गृह प्रतिनिधी आपण लोकांनी आमच्यावर विश्वास करून आपल्याला निवडून दिलेलं आहे. आणि आपण अशा प्रकारचं काम करणार आणि कायद्याची बाजू बघणार की, कायद्यात काय बसते नी कायद्यात काय बसत नाही. प्रकृतिच्या विरोधाचं काम आहे. एकदा एक माणूस मरतो तो आपला नसतो की, आई असु दे की, वडिल असु दे की, पोरगा असू दे एकदा मेल्यानंतर तो परमात्म्याचा होतो आणि पंचमहाभूतामध्ये जेव्हा आपण त्याला मिळवण्यासाठी स्मशानामध्ये नेतो. त्यानंतर त्याला हात लावायचे हे प्रकृती विरोधाचे काम आहे आणि त्याला इथुन तिथे नेले ते एका नगरसेवकाला शोभा देत नाही आणि नगरसेवकांनी केले असेल तर निषेधार्थ काम आहे आणि जर सिक्युरिटीने जर साथ दिली असेल, टाळी दोन हाताने वाजते एका हाताने वाजत नाही. म्हणून मी सिक्युरिटीची बाजू घेणार नाही किंवा नगरसेवकाची बाजू घेणार नाही. परंतु, हा संपूर्ण इतिहास एका माणसाला फक्त खाली पाडण्यासाठी इतिहासाची आणि संपूर्ण बनावाची उद्‌भव केला गेला आणि त्यासाठी किती हिंदू आणि किती मुसलमान मेले असते त्याचा विचार केला नाही. इथे किती दंगल झाली असती त्याचा विचार केला नाही अशा कार्याबद्दल ज्यांनी ज्यांनी साथ दिलेली आहे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी आपण पाऊल उचलायला पाहिजे. तेवढेच मला बोलायचे होते.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, गणपती त्यौहार मे ये आग भडकानेका काम किया। जेल मे खोपडी मैने मेरी ऑखोंसे निहारा हूआ है। तो उसके खोपडीके उपर बाल भी है। मतलब ताजा निकालकर काम किया गया है। हमने खोपडीके बाल पकडकर देखा भी तो ऐसे खोपडी और ३२ दात पूरे है। और आजसे ६ महिने पहिले सब न्युजमे आया था की, मिरारोड की स्मशानभूमी पूरे महाराष्ट्र मे फेमस है। और ये जातीवादी करनेके लिए गणपती के त्यौहार मे जो आग भडकानेका जो काम किया है उसके अंदर सभी जो मिले हूए है उनको सबको सला मिलनी चाहिए। ये मेरी विनंती है। ये जो किया है ये बहूत गलत और हलकट काम किया है। ऐसा काम नही करना चाहिए।

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. नगरसेवक जयंत पाटील यांनी मगाशी व्यक्त केलेले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इसके पेरेन्ट्स कहॉ गये साहब, उसके पेरेन्ट्सको भी धुंडना चाहिए। खोपडी जो अंदर से निकाली है।

**मिलन म्हात्रे :-**

या ठिकाणी जे सन्मा सदस्य अनंत पाटील यांनी वक्तव्य केल की, सी.बी.आय. कडून चौकशी झाली पाहिजे किंवा सी.आय.डी. मध्ये पण माझे म्हणणे आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

म्हात्रे साहब मेरा बोलना चालू है।

**तुळशिदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझे मित्र सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी मगाशी जो विषय काढला की, हिंदूच्या ज्या भूमिकावर जी प्रेते जाळली जातात. कवटी फुटल्याशिवाय आम्ही बाहेर निघत नाही. ही सत्य परिस्थिती सांगितली पण त्याच्या पलिकडे जाऊन सांगतो ज्या पोलिस स्टेशनला रेल्वेमध्ये ॲक्सीडेंन्ट झाला आणि तो बेवारशी माणूस असला तर त्या ठिकाणी त्याला गाडले जाते.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ती गाडल्याची भूमिका पाठीमागे आहे आणि ते गाडले जाते. पोलिसवाले का गाडतात? कारण कधीतरी त्यांचा नातेवाईक कोणी आला तर अशा व्यक्तीचा फोटो घेऊन त्यांना दाखविला तर त्याला तिथुन काढले जाते. अशा तऱ्हेने जी भूमिका केली होती आणि जे प्रेत हे बेवारशी होते तेच त्यांनी नेमके खोदून आणले. अशा प्रत्येक स्मशानभूमीमध्ये ज्या ज्या ठिकाणी पोलिस स्टेशन आहे. तिथे असे केले अशी ही सत्य परिस्थिती आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, ये मिरारोड के अंदर घटना है। ये घटना भाईंदरमे घटी हूई है। यह बेवारशी लाश यहॉ गाडा जाता है। मिरारोडमे हमारे स्मशानभूमी के अंदर तीन-चार साल या पाच साल के अंदर बच्चे रहते है और उसकी खोपडी है उसको ३२ दात तो नही रहते। और उसके बाल भी खोपडी के उपर ऐसा कैसा है।

**परशुराम पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य अनंत पाटील यांनी जे सांगितले की, सी.आय.डी. तर्फे ह्याची चौकशी व्हावी अस माझ म्हणन आहे. आणि सभागृहाचेसुध्दा तसेच म्हणणे आहे की, त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आणि कधी करणार?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी आपल्या जवळ जे काही वक्तव्य केलेले आहे. मला असे वाटते की, सर्व सन्मा. सदस्यांचे वक्तव्य एकच दिसते की, प्रशासनाकडून या प्रकरणावर आपले मत काय? कृपया मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, प्रशासनाने याच्यावरती तुमचे वक्तव्य काय ते कृपया कथन करावे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कलम १२० वर स्पष्ट म्हटलेले आहे की, मा. आयुक्त साहेबांनी कारवाई करायची. तर आपले असे व्हायला नको की, सरकारी काम आणि वर्षभर थांब. तर ताबडतोब याच्यावर कारवाई व्हायला पाहिजे.

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णाजीने मेरेको रेकॉर्ड के अंदर ही अताया था की, मोदीजी ये खोपडी जो मिरारोड स्मशानभूमी मे जो लायी गई है उसको सजा बराबर मिलना चाहीए। ऐसा सन्मा. सदस्य राहीत सुवर्णाजीने बताया था। तो उनकी जो बात है वो बराबर है की, उनको बराबर सजा मिलनी चाहिए। तो सजा देना मा. महापौर मॅडम आपके हात मे है। और जो जो इसमे शामील है उनको सबको वॉचमनको भी सजा मिलनी चाहीए ऐसा सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णाजीने बताया था। और जो जो लाये थे उधर उनको भी सजा बराबर मिलना चाहिए।

**मिलन म्हात्रे :-**

मा.महापौर मॅडम, सन्मा. सदस्य अनंत पाटील यांनी आपल्या सर्वांना अगोदर सांगितले की, याची सी.आय.डी. चौकशी करावी. या मताला आम्ही सुध्दा सहमत आहोत. मुद्दा क्र. १ आता जेवढे या सभागृहामध्ये झाले या इथे बसलेल्या सर्व नगरसेवकांना मी प्रश्न विचारु इच्छितो आणि प्रशासनालासुध्दा मुर्धा, राई मोर्वा थेट उत्तन, घोडबंदर, रेतीबंदरच्या बाजूला आजसुध्दा अनेक प्रेत अशी जाळली जातात की, महानगरपालिकेचा दहन दाखला ज्यांच्याकडे नसतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

विषय विषयांतर होतो.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, यांनी उत्तन नाव घेतले, माझा याच्यावर आक्षेप आहे.

**नयना म्हात्रे :-**

आधी तुम्ही बसून घ्या. पहिला त्यांना बोलू द्या मग तुम्ही बोला. मी तुम्हाला विनंती करते की तुम्ही खाली बसा.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दा क्र.१ चे पुरावे माझ्याकडे आहेत. हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. एखाद्या मर्डरची केस कुठल्याही स्मशानभूमीमध्ये जाणूनबुजून किंवा कसे तरी करुन किंवा कोणाला तरी आकस करुन त्याची विल्हेवाट लावली. हिंदु धर्म - हिंदु धर्म असे आपण म्हणतो पण या हिंदु धर्मामध्ये संपूर्णपणे डेड बॉडी अवशेषासकट जाळली जाते. त्याच्या राखेतुन कुठलेही ॲनालिसीस होत नाही. त्यामुळे ती जी बॉडी जाळली जाते त्याच्यातुन जे काही परिणाम म्हणजे ज्याच्यामुळे झाले असेल ते सगळे नष्ट होते. माझ्याकडे त्याचे पुरावे आहेत. मी काय म्हणतो ते संपूर्णपणे गंभीरतेने ऐकूण घ्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

साबीत करके दिखाईये।

**प्रेमनाथ पाटील :-**

विषय विषयांतर होतोय.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला जे बोलायचे आहे ते मी बोलणार. सभा पूढे चालू देणार नाही.

**लिओ कोलासो :-**

लक्षवेधी कुठे आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

सभागृहाची दिशाभूल करण्यात येत आहे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना उत्तर देऊन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला पूर्ण बोलायच आहे. माझ बोलण पूर्ण झाल्याशिवाय कोणीही अनुरोध करु नका. आम्ही मगासपासून गप्प आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचा सभेचा दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दा क्र.२ सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी जे बोलले हे सगळे धार्मिक भावना, अमुख तमुख, मुस्लिम, हिंदु ते सगळे कोर्टामध्ये गेलेले आहे. यांनी तो रिटर्न एवढा चार पान ड्राफ्ट दिला. कोर्टाने ते एक्सेप्ट केले नाही. आमच्याकडे त्याची सर्टीफाईड कॉपी आहे. कशाला कोर्टाचे विषय तुम्ही सभागृहामध्ये करता. सी. आय.डी. चौकशी लावा. त्याच्यामध्ये तुमच्या स्मशानभूमीमध्ये काय काय व्यवस्था आहे ती लवकर उघडी होईल. म्हणजे कुणीही कुठले राजकारण करु नये. आम्ही म्हणत नाही आपल्याला जसे वाटत असेल मनामध्ये ज्या वेळेला स्मशानभूमी या डेवलप करण्याचा विषय या सभागृहामध्ये आला होता तेव्हा आम्ही खुल्या मनाने मुझफ्फर हुसैन साहेबांची स्तुती केलेली आहे. ह्याचे रेकॉर्ड या सभागृहामध्ये आहे. हे लक्षात घ्या. विषय दुसरा, हे जे सगळे तुम्ही म्हणतात हा पूर्णपणे कोर्टाचा विषय आहे. हे जे करतात हे तुमच्या सभापतीने आमच्या विरोधी पक्षनेत्यांनी पत्र दिलेले आहे. त्यांना अधिकार आहे का? कोर्टात जो विषय आहे त्याच्यावर निर्णय...........

**लिओ कोलासो :-**

अधिकार आहे. पूर्ण अधिकार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ऐकूणृन घ्या. याची नोटीस तुम्हाला लवकर येणार आहे.

**परशुराम पाटील :-**

चारदा चार ओळी लिहून आणल्या, त्या आम्हांला शिकवायला नको.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला नोटीस मिळणार आहे आणि याच्या अगांदर या सभागृहामधल विरोधी पक्षनेते पद.............

**परशुराम पाटील :-**

माझ नाव परशुराम आहे. मला परश्या म्हणतात. कोर्टका बादशाह म्हणतात.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य परशुराम पाटील आपलीच स्तुती करुन तुमची पाट तुम्ही बडवून घेऊ नका कळले का. एक लक्षात घ्या. छाती बडवू नका आणि पाठही बडवू नका. माझ स्पष्ट आव्हान आहे विरोधी पक्षनेत्यांना आपल्या कडून जो पत्र व्यवहार आतापर्यंत झालेला आहे, आपण सभागृहाचा नेतेपदाचा चार्ज घेतल्यापासून त्या सर्व पत्रांची इनक्वायरी आम्ही सी.आय.डी. मार्फत करणार कारण ज्यांच्या ह्याच्यावरती तुम्ही तक्रारी केल्या आहेत. त्यानंतर त्याच्यात काय व्यवहार झाले ते आम्हाला महित आहे. तुम्ही बोलायच नाही. शेल्टर हॉटेलच उदाहरण आहे. ॲन्टीचेंबरमध्ये तुम्ही काय व्यवहार केले ते आम्हाला माहित आहे. कळले का. जेव्हा पाटील रट्टे पडतील ना तेव्हासुध्दा पोपटासारखे बोलाल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, विरोधी पक्षनेता पटकन उठून काहीतरी बोलतात. तर त्यांच पण ऐका ना तुम्ही. नंतर तुम्ही बोलू शकता. तुम्हाला नंतर मा. महापौर मॅडम, परवानगी देणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच सभागृहाच भाषण असेल तर आम्ही गप्प होतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला दंड भरायला लागतो. त्याचीपण रितसर चौकशी करा.

**परशुराम पाटील :-**

आपण नावानुसार बोलता म्हणून.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, एक लक्षात घ्या. विषय कवट्यांचा स्थानांतरणाचा आहे तुम्ही इथे पिठासीन अधिकारी आहात. तुम्ही निकाल द्या त्याच्यावर. आम्हाला काही फरक पडत नाही. तुम्ही निकाल दिलात अगदी उत्तम आहे. पण हा जो संपूर्णपणे याच्यावर कवट्या नेण्याचा कुठेतरी मिळण्याचा सिक्युरिटीचा हा सगळा विषय त्या कोर्टामध्ये अगदी लेखी आलेला आहे. आणि ज्या टि.व्ही.च्या गोष्टी करतात त्या टि.व्ही.च्या माध्यमाचा जो संपादक आहे त्यांनी मिरारोड पोलिस स्टेशनला पत्र दिलेले आहे की , आम्ही वृत्तवाहिनीवर दाखवलेले नाही. उलटपक्षी त्या स्मशानभूमीचे जे कोण आहे त्यांनी याची लॅप्टॉप काढून कोर्टामध्ये आणले होते. ते लॅप्टॉप कोर्टाने नाकारले आहे आणि त्या लॅप्टॉपवरती सगळे प्रदर्शन करुन उलट या लोकांनी धार्मिक भावना दुःखवल्याचे आमचे मत आहे. त्या टि.व्ही.वाल्यांनी दिलेले आहे की, आम्ही लेखी दिलेले ते पत्र आहे. मा. उपायुक्त रणखांब साहेब, आपण जो काही खुलासा कराल ह्या सगळ्यांचा विचार करावा आणि आपण आवश्यक खुलासा करावा. आपल्या खुलाशाची आम्ही वाट बघतो. त्या टि.व्ही. वाल्यांनी लेखी पत्र मिरारोडला दिलेले आहे. तुमच्या पक्षाच्यावतीने, आमदारांच्यावतीने जो काही दबाव टाकायचा तो त्या दबावामुळे ज्या काही नगरसेवकांना अटक करायचे ते केले.

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहब, सिर्फ बोलनेका काम मत करो।

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, कसला दबाव टाकला. ऐवढे वाईट वाटून घेऊ नये. आपण खाली बसा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला वाईट वाटले साहेब.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही एवढे कशाला वाईट वाटून घेता. हे सगळे सिद्ध झालेले आहे की, ह्या स्मशानभूमीतुन ज्या कवट्या नेल्या त्या फॉरेन्सिक टेस्टींगसाठी पाठवलेल्या आहेत. फार चिंता करु नका. तुम्ही हा असा बनाव करता.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही बनाव केला.  तुम्ही केलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

समाजात भांडण लावयचे काम करता का तुम्ही?

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही कसे बसणार?

**मा. उपमहापौर :-**

आम्ही तुमची सी.डी. पाहिली. सी.डी.मध्ये तुम्ही कस म्हणता ते आम्ही ऐकलेले आहे. काय जादूचे खेळ करायचे आहेत काय?

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला ते खेळ येतात म्हणून सांगितले.

**मा. उपमहापौर :-**

अरे या समाजामध्ये भांडण लावण्याचे काम करु नका. तुमच्या समाजाचे समर्थन करा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

कसला दबाव टाकणार?

**मिलन म्हात्रे :-**

हा पोलिस स्टेशनचा विषय आहे. हा कोर्टामध्ये जे काय बोलतो ते सगळे लिहलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

कोर्टामध्ये आहे ते सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे तुम्ही सांगायची गरज नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब आम्ही सांगायची गरज आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही सांगितल्याने होत नाही. तो एक नगरसेवक राहित सुवर्णा आणि शानु गोहिल यांना लॉकपमध्ये टाकलेले आहे हे सगळ्यांना माहित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्याला बसवायला पाहिजे होते. हा विषय तुम्ही सांगायची गरज नाही.

**नयना म्हात्रे :-**

चोरी नाही केली.

**मा. उपमहापौर :-**

असे आता जे काही आहे ते तुम्ही सांगायची गरज नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुमचे मिस्टर पण होते त्याच्यामध्ये.

**मिलन म्हात्रे :-**

अहो आता केले. तुम्हाला ते पुढे होईल.

**नयना म्हात्रे :-**

आम्ही कोणाचे पैसे खाऊन आलो नाही.

**मिलन म्हात्रे :-**

लक्षात ठेवा. अटक केली काय बोलता? तुम्हाला सुध्दा बोलू का?

**नयना म्हात्रे :-**

आम्ही भ्रष्टाचार करुन अटक नाही झालो हे विसरु नका.

**मा. उपमहापौर :-**

अहो कसले अटक करता आम्हाला.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मिटींगमध्ये खोटी कामे करता.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही हे धंदे करत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला उपमहापौर साहेब कशावरुन दादागीरी करतात. आम्ही पण या सभागृहाचे सदस्य आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

हे ॲग्रीमेन्ट खोटे केलेले आहे. ते सगळ करतात आरोपी नाव बदल तर नाव बदलणार. तुमची हिम्मत असेल तर ॲग्रीमेन्ट आम्हाला समोर द्या.

**मा. उपमहापौर :-**

तुमच नाव मिलन नंतर काय करायचे ते विचार करुन ठेवा. तुम्ही नाव बदलायच असेल तर बदला बारश्याला आम्हाला बोलवा. आम्ही येवू. तुम्ही चिंता करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही होता पण झालास विटनेस. तुम्ही आहात त्यांच्या खोट्या कामामध्ये.

**मा. उपमहापौर :-**

चिंता करु नका. तुमच नाव बदलायच असेल ना तेव्हा बारशाला बोलवाआम्हाला. आम्ही येवू बारशाला.

**मिलन म्हात्रे :-**

कळल का? तुम्ही दोघही विटनेस आहात. आतमध्ये केले नाही तर नावाचा मिलन म्हात्रे नाही. समजले काय तुम्ही?

**मा. उपमहापौर :-**

नावाच काहीही व्याप नाही. आमच काहीही हरकत नाही. तुम्हाला जे नाव आवडेल ते ठेवा तुम्ही.

**मिलन म्हात्रे :-**

अरे सगळे करेन मी. माझ्या लक्षात आहे आणि फक्त तुम्ही केलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, यांना जे नाव आवडेल ते ठेवा. परंतु या शहराच वाटोळं करण्याचे काम केले आहे आणि आता काय वकीली करतात काय?

**मिलन म्हात्रे :-**

मी ॲग्रीमेन्ट बोलतो. ॲग्रीमेन्ट समोर ठेवा.

**नयना म्हात्रे :-**

आम्हाला वकीली करायची गरज नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

सभागृहमे भडकानेका तुमने काम किया.

**मिलन म्हात्रे :-**

ॲग्रीमेन्टची कॉपी आहे आमच्याकडे.

**मा. उपमहापौर :-**

सभागृहात काय होत नाही म्हणून भांडण लावता का तुम्ही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

एक खोपडी ने जेल की हवा खिलाई है। खोपडी का सम्मान करिये और उसको निलंबित करिये।

**मा. महापौर :-**

बसा खाली.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझ बोलणे पूर्ण झालेले नाही. मी बसणार नाही. माझ म्हणणे पूर्ण झालेले नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

या महापौर मॅडम, मिरारोड मे खोपडी लाके रखना चाहिए।

(सभागृहात गोंधळ)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

बाहर निकालिए।

**मिलन म्हात्रे :-**

त्या त्यांच्या तिकडे हीस्ट्री पण नाही. त्यांना चढवले बोलायला.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

उनको बाहर निकालिए नही तो हम लोग बैठेंगे नही। सब लोग खडे हो जाईए। सेक्शन १३ के अंतर्गत बाहर निकालिए।

**मिलन म्हात्रे :-**

सेक्शन म्हणजे आपल्यामध्ये आहे हे काय शिकवतात आपल्याला. तुम्ही माईक बंद करुन टाका आमचा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मै फिर पढता हू लज्जास्पद वर्तन केल्यानंतर........

**नयना म्हात्रे :-**

माईक बंद करा. आम्ही बोलायला ऐकणार नाही. आम्ही बोलणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही कारवाई करा. निलंबित करा. सभागृहातुन बाहेर काढण्यात यावे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, निलंबित करा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, उनको हाऊससे निकालिए।

(सभागृहात गोंधळ)

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही रुलिंग करा. आम्ही बसणार नाही.

**लिओ कोलासो :-**

सेक्शन १३ यांना लागू होतात की नाही हे तपास करा.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही लोकांना शहाणपण शिकवा बस.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, निलंबित करण्याची कारवाई करा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, जर तुम्ही स्मशानामध्ये गेले असता तर.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, निलंबित करण्याची कारवाई करा.

**मा. उपमहापौर :-**

गोष्ट वेगळी आहे. तुम्हाला भांडायच काही कारण नाही. या शहराच वातावरण बिघडवण्याचे काम तुम्हाला देऊन टाकले.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपमहापौर साहेब, थोड जरा खर बोला. तुमच जे ॲग्रीमेन्ट बनले ना ते समोर पटलावर ठेवा. त्याचे वाचन करा.

**मा. उपमहापौर :-**

वाचन करुन घ्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

मग बोलू ना.

**मा. उपमहापौर :-**

पण या कवट्या घेवून जायचे कारण काय? आणि कसली? अहो सव्वा वर्षापुर्वी, सव्वा सहा वर्षाच्या मुलीचे प्रेत गाडले होते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही राजकीय दबावामुळे जरा आतमध्ये घातल ना. आम्ही तर बाहेर काढायची हिम्मत पण ठेवली.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही संपूर्ण सभागृह मागणी करतो की, आमच्या नगरसेवकांनी कारवाई करावी. प्रशासनाने काय कारवाई केली त्याचाही अहवाल देण्यात यावा.

**प्रभात पाटील :-**

सर्वांच्या मतानुसार सभागृह चालणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय बोलतो ते जरा ऐकून घ्या.

**मा. उपमहापौर :-**

मा. आयुक्त साहेब, प्रशासनाने काय कारवाई केलेली आहे. त्याबद्दल खुलासा व्हावा.

**मोहन पाटील :-**

खुलासा व्हावा हे बरोबर आहे. पण ज्यांनी खोपड्या उचलल्या ते आपल्या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांची विचारणा करा ना.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला तुमची परवानगी पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

आणि आतापर्यंत सगळ्यांना नॉलेज शिकवतात.

**मोहन पाटील :-**

प्रत्यक्ष त्यांची ती आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब त्या ठिकाणी नव्हते. सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा यांनी खोपड्या उचलल्या त्याचे दुरदर्शनने दाखवलेले आहे. त्यांचे मत काय?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, विरोधी पक्षनेत्याला दिले की, गटारीची पार्टी होती म्हणून त्याच्यावर विरोधी पक्ष नेत्यानी काय ॲक्शन घेतली?

**मोहन पाटील :-**

त्यांचे मत घ्या ना इथे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, तुमचे मिस्टर पण शामील सामील आहेत.

**नयना म्हात्रे :-**

त्यांना तुम्ही का बोलत नाही. सामील आहेत म्हणून? विरोधी पक्षनेता तुम्ही........

**परशुराम पाटील :-**

त्यांनी खोपड्या नेल्या त्याच्या विषयी बोलायच, तुमचा काय अधिकार आहे बोलायचा?

**नयना म्हात्रे :-**

तुम्हाला अधिकार आहे का बोलायला?

**परशुराम पाटील :-**

आम्हाला अधिकार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या सन्मा. सदस्या नयना म्हात्रे..........

**नयना म्हात्रे :-**

तुम्हाला विरोधी पक्ष म्हटले तर भांडता कशाला.

**परशुराम पाटील :-**

तुम्हाला काय माहिती ह्याच्यातल.

(सभागृहात गोंधळ)

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांचे मिस्टर पण याच्यामध्ये सामील आहेत. त्यांच्यावर पण कारवाई करा.

**नयना म्हात्रे :-**

विरोधी पक्षनेता म्हणून.........

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, अब आपही बताइये.........

**नयना म्हात्रे :-**

कधी पण तुम्ही विरोधी पक्षामध्ये, कधी सदस्यांमध्ये बोलता का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, रुलिंग तो दिजिए कमसे कम।

**एस्. ए. खान :-**

जी जी माणसं त्या केसमध्ये इन्वॉल असतील त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

महत्वाच्या लफड्यामध्ये तुम्ही गैरहजर राहणार. बसा खाली.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे परत त्या माणसाकडे कधी गेलोत का? ते त्याला स्मशान कुठे आहे ते माहित आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम बोलणार कोणी सांगणार नाही. तुम्ही सांगा. तुम्ही सदस्य बोला बसा खाली म्हणून पाठीमागून कोणी बोलले ते चालणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

म्हणजे तुम्ही बोललात ते चालेल तुम्हाला आणि आम्ही बोलणार ते चालणार नाही तुम्हाला.

**प्रफुल्ल पाटील :-**

सर्वांना अधिकार आहे बोलायचा.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही मोठे मोठे आरोप लावता तर ते तुम्हाला चालेल का?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम आहेत रुलिंग देण्यासाठी.

**प्रफुल्ल पाटील :-**

बोलायचा सर्वांना अधिकार आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, कोर्टाचा विषय तुम्ही सभागृहामध्ये आणता कसा काय? त्या घंघाळेचा कोर्टाचा विषय तुम्ही का नाही आणला? तुम्हाला तो घंगाळेचा विषय फालतु समजतात का मग?

**मिलन म्हात्रे :-**

मेयर साहेबांनी इतर विषयामध्ये रुलिंग दिलेले आहे की, हा विषय बाद आहे.

**नयना म्हात्रे :-**

घंघाळेचा विषय कोर्टामध्ये गेला तेव्हा एकही सन्मा. सदस्य बोलला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हिम्मत असेल तर कोर्टामध्ये महापालिकेने आपली बाजू मांडावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, कारवाई काय करणार ते आम्हाला सांगा.

**मोहन पाटील :-**

कारवाई तुम्ही नंतर करा. परंतु जे स्वतः दोषी आहेत ज्यांनी खोपड्या उचलल्यात.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील असे बोलू नका?

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

तोंड संभाळून बोला जरा.

**एस्. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, जे जे खोपडी कांडमध्ये इनवॉल असतील त्यांच्या विरुध्द कारवाई करा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला काही अक्कल आहे का? तुम्ही पहिले कोर्टात जाऊन या आणि मग बोला. कशाला इथे काय आहे. दगड फोडायचे आहेत का? केशवजी तुम्ही बोलताना

**मोहन पाटील :-**

याचा खुलासा आम्ही करतो. ते योग्य असेल की अयोग्य खोपडी उचलल्या त्या कोणी उचलल्या?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ॲन्टी चेंबरच सांभाळा.

**नयना म्हात्रे :-**

खोपड्या जर उचलून मिरारोडमध्ये नेल्या मग आपला तिकडचा वॉचमन काय करत होता?

**मोहन पाटील :-**

ज्याने खोपड्या उचलल्या ते इथे हजर आहेत ना.

**नयना म्हात्रे :-**

तो वॉचमेन कुठे गेला होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुमच्या मिस्टरांनी वॉचमनला बाजूला नेलं होत.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, पोलिस स्टेशनमे अपने कर्मचारीने स्टेटमेन्ट दिया है की, खोपडी वो लोग लेके गये उधर से।

**नयना म्हात्रे :-**

अकरा वर्षाच ॲग्रीमेन्ट बनवल ते सभागृहामध्ये आम्हाला आणून दाखवा. अकरा-अकरा वर्षाचा करार करता का तुम्ही? ठेकेवाल्यांना पण तुम्ही दोन वर्षाच टेंडर तुम्ही का दिल नाही.

**एस्. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, जे जे खोपडीकांडमध्ये इन्वॉल असतील त्यांच्या विरुद्ध कारवाई करा. मिरारोडला का नेली त्यांनी. मिरारोडचीच भेटली का स्मशानभूमी? मिरारोडला ते का नेले त्याची पण चौकशी होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, एखाद्या विषयावरती चर्चा करताना सभा कामकाज नियम बाजूला सारता कामा नये. माझी सभागृहाला आणि आपल्याला विनंती आहे की, सभा कामकाज नियमामध्ये ज्या बाबी न्यायप्रविष्ठ आहेत. त्या बाबींवरती निर्णय काय चर्चासुध्दा करता येत नाही. कृपया याची आपण जरुर दक्षता घ्यावी. आणि या विषयावरती पुढे काय ठरवायच ते ठरवा. कारण ह्याच्यावरती कुठली चर्चा सुध्दा घेता येणार नाही आणि याच्यामध्ये...........

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल पाटील साहेब, चूकीची माहिती देता. आम्ही असे न्यायालयाला किंवा तपासायला विरोध करत नाही. पण या शहराच्या विकासामध्ये, हितामध्ये काम चालू असताना शहरामध्ये अशांतता पसरवण्याचा कट रचला गेला त्याच्यामुळे शहराची बदनामी झाली. त्या विषयावर शहराचे प्रतिनिधी बोलत आहेत. आम्ही न्यायालयाचा कुठला अवमान करत नाही किंवा न्यायालयाच्या कामकाजाला विरोध करत नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

न्यायालयका का काम अलग है और यहॉ का काम अलग है।

**मा. उपमहापौर :-**

आम्ही प्रत्यक्ष सन्मा. सदस्य रोहीत सुवर्णा जे या विषयामध्ये सभागृहामध्ये वारंवार बोलत असायचे ते ही आहेत. त्यांनी सांगावे की, हे चूक आहे, अस झालेच नाही म्हणून त्यांनी माझ्यासमोर सांगावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठल्याही न्यायप्रविष्ठ बाबीमध्ये कुठल्याही आरोपीला किंवा कुठल्याही फिर्यादीला असे आपण सांगु शकत नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपके माननेसे नही चलेगा।

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठल्याही आरोपीला किंवा कुठल्याही फिर्यादीला असे आपण सांगु शकत नाही. हे काय इथे चूकीचे कोणी नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, त्या सन्मा. सदस्याला खाली बसवा तुम्ही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. आयुक्त साहब, पुछीए और. उन्हे शोकॉज नोटीस दिजिए।

**प्रफुल्ल पाटील :-**

न्यायालयाचे बोलला तर तुम्ही विटनेस द्या ना. तुम्ही अजून साक्षी द्या, सगळ्या द्या. तुम्ही कसे काय आरोपीला किंवा फिर्यादीला बोलायला सांगणार. आरोपीला किंवा फिर्यादीला बोलता येत नाही. ह्याच्यामध्ये न्यायप्रविष्ठ बाबी आहेत. उगाच काहीतरी जास्त वेळ घालवता. तुम्हाला असे वाटले तर ठराव करा न्यायालयाचा अपमान न करणारा ठराव करुन घ्या ना. संपवून टाका ना. मेजॉरिटी आहे ना. करुन टाका.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक ओमप्रकाश अग्रवाल यांनी लक्षवेधी दिलेली आहे आणि लक्षवेधीवर सभागृहातल्या अनेक सन्मा. सदस्यांनी त्याच्यावर चर्चा केली व तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. आमचा प्रश्न ऐवढाच होता. भारतीय जनता पार्टीच्या वतीने की, ही पंचायतीचे नगरपरिषद, नगरपरिषदेच्या नंतर महापालिकेत रुपांतर झाले. महापालिकेत रुपांतर झाल्यानंतर महापालिकेचे विविध कामकाज, विविध खात्याच्या कामकाजाबद्दलची आमची चर्चा आहे. कवटी कोणी नेली? कोणाची नेली? बालकाची नेली, वयस्कर माणसाची नेली, आदीमाणसाची नेली म्हणजे दोन महिन्यापूर्वी माणसे मेलेली की आताच्या माणसाची नेली हा विषय जर कोर्टात गेला असेल तर कोर्टात निकाल लागेल. आमचा प्रश्न आहे की, ज्या एजन्सीला ती एजन्सी दिलेली आहे ते फक्त भाईंदर पश्चिमेचे स्मशान असे नाही. एजन्सीच्या नावाखाली महापालिकेतुन कोट्यावधी रुपयाचे, लाखे रुपयाचे दरमहा पेमेन्ट होते. त्या एजन्सीचे कर्तव्य काय? आम्ही जेवढे समजतो त्यातुन एवढे समजतो की, जर ती महापालिकेने डेप्युट केलेली एजन्सी होती. त्या प्रसंगी घडलेली घटना त्या एजन्सीच्या वतीने मा. आयुक्तांच्या समोर येवून ती कागदावर नीट आणणे गरजेचे होते. हा साधा विषय नाही. आपआपल्या पक्षाने जर मलाही समजले नाही की, सत्ताधारी पक्षाचे सगळे लोक उभे राहीले. कोणाकडे न्याय मागता की, त्यात मागण्याची गरज आहे का? तुमची संख्या आम्हाला माहित आहे ना.

**प्र. सचिव :-**

सुचनेवर पुन्हा चर्चेला सुरुवात करु या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, नगरसेवक ओमप्रकाश गारोडीया यांनी दिलेल्या लक्षवेधीवर चर्चा सुरु असताना सभागृहातल्या सर्व नगरसेवकांनी आपआपल्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. लक्षवेधी देण्यामागे भारतीय जनता पार्टीची स्पष्ट भूमिका आहे. जेव्हा या महापालिकेच्या नीट चाललेल्या कामकाजामध्ये एखादी घटना घडते आणि त्याच्यामध्ये महापालिकेची बदनामी होते आणि सभागृहाची बदनामी होते, किंवा कायद्यात सोयीचा प्रश्न उभा राहतो. असे चित्र ज्यावेळी उभे राहते. या गंभीर विषयावर आपआपल्यापरीने सर्वांनी आपली मते मांडलेली आहेत. आम्ही जो विषय दिलेला आहे त्याच्यामध्ये स्पष्ट असे आमचे म्हणणे आहे की, महापालिकेची जी व्यवस्था आहे, मग ती स्मशानभूमीतली असू दे किंवा अन्य ज्या ज्या ठिकाणी सिक्युरिटी म्हणून देऊन जी व्यवस्था आपण अबाधित राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या सिक्युरिटीच्या कामकाजाबद्दल आम्ही संदेह व्यक्त केलेला आहे की, त्या ठिकाणी जेव्हा सिक्युरिटी हजर होती तर त्या सिक्युरिटीच्या समोर त्या कवट्या काढून नेल्या असे म्हणणे आहे. त्या कशा नेल्या? नेल्या तर त्या सिक्युरिटीच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेला का कळवले नाही? कळवले नाही इथपर्यंत हा एक वेगळा विषय आहे. नंतर त्याचे प्रपोगंड झाल्यानंतर पोलिस स्टेशनमध्ये आयुक्त किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी कोणतीही परवानगी न घेता पोलिस स्टेशनमध्ये स्टेटमेन्ट कशी दिली? ती स्टेटमेन्ट दिल्यानंतर जेव्हा पेपरमध्ये हे सगळे आले त्यानंतर आयुक्तांनी कोणती भूमिका घेतली? ह्याचा कुठेही उहापोह झाला नाही. ह्याच्यावर जी चर्चा झाली तेव्हा जो तो आपआपल्या परिने आपला विषय मांडत होता. कोण म्हणते कीट ते प्रेत पायाच्या बाजूने खोदले. मग ते पाय आहेत हे लक्षात आल्यावर डोक्याच्या बाजूने खोदले. डोक्याच्या बाजूने खोदते वेळी त्याच्यावर केस होते, तर हे नक्की झाले की, ती बॉडी कधी दफन केली गेली, ती कधी काढली गेली होती? तत्काल चार दिवसापूर्वीची होती की पंधरा दिवसापूर्वीची होती? की महिन्यापूर्वीची होती? आणि जी बॉडी दफन केलेली होती असे जर ते अधिकृत असेल तर त्याचा तो अधिकृत रेकॉर्ड आहे का? ही बॉडी बेवारस होती किंवा ह्या बॉडीचे कोण नातेवाईक मिळालेच नाही किंवा असे मघाशी निवेदन केले गेले की, पोलिसांच्या वतीने जी बेवारस बॉडी असते, बेवारस म्हणजे त्याचा मालक मिळत नाही, त्याचे नातेवाईक मिळत नाहीत, त्याचे वारस मिळत नाहीत म्हणून पोलिस ती बॉडी दफन करते. पण त्याचा रेकॉर्ड असतो. त्याचा रेकॉर्ड इन्टीमेट ह्या महापालिकेला केले होते की नाही? की अमूक ठिकाणी मिळालेली बॉडी त्याला अजून कोणी वारस मिळालेले नाही म्हणून दफन केलेली आहे किंवा कोणी तरी आणून ती गाडली गेली. आता ह्याच्यामध्ये दोन तीन प्रश्न उभे राहिले. मग ती बॉडी आणली होती ती कोणी आणली होती? बॉडी आणली असेल तर पोलिसांनी आणली असेल, तो रेकॉर्ड मिळाला पाहिजे आणि पोलिसांनी आणली नसेल तर दुसरे कोणी गाडले असेल, तर ती बॉडी कोणाची गाडली होती आणि कशी गाडली होती? हे सगळे होते वेळी जेव्हा केस जर आहेत असे सांगितले तर ती बॉडी जुनी नव्हती. आमचा प्रश्न असा आहे की, ती बॉडी जी आहे त्याचे कवट्या काढल्यानंतर त्या दुसऱ्या स्मशानभूमीत जाऊन त्याचे जे षडयंत्र, त्या षडयंत्राशी भारतीय जनता पार्टीचा कोणताही संबंध नाही. त्याच्यात आम्हाला रुचीही नाही. आम्हाला एवढेच म्हणायचे आहे की, त्या षडयंत्रामध्ये

या शहराची जी बदनामी झालेली आहे आणि बदनामी होते वेळी जेव्हा सत्ताधारी पक्ष म्हणतोय, ही जी मागणी करते. त्यांची काय मागणी होती ही त्यांनाच समजली का नाही ते आम्हाला समजले नाही. पण दोन्ही पक्षाचे लोक उभे राहून जी मागणी करत होते, रुलिंग द्या, रुलिंग द्या ते कसले रुलिंग मागत होते. त्यांना तुम्ही रुलिंग द्यायचे आहे. आम्ही एवढीच अपेक्षा करतो की, हा एवढा मोठा अत्यंत जसे सांगितले जाते त्यात काही तथ्य आहे की, येथे जातीय दंगल होऊ शकली असती. कायदा सुव्यवस्थेचा प्रयन उभा राहू शकला असता. पण त्यातले खरे काय आहे? की जेव्हा सांगितले की, ती फिल्म दाखवली गेलीच नाही. ज्याने व्हिडीओ शुटींग केली ती फील्म दाखवलीच गेली नाही मग दाखवली गेली ती फिल्म किती वेळा शुटींग केली गेली होती. ह्या सगळ्या गोष्टींची शहानिशा आयुक्त साहेबांनी करणे गरजेचे आहे. अशी आमची भारतीय जनता पार्टीची स्पष्ट मागणी आहे. हा साधा विषय नाही. ह्या विषयामधून, हा विषय सुरु करणाऱ्याला डोके कुठून आले? त्याचा मध्यान्ह कुठे झाला? नाहीतर ते प्रसिध्दी माध्यमाकडे कसे गेले? प्रसिध्दी माध्यमाकडून ते प्रसिध्द न होता काही नगरसेवकांनी असे सांगितले की, दबावाखाली ती केस रजिस्टर केली गेली आणि दबावाखाली केस रजिस्टर करते वेळी ज्यांनी केस दिली तेच म्हणतात की, कवट्या कशा गेल्या? असे जे काही नगरसेवकांचे निवेदन झालेले आहे. हे सगळे आमच्या दृष्टीने संशयास्पद आहे असे आमचे मत आहे. त्यामुळे या शहरात घडलेला आजपर्यंत भाईंदरच्या इतिहासामध्ये ही घटना घडलेली नव्हती. म्हणजे जेव्हा पंचायत राज्य चालायचे, जिथे दफन दाखला दिला जात नव्हता. दहन दाखला दिलाच नव्हता. कोणीही गावातली माणसे, गावपंच मंडळ किंवा गावकरी जाऊन त्याची विल्हेवाट लावली जात होती अशा वेळीसुध्दा अशी कोणती घटना घडली नव्हती. आणि आता जेव्हा सक्षम प्रशासन काम करते त्यावेळी अशी घटना घडल्यामुळे आमच्या पक्षाची मागणी आहे की, त्याचे नीट सविस्तर चौकशी करुन कोणी आता मघाशी म्हटले की, तो कोर्ट दप्तरी आहे. त्याचे मॅटर कोर्टामध्ये आहे. कोर्ट मॅटर जरी असेल तरी ते प्रशासकीय कामकाज आहे. त्यात आमचे असे स्पष्ट म्हणणे आहे की, ज्या एजन्सीने त्याच्यात कसूर केलेला आहे, जी सिक्युरिटी एजन्सी काम करते त्यांनी आयुक्त साहेबांना ते कळवले नाही अशी आमची खात्री आहे. त्याने आधी पोलिस स्टेशनला स्टेटमेन्ट दिली. ती दिलेली स्टेटमेन्टसुध्दा आम्ही जे तुम्हाला सांगतोय त्याच्यावर तुम्हला नंतर निवेदन करायचे आहे. आम्ही बसल्यानंतर तुम्ही निवेदन करणार असाल, तुमच्याकडे जे काही पेपर आहेत त्याच्यावरुन जसे सभागृहाने वेगवेगळ्या पक्षाच्या नगरसेवकांनी, वेगवेगळ्या सभासदांनी व्यक्तीगत मागण्या केलेल्या आहेत, त्याच्यावर तुम्हाला रुलिंग द्यायचे आहे.

**आसिफ पटेल :-**

मुद्याचे बोला. आपणाला जे मत मांडायचे आहे ते मांडा. सभागृहाचा वेळ कशाला वाया घालवता.

**रोहिदास पाटील :-**

काय बोलल्यानंतर सभागृहाच्या लक्षात येईल? आमची लक्षवेधी जर तुम्ही नीट समजावून घेतली असती तर सभागृहाचा वेळ गेला नसता. सभागृहाने जी सन्मानीत मागणी केलेली असेल त्याचा आयुक्तांनी, महापौरांनी आदर करायचा आहे. कारण ह्या शहराच्या दृष्टीकोनातुन ही चांगली घटना नाही. पण ही सगळी अशी घटना घडूनसुध्दा कोणालीही त्याचे सविस्तर उत्तर मिळत नाही किंवा समाधानकारक निर्णय होत नसेल तर ती गंभीर बाब ठरेल. ह्या गोष्टी या शहराला हानिकारक ठरतील आणि असे त्यात दोन-चार तथ्य आहे. खरोखरच कोणी खोदले ह्याच्यात तथ्य आहे. खरोखरच त्या कवट्या कोणी नेल्या त्याच्यात तथ्य आहे. कोण म्हणते की, त्या कवट्या घेऊन उभे होते त्याच्यात तथ्य आहे. कोण म्हणते की पोलिस स्टेशनला दबावातून केस रजिस्टर झाली.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जे काही म्हणायचे आहे ते थोडक्यात म्हणा.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला जे म्हणायचे आहे ते तुम्हाला समजेल ना. आम्ही बोलतोस ते तुम्हाला समजेल ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. आपणाला जे बोलायचे आहे ते आम्हाला समजले आहे. याबाबत प्रशासन खुलासा ते आपण बसून घ्या. आपण प्रशासनाचे निवेदन ऐका.

**रोहिदास पाटील :-**

आमची मागणी स्पष्ट आहे की, त्या सिक्युरिटी एजन्सीने ह्या कामात कसूर केलेली आहे. त्याच्यावर कार्यवाही करणे गरजेचे आहे. आमचे असे स्पष्ट म्हणणे आहे की, अति महत्वाचा विषय असल्या कारणाने, संवेदनशील असल्या कारणाने त्याची नीट चौकशी होऊन ते रेकॉर्डवर यायला पाहिजे. नाहीतर तुमच्यावर आम्ही कितपत विश्वास ठेवायचा? चांगल्या विषयातसुध्दा तुम्हाला त्यातले ताळतम्य किंवा त्यातले पथ्य समजत नसेल तर हा अति महत्वाचा विषय आहे. आम्ही सांगतो ना तुम्हाला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, दोन तास या विषयावर चर्चा केली. प्रशासन ह्याचा खुलासा करेल. जेवढे गांर्भीय आपल्यला आहे तेवढेच गांर्भीय पूर्ण सभागृहाला आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तेच सांगतो.

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. प्रशासन याबाबत खुलासा करेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, याबाबत आमच्या गटनेत्यांनी याबाबतीमध्ये जो खुलासा मागायचा आहे तो आपण सभागृहाला देणारच आहात. एक दोन गोष्टी या सभागृहामध्ये मांडणे गरजेचे आहे. प्रथम जेव्हा ही घटना घडते आणि काय कारण आहे ते समजत नाही. आपण सिक्युरिटी एजन्सीला वाचवण्याच्या प्रयत्न इथले काही नगरसेवक करत आहेत. आमचा कोणावरही आक्षेप नाही. व्यवस्थेवर आक्षेप आहे. मग नगरसेवक सुरक्षा करेल त्याची नाही. एक चोर चोरी करुन जाते आणि पोलिस, प्रशासन तिकडे आहे आणि आपण सांगितले की, पोलिसाचे काहीच काम नाही असे सभागृहाचे म्हणणे आहे का? असे नाही. दुसरी गोष्ट मा. महापौर मॅडम, भाईंदर पश्चिमेच्या स्मशानभूमीवर कुठलेही प्रेत जाळायला जातो हे मी तुमच्या माहितीसाठी सांगतोय, तिथे सर्व व्यवस्था महापालिकेची असते. तिथे लाकडे आमच्या एका सामाजिक संस्थेमार्फत पुरवले जातात. ती संस्थाही जोपर्यंत महापालिकेचा दहन दाखला मिळत नाही तोपर्यंत ते दाखल्याची रसीट फाडत नाहीत. एवढी दक्षता ती संस्था घेत आहे. दुसरी गोष्ट आता जेव्हा पोलिसांचा विषय आलेला आहे. महापालिकेचा जन्म मृत्यु नोंदणीचे कार्यालय आहे. त्यासाठी आपण एवढा मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. जसे आपण जन्ममृत्युसाठी एवढे लाखो रुपये खर्च करतो, पोलिस प्रशासनाचे गांर्भीय आहे. ह्यानंतर पोलिसांना अशी ताकीद द्यावी की, जर तिथे बेवारसी प्रेत जाळण्याचा प्रयत्न केला किंवा तिथे जाळायला गेले किंवा दफन विधी करायला गेले ह्याची सविस्तर माहिती महापालिकेच्या प्रशासनाकडे नोंद होऊन तिथे गेली पाहिजे. आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे दुःखाची गोष्ट अशी वाटते की, एका साध्या विषयावर भारतीय जनता पार्टीने न करता एक निषेधाचा ठराव ह्या सभेत देत आहे आणि एवढी परिस्थिती या महापालिकेत झाली. पण कुठल्याही सत्ताधारी पक्षाला या महापालिकेमध्ये घडलेल्या प्रकरणावर निषेध करता येत नाही. ही गंभीर आणि दुदैवाची बाब आहे. ह्याचा आम्ही आज निषेध करतो.

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये बऱ्याच वेळापासून या विषयावर गांभीर्यपुर्वक चर्चा चालू आहे, त्या संदभामध्ये मा. महापौर मॅडम ह्यांनी आदेश दिल्याप्रमाणे मी आपल्याला सभागृहामध्ये खुलासा करीत आहे. ही जी घटना घडलेली आहे. या घटनेच्या बाबतीमध्ये जे कोणी सुरक्षा रक्षक आहेत किंवा जी एजन्सी आहे. त्या एजन्सीने महानगरपालिकेला पत्र पाठवून एक तारखेला कळवलेले आहे आणि ही जी काय घडना घडलेली आहे त्या घटनेच्या संदर्भामध्ये पोलीस स्टेशनला सुध्दा याबाबतीमध्ये तक्रार झालेली आहे आणि पोलीसांमार्फत एफ. आय. आर. ची नोंद करुन त्याच्यावर पुढील कार्यवाही त्यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे. पुढील कार्यवाही काय करण्यात आली त्याबाबतीतला अहवाल आज माझ्याकडे उपलब्ध नाही. तरीसुध्दा तो उपलब्ध करुन घेऊन याबाबत मी आपल्याला माहिती देऊ शकेन. कारण त्यांनी कोर्टामध्ये केस दाखल केली किंवा आणखीन पुढे ज्या ज्या प्रोसेस आहेत त्या केल्या किंवा नाही. त्याची आपल्याला माहिती नाही. परंतु, जे काही पेपरमध्ये वाचले त्याच्यावरुन आपल्याला माहिती कळली की, पोलीस डिपार्टमेंटने कोर्टामध्ये केस दाखल केलेली आहे आणि त्याच्यावर संबंधिताची जामीनावर सुटका करण्यात आलेली आहे. प्रशासनाच्या बाबतीमध्ये जर म्हणत असाल तर प्रशासनाने याबाबतीमध्ये कायदेशीर सल्लागारांकडे तेव्हाच पत्र पाठवून याबाबतीमध्ये आम्हाला कायदेशीर मार्गदर्शन करावे की, जे कोणी संबंधित असतील त्याच्यावर आपल्याला या महानगरपालिकेच्या कायद्याच्या अंतर्गत आपल्याला कुठल्या प्रकारची कार्यवाही करता येईल? त्यांच्याकडून आपल्याला अद्याप खुलासा आलेला नाही. तो खुलासा आली की, तो खुलासा मी आपल्या सन्माननीय सभागृहासमोर ठेवीन.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, सुरक्षा एजन्सीने आपल्याला कोणत्या तारखेला ही घटना घडली म्हणून पत्र लिहिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

एक तारखेला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही घटना घडली कधी? किती वाजता घडली? किती तारखेला?

**मा. आयुक्त :-**

त्यांचे जे पत्र आलेले आहे ते वाचून दाखवू का? एक तारखेला त्यांनी प्रशासनाला कळवलेले आहे.

**अशोककुमार रणखांब साो :-**

दि. २५ आणि ३० तारखेला ती घटना झाल्यानंतर त्यांनी असे पत्र दिले की, दि कमिशनर

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, किती तारखेला घटना घडली?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.)) साो :-**

ऑकरन्स ऑफ दि अफेन्स डे २५ ऑगस्ट, २००५ ॲण्ड ३० ऑगस्ट, २००५.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्याला कळले कधी, तर १ तारखेला जी पोलीस तक्रार झालेली आहे, आपल्या ह्या अधिकाऱ्याकडून विचारपूस करुन ती आपल्या संबंधित अधिकाऱ्याच्या उपस्थितीत झाली आहे का? की तिथे परस्पर पोलीस येऊन गेलेले आहेत. त्याच्यातली तारीख किती आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, हे काय झाले आणि ते काय झाले. हे कोर्ट नाही. सन्मा. सदस्यांना ह्या महापालिकेच्या प्रशासनावरती, पदाधिकाऱ्यांवरती कुठल्याही स्वरुपाचे आरोप करायचे असतील ते बिनदीक्तपणे करायला पाहिजे. परंतु, अशा स्वरुपाचे कामकाज त्यांनी नाही करायला पाहिजे. त्यांनी लक्षवेधी दिलेली आहे. विस्तृतपणे त्यांनी निवेदन दिलेले आहे. त्यांच्यावतीने त्यांच्या गटनेत्यांनी जवळजवळ अर्धा, पाऊण तास बोलले आहे. अशा पध्दतीने एक-एक चीट चीट प्रश्न विचारुन या सभागृहाचा वेळ फुकटात घालवणे हे बरोबर नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहनेते साहेब, जेव्हा एक गोष्ट .....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या लक्षवेधीचे उत्तर आपल्याला मिळालेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, अजून उत्तर मिळालेले नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे कसे बसणार. २५ तारखेला घटना घडलेली आहे आणि १ तारखेला सिक्युरिटी आपल्याला पत्र देत आहे आणि आपण सांगता खुलासा झालेला आहे. ७ दिवसानंतर तो सिक्युरिटीवाला आपल्याला पत्र देत आहे आणि आपण सांगता खुलासा झालेला आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहनेते बोलते है की ये कोर्ट नही है। सदन की महिमा भी कोर्ट से कम नही है।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सिक्युरिटीने उशीरा जरी कळवले असले तरी त्यांनी त्यांच्या पध्दतीने जे कळवायला पाहिजे ते कळविलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अशा पध्दतीने जर तुम्ही सभागृह सिक्युरिटीला वाचवण्याचा प्रयत्न करत असाल तर ही सभागृहाची गंभीर बाब आहे. म्हणजे ज्या पध्दतीने ठेकेदारांना पैसे देण्याचा प्रकार झाला. अशाच पध्दतीने तुम्हाला सभागृह चालवायचे आहे का? आमची लक्षवेधी सुरक्षा एजन्सीवर होती. आम्हाला काही निशब्द बोलायचे नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला उत्तर मिळालेले आहे. आपण बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उत्तर काय मिळालेले आहे? म्हणजे आपण काहीच कार्यवाही करणार नाही. सुरक्षा एजन्सीने जे केले ते बरोबर केलेले आहे असे तुमचे म्हणने आहे का?

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. त्यांनी खुलासा केलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बसायचा प्रश्नच येत नाही. जेव्हा २५ तारखेला घटना घडली आणि १ तारखेला कळवल असे सांगितले जाते व आपण सांगता हे बरोबर आहे. सुरक्षा एजन्सी बरोबर काम करत आहे. मॅडम, संपूर्ण देशामध्ये हा विषय गाजलेला आहे. आणि या देशात जेव्हा जेव्हा असे विषय होतात तेव्हा या देशात दंगली झालेल्या आहेत आणि पोलिसांनी ते कबूल करुन आपल्या दोन नगरसेवकांना अटक केलेले आहे. म्हणून तुम्ही सुरक्षा एजन्सीला असे पाठीशी धरु नका. तुम्ही काय कार्यवाही करणार आहात? सुरक्षा एजन्सीने सात दिवसानंतर हे प्रकरण आपल्याकडे पाठवलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी २५ तारखेला वर्तमानपत्रामध्ये बघितल्यानंतरही त्यांच्याकडै चौकशी केली नाही. त्यांनी नाही पाठवले, पण आपल्या अधिकाऱ्यांनी काहीतरी चौकशी केलेली आहे की हा प्रकार घडलेला आहे, ह्याच्यबद्दल काय म्हणायचे आहे? आपल्या अधिकाऱ्यांनी सुरक्षा अधिकाऱ्याला पत्र पाठवले का? ते तरी सांगा. आपल्या सुरक्षा एजन्सीला आपल्या आयुक्तांनी किंवा संबंधित या अधिकाऱ्यांनी जेव्हा २५ तारखेला ही घटना घडली, २६ व २७ तारखेला वर्तमानपत्रामध्ये आले, टी.व्ही. मध्ये आले. हे सभागृह बोलतोय. त्यावेळी आपल्या प्रशासनाचे कर्तव्य आहे की, सुरक्षा एजन्सीच्या

प्रमुखाला बोलावून त्याच्यावर निवेदन घ्यायचे. आपण त्यांना ह्या बाबतीमध्ये पत्र पाठवलेले पत्र आहे का? मॅडम, प्रशासनाने हे सांगावे की २५ तारखेला घटना घडली. २५ तारखेनंतर १ तारखेला सुरक्षा एजन्सी आपल्याला पत्र पाठवते. या काळामध्ये प्रशासनाने एजन्सीला शोकॉज नोटीस पाठवून, काहीतरी निर्णय घेतला होता का?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, सिक्युरिटीचा जो प्रश्न आहे तो आपण कमिशनर साहेब, महापौर मॅडम तो विषय मांडा. तुम्हाला जर ती सिक्युरिटी योग्य वाटत नसेल तर त्याच्यावर कार्यवाहीचे अधिकार तुम्हाला आहेत. संसदेवर हल्ला झाला तेव्हाची सिक्युरिटी कुठे होती. ती सूध्दा बेगड होती का? एवढ्या मोठ्या संसदेवर हल्ला होऊ शकतो ही तर छोटीशी महानगरपालिका आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो विषय येथे नाही. तुम्ही कशाल सुरक्षा एजन्सीला पाठीशी घालता? काय कारण आहे, सुरक्षा एजन्सीला पाठीशी घालण्याचे? मी प्रशासनाला विचारतो की, २५ तारखेला घटना घडलेली आहे. सात दिवस आपण काय कार्यवाही केली आहे?

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, आपल्याला ज्या विषयाची माहिती पाहिजे, ती माहिती अशी की, जेवढी खोपडी आपली गेल्यानंतर आपल्याला जेवढे वाईट वाटले नाही, तेवढे सुरक्षा एजन्सीबद्दल वाटले असे म्हणून वातावरण निर्माण झाले. तो गुन्हा कधी झाला या संदर्भात ह्या ज्या तारखा उपायुक्त मुख्यालय रणखांब साहेबांनी सांगितल्या त्या दोन तारखा सांगितल्या. २५ आणि २९. आपल्या माहितीसाठी मिरारोडच्या स्मशानभूमीमध्ये ही शुटींग सहारा समयच्या पत्रकारासोबत २९ तारखेला सुरु होते आणि नेमके काय झाले आहे, ही सगळी माहिती घेईपर्यंत आपल्याला काही कळल नाही. शुटींग झाल्यानंतर आपल्याला ह्या गोष्टी कळल्या मग ही सगळी चर्चा, सगळी माहिती मग त्याच्यामध्ये कोणाचे इनवॉलमेन्ट होते, कोण नगरसेवक गेले होते, त्यांनी आपल्या गाडीतून त्यांना मुझफ्फर साहेबांच्या ऑफीससमोर कसे उतरवले आणि सांगितले की, आता त्यांच्या ऑफीसला तुम्ही चौकशी करा आणि हा सहारा न्युजचा पत्रकार मुझफ्फर हुसैन साहेबांच्या केबिनला जाऊन त्यांच्या कर्मचाऱ्यांना विचारतो की, स्मशानावर तुम्ही नीट व्यवस्था करता की नाही. त्या स्मशानभूमीबाबत तुमचे काय मत आहे. तिथे कुत्रे आणि मांजरे ही प्रेत उरकून काढून खातात. अशा तक्रारी आमच्याकडे आलेल्या आहेत आणि तशी शुटींग आमच्याकडे आहे. हा फॅक्ट घडला होता त्यावेळेला आमदार मुझफ्फर हुसैन हे काही कामानिमित्त गुजरात परिसरामध्ये होते. त्यांना फोन केला तरी ते येईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्याचे काम तातडीनें केले, तातडीने महापालिकेचे आयुक्त गायकवाड साहेबांनी तशी सूचना दिली आणि ते ताबडतोब स्मशानभूमीमध्ये आले. पोलिसांनी येऊन पाहणी केली. फक्त पाहणी केली होती, आणि गुन्हा दाखल हा त्यादिवशी संध्याकाळी सुरुवात झाली ३० तारखेला. ३० तारखेला हा गुन्हा दाखल केला म्हणून रेकॉर्डला अशा दोन तारखा आहेत. मग जेव्हा इलेक्ट्रॉनिक मिडीयाला ह्या बातम्या चालू असताना त्या सुरक्षा रक्षकांनी सांगितले की, आपल्या इथल्या कवट्या घेऊन एक पत्रकार गेलेला आहे. तोपर्यंत संबंधित नगरसेवकाला तो सुरक्षा रक्षक पत्रकार समजत होता. आणि तेथे दोन लोक गेले होते. एकाने त्या सुरक्षा रक्षकाच्या खांद्यावर हात ठेवून कसे चालले आहे, काय व्यवस्था आहे. दरम्यान हा पत्रकार बनलेला महापालिकेचा साहेब, हा आतमध्ये गेला आणि त्या खोपड्या घेऊन तो मागच्या बाजूने निघून आला आणि त्याला सांगितले की, आपले काम झालेले आहे आणि मिनव्हाईल ह्या सुरक्षा रक्षकाने पाहिले की वारंवार स्मशानात राऊंड मारण्याचे काही कारण नाही. आपली प्रॉपर्टी बरोबर आहे का नाही ते बघणार अशातलाही भाग नाही. आणि २५ तारखेला ही जी घटना घडली, २५ तारखेला त्या मिरारोडच्या स्मशानभूमीतल्या वॉचमनने हे काहीतरी आहे आणि हे तु कशाला इथे आणले आहे. आणि हातामध्ये घेऊन ते फोटो काढत होते. ते त्याने बाहेर फेकून दिले. तेव्हापण त्यांना सांगितले होते की, मै महानगरपालिकाका साहब हूँ दरम्यान त्या सुरक्षा रक्षकाला असे वाटले असेल, महेंद्रसिंग चौहाण साहेबांनी सांगितले, काल कपाल महाकाल तसा काहीतरी प्रकार असेल किंवा कोणाचे काय प्रयोग असतील म्हणून त्या सुरक्षा रक्षकाने त्या कवट्या बाहेर फेकून दिल्या. कोणाला काय सांगण्याची गरज नव्हती. परंतु, जेव्हा इंटरव्ह्यू सुरु झाला तेव्हा त्या सुरक्षा रक्षकाने पहिल्यांदा तशी इन्फॉरमेशन पासऑन केली आणि पहिल्याच दिवशी आयुक्त साहेब तिथे आले आणि आयुक्त साहेंबांनी सांगितले की, ज्या ज्या कर्मचाऱ्यांनी हे काय बघितले आहे त्यांनी आपला तसा संबंधित खात्याला जबाब द्यावा. पोलिसांना बोलावल्यावर, पोलिसांनी याबाबत माहिती घेतली आणि इत्यंभूत माहिती घेतल्यानंतर लोकप्रतिनिधी असल्या कारणाने कोणावरती काय कारवाई करावी आणि जेव्हा फोटो पाहिले, फोटो पाहिल्यानंतर खऱ्या गोष्टी लक्षात आल्या. ती सी.डी. पाहिल्यानंतर खऱ्या गोष्टी लक्षात आल्या की, नेमके कोण आले असतील आणि जेव्हा या भाईंदर पश्चिमेच्या सुरक्षा रक्षकाने सांगितले की, ह्या माणसाला मी पाहिले आहे. हाच तो मनुष्य त्या स्मशानभूमीत आलेला होता आणि मग त्या दोन की तीन खोपड्या होत्या, त्या कुठे गेल्या त्याचा खुलासा झाला. संबंधित माणसे आयुक्त साहेबांना भेटायला आल्यावर आयुक्त साहेंबांनी संबंधित पोलिस स्टेशनला कळविले आणि पोलिस स्टेशनला कळवल्यानंतर पोलिसांनी त्यांना बोलवून घेतले,

त्यांचे जवाब दाखल केलेले आहेत आणि सदर कॉपीज कमिशनर साहेबांनी आपल्याकडे मागीतल्या होत्या. त्या मिळाल्या किंवा नाही ते मला महित नाही. परंतु, याबाबत सुरक्षा रक्षकांनी आपली भूमिका योग्यरितीने बजावली होती. अशा मताचा मी आहे आणि तरीही आपल्याला कुठे त्रुटी वाटत असेल किंवा काय वाटत असेल तर ह्या मिरा भाईंदरमध्ये अशांतता पसरवण्याचे कट रचल्याचे जे आम्ही आरोप करतोय ह्याच्यापेक्षा भयानक त्या सुरक्षा रक्षकाने तक्रार केली नाही असे जर आपल्याला वाटत असेल तर आपण तशा प्रकारे मुद्दा मांडावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वैती साहेब, फील्ममध्ये जी स्टोरी असते त्याप्रमाणे आपण त्याचा खुलासा केला. आम्ही जेव्हा नियमाची बाब सांगतो तर तुम्ही फेटाळून लावता.

**प्रेमनाथ पाटील :-**

कुठली माहीती तुम्हाला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंत महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी याबाबत गांर्भीय घेतलेले नाही, हे स्पष्ट आहे. जेव्हा ही लक्षवेधी मांडण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा अधिकारी एका दुसऱ्याचे तोंड बघत होते. आपले अधिकारी आपापसात विचार मंथन करीत होते. त्यांना हे देखील माहित नाही की, हे कशाप्रकारचे चाललेले आहे. मा. महापौर मॅडम, ज्यावेळी ही लक्षवेधी वाचण्यात आली तेव्हा प्रशासनाने त्यावेळी तुम्ही ती फील्म बघितली असाल तर प्रशासन एकदम स्तब्ध झालेला होता. कारण त्यांच्याकडे कुठलेही पत्र नव्हते. हे मी दाव्याने सांगतोय. प्रशासनाला माहीत नाही हे काय घडलेले आहे आणि आतापर्यंत प्रशासनाने जी बाजू मांडायची होती, पोलिस खात्यामध्ये किंवा संबंधितरित्या कार्यवाही करत नाही. ह्याच्यामध्ये सत्ताधारी पक्षाचा दबाव आहे, असा आमचा गंभीर आरोप आहे. एकतर आयुक्त साहेब आपण ह्याचा व्यवस्थित खुलासा केला पाहिजे, कारण २५ तारखेला घटना घडल्यानंतर आपण जसे फील्ममध्ये सांगतो चार दिवसानंतर सापडले, हे केले-ते केले ही सर्व खोटी बाब आहे. कारण भाईंदर पश्चिमेच्या स्मशानभूमीला चारी बाजूंनी कम्पाऊंड आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपला मुद्दा समजलेला आहे. आपण बसून घ्या. प्रशासनाने ह्याचा खुलासा दिलेला आहे आणि आणखीन चौकशी ते करतील. आपण बसावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम त्यांनी काय स्टेटमेन्ट दिले की, मागच्या बाजूने निघून गेले. भाईंदर स्मशानभूमीला चारी बाजूला कम्पाऊंड आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. फील्मची स्टोरी आपण चालू करु नका. आपण बसून घ्या. सचिवजी पुढील कामकाज चालू करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चारी बाजूला कम्पाऊंड आहे. म्हणून सांगतो फिल्मची स्टोरी सांगू नका. प्रशासन काय कारवाई करणार आहे?

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या. सभेच्या पुढील कामकाजाला सुरुवात झालेली आहे. आपल्या प्रश्नाचा खुलासा झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आपण त्या सुरक्षा एजन्सीवर काय कारवाई करणार आहोत?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य विनाकारण आपण सभागृहाचा वेळ घालवू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ह्याचा अर्थ आपण सुरक्षा एजन्सीला क्लिन चीट दिलेली आहे. ह्याचा हाच अर्थ झालेला आहे. हा सत्ताधारी पक्ष सुरक्षा एजन्सीच्या बरोबर काम करत आहे. सुरक्षा एजन्सीच्या दबावाखाली काम करत आहे असे जाहिर झालेले आहे. सुरक्षा एजन्सीवर काय कार्यवाही केली जाणार, त्याशिवाय मी बसणार नाही.

**मा. महापौर :-**

त्याची चौकशी केली जाईल आणि सुरक्षा रक्षकांची याबाबत अधिक माहिती मागवली जाईल. त्याप्रकारे आयुक्त साहेब खुलासा करतील व माहिती मागवून चौकशी पूर्ण करुन आपल्याला माहिती मिळवता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला लेखी पत्राचे उत्तर मिळाले पाहिजे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप नही तो आयुक्त साहब उठके जवाब देंगे नही तो पाप कभी भी छुटता नही है। जैसा मॅडमने बोलाने के. जी. बी. जैसा बीस साल बाद भी उघडता है। जैसा रसीया एजन्सीने इनको पैसा दिया था। वैसा बात उघडता है।

(प्र. सचिवांनी प्रकरण क्रं ४० चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

इतिवृत्तांत सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४० :-**

दि. २१/६/२००५ व दि. २०/७/२००५ रोजीचे मा. महासभेंचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४०(अ) :-**

आपल्या महानगरपालिकेच्या मागील दोन सभांचे म्हणजे दि. २१/०६/२००५ व दि. २०/०७/२००५ चे जे दोन सभावृत्तांत आता वाचण्यांत आले त्यात उपस्थित सभासदांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह हे वृत्तांत कायम करण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.

**सूचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो ठराव पास केलेला आहे. त्याचे अधिकारी इम्प्लीमेन्ट करत नाही. त्याचा खुलासा व्हायला पाहिजे. ठरावाचा खुलासा झाला पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण जागेवर बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण सांगा की ठराव झालेला नाही. मी मान्य करेन. ठराव झालेला आहे आपण रुलिंग केलेले आहे. अधिकारी का काम करीत नाहीत. एकतर सांगा की, ठराव झालेला नाही. तुम्ही तीन सभा झाली त्याला पुन्हा महासभेमध्ये आणतही नाही. सत्ताधारी पक्षाने त्या दिवशी सांगितले की, आम्ही काहीतरी सूचना ह्याच्यामध्ये समाविष्ठ करु. हा प्रस्ताव पास झालेला आहे आज त्या गोष्टीला चार महिने झालेले आहेत. हा लोकांचा विषय आहे, हा माझा व्यक्तीगत विषय नाही. अधिकारी वर्ग सांगतात की, आम्हाला आर्डर नाही. म्हणजे प्रशासन .....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्यापेक्षा पूर्ण सभागृहाला मिरा भाईंदरची काळजी आहे. आपल्याला एकट्याला काळजी करायला दिलेली नाही. आपण बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण तुम्हाला त्याची काळजी नाही.

**मा. महापौर :-**

आपण एकटे नाही तर पूर्ण सभागृह या विषयावर निर्णय घेणार आहे. आपण काय फक्त महापालिकेमध्ये गोंधळ घालण्यासाठी येता का? वेळ घालवायला येता का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण काम करत नाही म्हणून. जर काम झाले असते तर कशाला गोंधळ घातला असता?

**रोहिदास पाटील :-**

ठरावाची अंमलबजावणी का होत नाही?

**मा. महापौर :-**

सकाळ पासून आपण किती वेळ वाया घालवलेला आहे. ह्याचा अर्थ तुम्ही नागरिकांना येथे काय दाखवता की महत्वाच्या विषयावर येथे चर्चा झाली नाही पाहिजे का?

**याकुब कुरेशी :-**

असे वाटते, ह्यांचे असे म्हणने आहे की सभागृहामध्ये सभा नाही चालली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमची कमतरता आम्ही दाखवतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. गेल्या वेळेस रुलिंग दिलेले आहे. हा विषय विषयपटलावर गोषवाऱ्यासहीत घेण्यांत येईल. त्यादिवशी ठराव मंजूर झालेला नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तुम्हाला विनंती `लेली आहे की, सभेचे कामकाज टी.व्ही.वर लाईव्ह दाखवा. हे दुरचित्रवाणीवरुन लाईव्ह दाखवा अशी आम्ही तुमच्याकडे मागणी केलेली आहे. दाखवा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौरांनी रुलिंग दिल्यानंतरही अधिकारी कामकाज करीत नाही. काय आहे हे सभागृहाचे.

**रोहिदास पाटील :-**

हे आम्ही तुमच्यासमोर आणले तर तुम्ही सांगता की वेळ घेता.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी रुलिंग असे दिले होते की, हा विषय जो आहे तो आपण "ज" च्या प्रस्तावाखाली दिलेला विषय पुढील मा. महासभेमध्ये गोषवा-यासहीत रितसर घेतला जाईल. आपला विषय फेटाळण्यात आलेला नव्हता. पुढच्या वेळेस घेतला जाईल अशी मंजूरी दिली होती.

**रोहिदास पाटील :-**

आपण ठराव मान्य केलेला आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मान्य केलेला नव्हता.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर आप इसपर एकदम गलत बोल रहे हो।

**डॉ. रमेश जैन :-**

कमसे कम सदन को गुमराह नही किया जाए।

**रोहिदास पाटील :-**

सभागृहाचे कामकाज दुरचित्रवाणीवरुन लाईव्ह दाखवा अशी आम्ही लेखी मागणी केलेली आहे.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आप जरा सबजेट के बारे मे खुलासा करीए।

**शिवप्रकाश भुदेका / डॉ. रमेश जैन :-**

आप सदन को गुमराह कर रहे हो।

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आप अलग अलग प्रश्न ले लेते हो। इसमे बात क्या है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या खुलासा सुननेके लिए आपमें धैर्य चाहिए। सभागृहमे क्या चल रहा है? आप जनता को क्या दिखा रहे हो? की, बाकी के सबजेक्ट महत्वपूर्ण नही है क्या?

**सुधा गोयंका :-**

आप इस सबजेक्ट के बारे मे खुलासा किजीए।

**डॉ. रमेश जैन :-**

इसका मतलब सत्ताधारी पक्ष काम नही कर रहा है।

**रोहिदास पाटील :-**

अत्याधुनिक जे विषय आहेत ते निकालात निघालेच पाहिजे आणि त्याच्यासाठीच हे सभागृह आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य विरोध करण्यासारखा जर विषय असेल तर विरोध करा. आपण विनाकारण सभागृहाचा वेळ कशाला घालवता?

**सुधा गोयंका :-**

दोनदा मिटींगला होऊन गेलेले आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

आपण मंजूर केलेला आहे. आपण ठराव केलेला आहे आणि आता ट्वीस्ट करता का?

**सुधा गोयंका :-**

पुढचे पुढचे विषय येतात. दुसऱ्यांचे ज चे प्रस्ताव येतात. मा. महापौर मॅडम, आपण त्या सबजेक्टसाठी सांगा, ते काय म्हणतात आपली जी भावना आहे ती आपण लोकांपर्यंत व्यक्त करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर मॅडम, आपल्याला या सभागृहाचा मान आहे. आपण बोलतात की, या सभागृहामध्ये हा प्रस्ताव पास झालेला आहे. काहीच फेरबदल न करता आम्ही हा प्रस्ताव पास करु. आत्तापर्यंत तीन सभा झाल्या आहेत? आपण का त्या प्रस्तावाला तीन सभा घालवल्या?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. उपमहापौर साहब, आप इस विषय पर क्यो नही बोलते हो? इस विषय को रुलिंग आपने दी है की, यह ठराव सर्वानुमते मंजूर है। आप झुठ मत बोलो सदन को गुमराह मत करो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण नागरिकांचा विषय फेटाळता, तुम्हाला न्याय मिळेल का? हा लोकांचा विषय आहे. मा. महापौर मॅडम, मागच्या वेळी आपण स्वतः निवडून दिलेले आहे. विद्यार्थ्यांचा गणवेशबाबतचा विषय होता. आम्ही मतदानाची मागणी केलेली होती. मतदानाकरीता हा ठराव फेटाळला होता.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आप प्लीज हमारे प्रश्न का खुलासा किजीए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ठरावाची मागणी केलेली होती आपण म्हणालात ठराव नको हा प्रस्ताव पास झालेला आहे. त्याच्यात आम्ही काही तरी सुधारणा करु.

**सुधा गोयंका :-**

क्या सुधारणा की है, वह आप बता दिजीए।

**डॉ. रमेश जैन :-**

आप हमारा अमुल्य समय खराब कर रहे हो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि आम्हाला सांगता की, आपण या सभागृहामध्ये गोंधळ घालता. क्रेडीट तुम्हाला पाहिजे तर क्रेडीट तुम्ही घ्या. परंतु, लोकांचे हित करा. तुम्ही अनुमोदन आणि सुचक तुमचे सुचवा. वर्तमानपत्रामध्ये बातमी द्या. आम्ही आणल टॅक्सवर नियोजन करुन. तुम्हाला क्रेडीट पाहिजे तर तुम्ही घ्या. पण लोकांचे काम तरी करा. उपमहापौर साहेब, महापौरांच्या शब्दाने आपण आता सांगा ना. आता आपण स्टेटमेन्ट करत नाही. काय बोलणे झाले होते या सभागृहामध्ये.......

**रोहिदास पाटील :-**

एकदम चिकटपट्टी लावून बसले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण आता का बोलत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आता एकदम जैन धर्मासारखे गप्प बसले आहेत.

**सुधा गोयंका :-**

मतलब यह मा. महासभेका भी निर्णायक सही नही है। कभी भी पलटी हो जाता है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्या ज च्या प्रस्तावावर आम्ही मतदानाची मागणी केली होती. मतदान न करता ठराव पास झालेला आहे. अशी भूमिका सभागृहाची आहे. ह्याच्यावर आपण पहिल्यांदा खुलासा करावा.

**सुधा गोयंका :-**

कोई भी ठराव कभी भी कॅन्सल हो सकता है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही क्रेडीट घ्या. प्रस्ताव आणण्याचा मा. महापौरांचा अधिकार असताना, प्रस्ताव महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी आणलेला आहे. आपण आणा ना. लोकांना काय द्यायचे आहे ते तुम्ही आणा. आम्ही कुठे बोलतोय. आज जो ठराव मा. महापौरांनी आणला पाहिजे तो महेंद्रसिंग चौहाण साहेबांनी आणलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी एक ठराव आणलेला आहे. एक वर्षाचे आणखीन काय ते? सगळ्याच महापालिकेचे भाडे, घरपट्टी तुम्ही माफ करा ना. आम्ही सांगतो ना. एक साल के लिए नही तीन साल के लिए हम देता है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण दिलेला जो विषय आहे तो विषय प्रशासनाने रितसर गोषवाऱ्यासहीत पुढील मा. महासभेत घेण्यात येईल. गेल्यावेळेसही रुलिंग दिलेले होते आणि आताही देण्यांत येते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, उपमहापोर साहबने रुलिंग दिया था।

**मा. महापौर :-**

वह रुलिंग नही थी।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तीन महासभा झालेल्या आहेत.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, दोन मिटींग झाल्या तरी अजून आपण तो प्रश्न मांडलाच नाही. आधीच्या दोन मिटींगलाही तुम्हीच होता ना. मग नको ते प्रश्न घेता कशाला?

**मा. महापौर :-**

पुढच्या वेळेस विषय घेण्यात येईल. आपण बसून घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

गये महासभेमे उपमहापौर साहबने रुलिंग दिया था की, यह ठराव मंजूर है। आप ऐसे सदनकी दिशाभूल मत करो। आप सदनको, नागरिकोको क्या दिखाना चाहते हो वह भी आप बता दो।

**सुधा गोयंका :-**

मॅडम, यह विषय आपको कभी ना कभी लेना ही पडेगा ना. तो अभी उस विषय को ले लिजीए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

यह आशिक की बात मे चौहाण साहब आप आओ मत, नही तो आपका किधर भी कपडा उतरवा देगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चौहाण साहब, अच्छे विषय मे आप नही बोलेंगे। आपसे अपेक्षा भी नही है। अभी यह प्रस्ताव मे नही बोलेंगे। जनहित का विषय है, आप नही बोलेंगे। स्थायी समितीमे आपने निर्णय लेकर पास किया। उसको आप इम्प्लिमेंन्टेशन नही करवा सकते हो। इससे बडी शरम की क्या बात है, सत्ताधारी पार्टी।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, मागच्या वेळेला ज च्या प्रस्तावाखाली ओमप्रकाश अग्रवालजी यांचा जो विषय आला होता, तो बरोबर आहे. पण मागच्या वेळेला सांगितले होते की, पुढच्या सभेत विषय घेऊ. असे म्हणाले होते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

नाही. मा. उपमहापौरांनी रुलिंग दिली होती की, ठराव मंजूर आहे.

**परशुराम पाटील :-**

गेल्या सभेत असे म्हटले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उगाच आपण सदनाची दिशाभूल करु नका.

**परशुराम पाटील :-**

पुढच्या मिटींगला विषय घ्यायचा असे आपण ठरवले होते. मागच्या वेळी मा. आयुक्त शिंदे साहेबांच्या वेळेला विषय आला होता. तेव्हा शिंदे साहेबांनीसुध्दा असेच सांगितले होते की, एका बिल्डींगमध्ये जर दोन कर लागले असतील म्हणजे नविन आणि जूना तर तो आपण एकच करायचा असा.

**मिलन म्हात्रे :-**

नेमका कुठला?

**परशुराम पाटील :-**

आला होता. त्याच्यामध्ये असे म्हटले की, जूना कर असेल तर जूनाच लावायचा आणि नविन असेल तर नविन लावायचा. त्या पध्दतीने मी सुध्दा दोन तीन वेळा पत्रव्यव्यवहार केलेला आहे. त्याचेसुध्दा मला उत्तर दिलेले नाही. एका बिल्डींगमध्ये दोन टॅक्स कसे लागले जातात.

**शिवप्रकाश भुदेका :-**

कोई भी निकालो उसपे आपका पत्रव्यवहार रहता ही है? आपका फॅक्स या पत्रव्यवहार रहता है। आप गलत बोल रहे हो, वैती साहबने उसपर रुलिंग दिया था।

**परशुराम पाटील :-**

क्या रुलिंग दिया था?

**शिवप्रकाश भुदेका :-**

आप उस सभे की कॅसेट या प्रोसिडिंग मंगाईए।

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेबांनी अशा पध्दतीने म्हटले होते की, एका बिल्डींगमध्ये जर दोन टॅक्स असतील तर त्याचा एक करण्यात येईल असे म्हटले होते. पण त्याच्यानंतर काही प्रोसिजर झालेली नाही आणि त्याच्यानंतर आता माझासुध्दा पत्र व्यवहार झालेला आहे की, आता जे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी जो विषय दिलेला आहे ते त्याचपध्दतीने आपण त्यांना आता विषय आणला नसेल किंवा ठराव झाला असेल तर त्यांना दाखवा. नसेल झाला असेल तर आपण पुढच्या मिटींगमध्ये विषय घ्याल असे आश्वासन देऊन कंप्लीट करुन टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव झालेला आहे.

**सुधा गोयंका :-**

अगली मिटींगमे भी हम सभी होंगे और इस मिटींगमे भी हम सभी है और जवाब आपको देना है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

वैती साहब, आपने रुलिंग दिया है आप खडे होकर बोलिए की, मैने रुलिंग दिया है और वह ठराव मंजूर हुआ है। आप क्यों मौन व्रत धारण करके बैठे हो, आप बोलिए ना.

**रोहीदास पाटील :-**

आयुक्त साहेब, आमचा जो विषय आहे त्याचा ठराव झालेला आहे. तरी पुन्हा मिटींगला यायला पाहिजे असे तुमचे मत आहे का? आमच मत आहे, तुमचे राईटस् आहेत. जनतेच्या हिताचा निर्णय घेण्याच्या बाबतीत ते आयुक्तांचे राईट्स आहेत.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, आपसे रिक्वेस्ट है की, इस विषय के उपर आप अभी जवाब देंगे तो ज्यादा अच्छा रहेगा।

**परशुराम पाटील :-**

या विषयी ज्या ज्या बिल्डींगला दोन वेळा कर लागलेला आहे, त्याचा सर्व्हे केलेला आहे का? ते आपण बघा. सर्व्हे करायला लावा. एका बिल्डींगमध्ये दोन टॅक्स कसे लागले? सर्व्हे करुन घ्या. कुठल्या एका बिल्डींगला दोन कर लागले आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

सर्व्हे मे पैसे का वाट लगता है।

**सुधा गोयंका :-**

यह गलती महानगरपालिकाद्वारा होती है, इसलिए दो बार टॅक्स लगता है ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सर्व्हे करा आणि महानगरपालिकेच्या पैशाची वाट लावा. हेच पाहिजे तुम्हाला.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय, आपण आता या ठिकाणी रुलिंग दिलेले आहे. आपण पुढच्या विषयाला सुरुवात करावी. पुढचा विषय वाचून घ्या. रुलिंग तर आपण दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण त्या विषयाची प्रोसिडिंग आणा. आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. आपण त्यावेळी सांगितले होते की, हा प्रस्ताव पास झालेला आहे फक्त त्याच्यात जी काही दुरुस्ती हवी आहे ती करा. तसा प्रस्ताव पास झालेला आहे आम्ही त्यावेळी मतदानाची मागणी केली होती. मतदान करुन घेतलेले आहे म्हणजे प्रस्ताव पास झालेला आहे आणि आज त्या गोष्टीला चार महिने झाले.

**मोहन पाटील :-**

मॅडम, पुढचा विषय घेण्यात यावा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, वैती साहबने रुलिंग दिया था।

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी गारोडिया ह्यांनी जो ज अन्वये प्रस्ताव दिलेला होता. खरोखर त्यांची भूमिका त्यांनी ह्या ठिकाणी विशद केलेली आहे. प्रस्ताव खरोखरच चांगला आहे की, एका इमारतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे टॅक्स नको. एकच टॅक्स जो पूर्वी लागला असेल, तोच सर्वांना समान पाहिजे अशी भावना संपूर्ण सभागृहातील सदस्यांची आहे. किंबहूना ही सभागृहातील सदस्यांची आहे की, टॅक्स एकच लागला पाहिजे. प्रत्येकाला वेगवेगळे टॅक्स नको. सन्मा. उपमहापौर ह्यांनी मागच्या सभेमध्ये सभागृहात निवेदन केले होते.........

**मदन उदितनारायण सिंग :-**

रुलिंग दिलेले होते, सर्वानुमते मंजूर असे रुलिंग दिले होते.

**सुधा गोयंका :-**

प्रस्ताव पारित केला आहे.

**आसिफ शेख :-**

हा प्रस्ताव रितसर आपल्या विषयपत्रिकेवर आला पाहिजे. सन्मा. महापौर मॅडमनेही ह्याच्यावर रुलिंग दिलेले आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आमची आपल्याला नम्र विनंती आहे, जी वीस तारखेला येणारी आगामी महासभा होणार आहे त्या महासभेत निश्चितपणे महापौर साहेबांनी सांगितले आहे की, विषयपटलावर विषय घेऊन आपण तो मार्गी लावू या झालं गेलं ते गंगेला मिळालं ते विसरुन जा आणि नविन सुरुवात करा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी हमको मालूम था, आप खडे होकर यही बोलोगे।

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एका प्रश्नाला तीन वर्षे गेली. आपल्या अखत्यरित अजून दोन वर्षे घालवणार आहात का?

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषयावर रुलिंग झालेले आहे. आपण त्याचे इम्प्लीमेन्ट करा ना.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, स्वतः बोलल्या की, पुढच्या सभेत विषय घेण्यात येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पुढच्या सभेला नको हे मंजूर झालेले आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

पुढच्या सभेला विषय घेण्यांत येईल.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, दोन सभा झाल्या.

**सुधा गोयंका :-**

मॅडम, हम जबभी विजय पाटील सर के पास जाते हो, तो उनका एकही कहना रहता है की, ठराव पास हुआ है। लेकीन हमको अधिकारी से लिखित मे मिला नही है। प्लीज इस मिटींगमे आप क्लिअर करीए, ताकी लोगोंकी समस्यासे छूटकारा हो।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सर्व क्रेडीट आपणच घ्या. आपल्या पक्षानेच घ्यावे, पण प्रश्न निकाली लवकरात लवकर मार्गी लावावा.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, सकाळी ११:०० वाजल्यापासून अजून आपली मिटींगच चालु झालेली नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

चौहाण साब आप बैठो अच्छे काम करनेके लिए आपकी जरुरत नही। किसीका सत्यानाश करनेका तो आपको खडा करनेका। महापौर मॅडम, यह चंडाल चौकडी आपको काम नही करने देगी।

**प्रभात पाटील :-**

सभागृहाचे मी लक्ष वेधू इच्छिते की, मा. महापौर मॅडम, सभागृहात आता पाठीमागे विधान केले गेले की, चांडाळ चौकडी तुम्हाला काम करु देणार नाही. ही चांडाळ चौकडी आहे का? सभागृहाने याच्यामध्ये लक्ष घाला. चांडाळ चौकडी आपको काम नही करने देगी असे सभागृहामध्ये वक्तव्य केले जाते. ही चांडाळ चौकडी आहे का? सभेमध्ये जमलेले लोक ही चांडाळ चौकडी आहे का? आता इथे असे बोलले गेले आहे. भुदेकाजी ह्यांनी उच्चारले की चांडाळ चौकडी तुम्हाला काम करु देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासन ज्या पध्दतीने काम करते. तर सभागृहामध्ये हा असाच गोंधळ होणार आहे. ज्या पध्दतीने पध्दतीने प्रशासन काम करते, जाब विचारणार प्रत्येक सभागृहाची.

**प्रभात पाटील :-**

मी निषेध व्यक्त करते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बोलत असताना दुसऱ्या सदस्याने बोललेले आपल्याला जमत नाही. मग दुसरे बोलत असताना आपण मध्ये का बोलता?

**जेन्वी अल्मेडा :-**

जो शब्द सभागृहात वापरला गेला आहे, तो पाठीमागे घेण्यात यावा.

(सभागृहात गोंधळ)

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, विषय को गुमराह मत करो। सबजेक्ट पर निर्णय करो।

**सुधा गोयंका :-**

यह सबजेक्ट को लेना जरुरी है। जबरदस्तीका है ना, माहोल को गंदा करके सबको खडा कर देना।

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांनी तो शब्द वापरला आहे त्याबाबत माफी मागावी.

**प्रभात पाटील :-**

आम्ही चांडाळ चौकडी आहोत का?

**सुधा गोयंका :-**

महापौर मॅडम, जो शब्द उन्हाने सुने वह हमने क्यो नही सुने?

**जयाबाई भोईर :-**

आपण काही पण कसे बोलता? हे आपले घर आहे का, काय पण बोलायला? जरा पध्दतशीर बोला. हे सभागृह आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह सभागृहमे जो सब सदस्य खडे है, वह हमारे समर्थन मे खडे हो। वैती साहबने जो रुलिंग दिया था, उसके समर्थन मे सब हमारे साथ खडे है।

**प्रभात पाटील :-**

सदस्यांना चांडाळ चौकडी बोलतात. तुम्ही त्यांना समज द्यायला पाहिजे ना. हे सभागृह आम्ही चालू देणार नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये चेष्टा, मस्करी चालू आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य वक्तव्य करताना शब्दाचा योग्य वापर करा. कोणाचा अपमान होणार नाही ह्याची दक्षता घेण्यात यावी.

**स्टिवन मेन्डोसा :-**

मॅडम, त्यांनी सभागृहाचा अपमान केलेला आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

माफी मागायला लावा.

**प्रभात पाटील :-**

त्यांनी माफी मागीतल्याशिवाय हे सभागृह चालणार नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

बोललेले शब्द मागे घेऊन संपूर्ण सभागृहामध्ये त्या शब्दाची माफी मागावी.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, विषयाला अनुसरुन विषयावर निर्णय द्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

शब्द वापस लेने को बोलीए।

**ज्युडी डिसाझा :-**

मॅडम, त्यांना शब्द मागे घ्यायला सांगा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्याने सभागृहाचा अपमान केलेला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

बोललेले शब्द मागे घ्यायला सांगा. अन्यथा त्यांना सभागृहाच्या बाहेर काढा.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, प्लीज आप उत्तर दिजीए।

**जयाबाई भोईर :-**

बोललेले शब्द मागे घ्यायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

जोपर्यंत शब्द मागे घेत नाही तोपर्यंत सभागृह चालवायला देणार नाही. सभागृह चालणार नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

उगाच सभागृहाचा वेळ वाया घालवू नका. जो विषय आहे त्या विषयावर निर्णय द्या. मा. महापौर मॅडम, हा सत्ताधाऱ्यांचा कट आहे, वेळ वाया घालवण्याचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, ज्या गोष्टी स्थायी समितीमध्ये पास करतात, हे सत्ताधाऱ्यांनी पास केलेले आहे. त्याला हे इम्प्लीमेन्ट करु शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

सभागृहामध्ये गरज कोणाला कोणता शब्द देणार नाही. महापौर मॅडम, आम्ही हे सभागृह चालू देणार नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

सभागृहाचा वेळ वाया घालवू नका.

**प्रभात पाटील :-**

सभागृह चालणार नाही. सदस्य शिवप्रकाश भुदेकाजी बोलले की, हे सभागृहामधले चांडाळ चौकडी तुम्हाला काम करु देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोण आहे ते आपण ठरवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेकाजी आपण उच्चारलेले शब्द मागे घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, उच्चारलेले शब्द मी मागे घेतो.

**ग्रिटा फॅरो :-**

मॅडम, विषयपत्रिकेवरील विषयाला सुरुवात करावी.,

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य भुदेकाजीने अपने शब्द वापस लिए। अब आप अपनी रुलिंग दिजीए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

वैतीजीने जो रुलिंग दी है, उसपर आप कार्यवाही किजीए।

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषय घ्यावा.

**मदन उदितनारायण सिंग :-**

महापौर मॅडम, रुलिंग दिजीए। सभागृहका समय मत बरबाद किजीए।

(प्र. सचिव साहेबांनी प्रकरण क्र. ४१ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ४१ चा सभागृहासमोर ठराव मांडा.

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करण्याबाबत.

**ठराव क्र. ४१ :-**

आपल्या महानगरपलिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महापालिका पातळीवर (१) स्थायी समिती व (२) महिला व बालकल्याण समिती व परिवहन समिती ह्या तीन समित्या कार्यरत होत्या / आहेत. तथापी महापालिकेच्या कामाचे स्वरुप पाहाता जशा इतर महापलिकामध्ये अनेक प्रकारच्या समित्या कार्यरत आहेत. तशाच प्रकारच्या समित्या आपल्याही महानगरपलिकेत असाव्यात अशी ह्या सभागृहाची भावना व धारणा आहे. म्हणून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये पुढील प्रमाणे समित्या स्थापन करण्यांत याव्यात. अशा प्रत्येक समितीची सदस्य संख्या १३ असावी. समितीस १ सभापती व उपसभापती असावा. त्यांची निवड साध्या मतदानाने करण्यात यावी. हल्ली आपल्या मनपाच्या उपविधी मंजूरीचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे सदर समित्या त्याच उपविधीत अंतर्भूत कराव्यात व सदर प्रस्तावाचे जोडपत्र तयार करुन शासन मंजूरीसाठी तातडीने पाठविण्यात यावे. सदर समित्यांचे कार्यक्षेप व अधिकार पुढील प्रमाणे असावेत.

| अ.क्र. | ज्या विशेष समितीला अधिकार दिलेले आहेत ती समिती | कार्यक्षेत्र | कलम | अधिकार किंवा काम | अधिकारदानाच्या मर्यादे बाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक समिती | स्टेडीयम मैदाने इ. बाबतचे सर्व प्रश्न.<br>१. भारतीय व पदरेशी खेळांचा प्रसार व प्रचार<br>२. भारतीय व परदेशी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन<br>३. क्रिडामंडळे व सामाजिक सांस्कृतिक संस्था क्रिडा स्पर्धाचे संयोजन यासाठी संस्थांना द्यावयाच्या अनुदानाबाबत स्थायी समितीस शिफारस<br>४. व्यायामशाळा, क्रिडांगणे व स्टेडीयम यांची देखभाल व व्यवस्थापन, माध्यमिक व तांत्रिक शाळेसंबंधी सर्व प्रश्न<br>भारतीय व परेदशी खेळांना या तत्संबंधीच्या इतर कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासंबंधीचे सर्व प्रश्न व सर्व राष्ट्रीय सण, उत्सव साजरे करणे, समाजकल्याण आणि सांस्कृतिक व करमणुकीचे कार्यक्रमासंबंधीचे सर्व प्रश्न<br>५. सार्वजनिक गणपती उत्सव, नवरात्रौ व सर्व धर्मियांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी महापलिका प्रशासन व आयोजकात समन्वय साधने व त्यांना मदत करणे. | ६६ | महापालिकेच्या स्वेच्छा निर्णयानुसार तरतदु करता येईल अशा बाबी. | रु. ३.०० लाखापर्यंत |
| २. | माध्यमिक व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती | १) प्रशासनाने नेमलेल्या अधिकारांमार्फत प्रशासकीय प्रस्ताव करुन माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, पालकांचे प्रश्न वगैरे बाबत. | | | रु. ३.०० लाखापर्यंत |
| ३. | आरोग्य परिरक्षण | | | आरोग्य विषसंबंधित बाबी, दवाखाने, प्रस्तावित प्रसुतीगृहे निगडीत असलेल्या बाबी. | रु. ३.०० लाखापर्यंत |
| ४. | गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती | गलिच्छ वस्ती सुधारण निर्मुलन घरबांधणी व समाजकल्याण संबंधीचे सर्व प्रश्न तसेच मागासवर्गीय सुधारणा संबंधीचे सर्व प्रश्न | २०८ (१) | काही विशिष्ट प्रकारच्या रहदारी करीता सार्व. पथाच्या वापराला बंदी करण्याकरिता मान्यता देण्याचा अधिकार | रु. ३.०० लाखापर्यंत |

| अ.क्र. | ज्या विशेष समितीला अधिकार दिलेले आहेत ती समिती | कार्यक्षेत्र | कलम | अधिकार किंवा काम | अधिकारदानाच्या मर्यादे बाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | २०९ (१) | पथाच्या प्रमाणित रेषेच्या बाहेरील जागा संपादन करण्यांत मान्यता देण्याचा अधिकार | |
| | | | २७० (१) | महापालिका आयुक्त यांनी काढलेल्या अधिसूचनेला (नोटिफिकेशन पसंती देण्याचा अधिकार) | |
| | | | २७० (३) | सुधारणा योजनेत (इम्युव्हमेंट स्कीम समाविष्ट झालेल्या आणि त्या बाहेरील क्षेत्रातील मोजणी महापालिका आयुक्त यांनी करावी अशी पसंती देण्याचा अधिकार | |
| | | | २७८(२) | सुधारणा योजनेत फेर करण्याचा अधिकार | |
| | | | ६६ | या कलमान्वये महापालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतूद करता येईल अशा बाबी (या समितीच्या संबंधित बाबी) | |

सोबत प्रमाणे वरील सर्व समित्या गठीत करण्यात ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सभापतीं करिता दालने तयार करणे कामी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सूचक :- श्री. आसिफ गुलाब शेख.** **अनुमोदन :- श्री. मिलन गोविंदराव पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४२ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

प्रकरण क्र.४२ चा ठराव सभागृहासमोर मांडला.

**धृवकिशार पाटील :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा, इमारती, समाजमंदिर सुट्टीच्या वेळेत भाड्याने देणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी शाळा इमारती, समाजमंदीरे, बालवाड्या, व्यायाम शाळा, वाचनालय, मैदान आहेत. सदर मालमत्ता विविध कार्यक्रमाकरीता खाजगी संस्था / नागरीकांकडून भाड्याने वापरण्याकरीता मागणी करण्यात येतात. मा. स्थायी समिती सभा दि. ८/११/२००४ ठराव क्र. ११७ नुसार सदर मालमत्ता भाड्याने देणेबाबत दर ठरविण्यात आलेले आहेत, तसेच स्थायी समिती सभा दि. ३०/७/०५ ठराव क्र. ९३ व स्थायी समिती सभा दि. ३१/८/०५ ठराव क्र. ११५ अन्वये खालील मालमत्ता भाड्याने देणेबाबत महासभेपुढे शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | ठिकाण | भाड्याने घेणाऱ्या संस्थेचे नाव | भाडे | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | नवघर प्राथमिक शाळेतील वर्ग | सिनियर सिटीझन | रु. १/- प्रति महिना | ३ वर्ष |
| २) | मिरा रोड व्यायाम शाळा | शिवसमर्थ क्रीडा मंडळ | रु. १/- प्रति महिना | ३ वर्ष |
| ३) | घोडबंदर जुनी शाळा इमारती मधील दोन वर्ग | शिक्षण उत्तेजक मंडळ | रु. २५१/- प्रतिमहिना/ वर्ग | ३ वर्ष |
| ४) | भाईंदर (प.) शाळा क्र. १६, १७, १८ मधील दोन वर्ग व हॉल | भाईंदर सेकंडरी शाळा | रु. २५१/- प्रति वर्ष / फक्त दोन तासाकरीता | ३ वर्ष |

वरील दरानूसार करारनामा करुन ३ वर्षाकरीता भाड्याने मालमत्ता देण्यास मंजूरी देण्यात येते आहे. सदर मालमत्तांची देखभाल, दुरुस्ती संस्थेने स्वखर्चाने करावी. तसेच विद्युत बिल, पाणी बिल सुद्धा संस्थेकडून घेण्यात यावे. इतर संस्थामार्फत मालमत्ता भाड्याने मागणीबाबत अर्ज आल्यास मा. स्थायी समितीने ठरविलेल्या दरानुसार व मुदतीनुसार करारनामे करुन भाड्याने देण्यात यावेत. तसेच मुदत संपल्यावर सुद्धा आवश्यक असल्यास मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढी देण्यात याव्यात.

**सूचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- सौ. अनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.४३ चे वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

प्रकरण क्र. ४३ चा ठराव सभागृहासमोर मांडला.

**मिलन म्हात्रे :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४३ :-**

सुभाषचंद्र बोस मैदाना समोरील रोडमधील विस्थापितांना वाल्मीकी आंबेडकर आवास योजनेत समाविष्ट करणेबाबत.

**ठराव क्र. ४३ :-**

आपल्या महापालिका हद्दीत सुभाषचंद्र बोस मैदना जवळचा परिसर विकसीत करते वेळी त्या ठिकाणच्या एकूण ४१६ झोपड्या हटविण्यात आल्या होत्या व संबंधितांचे अन्यत्र योग्य / सरकारी जमिनीवर पुनर्वसन करावयाचे महापलिकेने तत्वतः मान्य केले होते. त्याप्रमाणे अशा पुनर्वसनासाठी स. न. २३३ (भाईंदर

पूर्व) मधील जागा महापालिकेने मा. जिल्हाधिकाऱ्याकडे मागितली आहे. अशाप्रकारे झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करावयाचे आहे. त्याकामी जागा ताब्यात मिळताच महापालिकेने आपल्या स्वनिधीतून / किंवा दुर्बळ घटकांच्या माहे डिसेंबर २००५ अखेरच्या अखर्चित निधीतून वरील पुनर्वसन कामासाठी खर्च करावा व याकामी मिळणारे अनुदानातून / व स्वतः प्रकल्पग्रस्थाच्या वर्गणीतून ही कामे करून घ्यावीत त्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सूचक :- श्री. महेंद्रसिंह चौहाण.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.४४ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रकरण क्र.४४ चा ठराव सभागृहासमोर मांडला.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४४ :-**

नगरभवन इमारत, तलाव व उद्यान विकास आराखड्यात दर्शविण्याकरीता कलम ३७ खाली फेरबदल करणेंस मंजूरी देणे.

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि. १४/०५/९७ रोजी भागशः व दि. २५/०८/२००० रोजी पुर्णता शासनाने मंजूर केलेली आहे.

मौजे-भाईंदर येथील मांडली तलाव (क्षेत्र ३७६९ चौ.मी.) ही जागा नगरपरिषद स्थापन झाल्यापासून नगरपरिषदेच्या ताब्यात असून तेथे नगर भवनाची इमारत बांधण्यात आलेली आहे. सदर जागा मंजूर विकास योजनेमध्ये सार्वजनिक व निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविण्यात आलेली असून भविष्यात त्या ठिकाणी करावयाच्या सार्वजनिक कामासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास योजनेत सदर फेरबदल दर्शवून जागा आरक्षित दर्शवून जागेचे नामभिदान 'नगर भवन' असे करण्यास ही सभा मंजूरी देणेत येत आहे.

**सूचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४५ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सचिव साहेबांनी प्रकरण ४५ चे वाचन केलेले आहे. मी त्या ठरावाचे वाचन सभागृहामध्ये करतो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सदर ठरावाला माझे अनुममोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४५ :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील ५० द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतील प्रलंबित कामे निधी उपलब्ध करुन घेऊन पूर्ण करुन घेणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर शहरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अतिरिक्त ५० दलली पाणी पुरवठा योजना राबविणेत येत असून सदर योजनेला शासनाने क्र. पापुयो/१०९८/प्र.क्र. ०३/पापु-१८/दि. ३१/०३/१९९७ रोजी

रु. ११०६४.४० लक्ष ठोक रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. मंजूर योजनेचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| मंजूर आकृतीबंध | मंजूर निधी | प्राप्तनिधी | शेरा |
|---|---|---|---|
| शासकीय अनुदान | रु. ४७.८३ कोटी (४३.२३%) | रु. ५४.९६ कोटी | मंजूर झालेल्या कर्जापैकी शासकीय अनुदानापोटी रुपये २.१४ कोटी व MMRDA कडून रु. ९.३० कोटी कर्जनिधी येणे बाकी आहे. |
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या वित्तिय संस्थेमार्फत उभारावयाचे कर्ज | रु. ६२.८१ कोटी (५६.७७%) | रु. ५३.५१ कोटी | |
| **एकूण रु.** | **रु. ११०.६४ कोटी** | **रु. ९९.२० कोटी** | |

सदर योजनेसाठी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाकडून आतापर्यंत रु. ५३.५१ कोटी कर्जरुपाने निधी प्राप्त झाला असून कामाच्या प्रगतीनुसार अजुन अनुज्ञेय शासकीय अनुदान प्राप्त झाले असून कामाच्या प्रगतीनुसार मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. २.८० कोटी एवढा कर्ज निधी तातडीने मिळणे आवश्यक असताना मार्च २००२ पासून निधी प्राप्त झाला नसल्याने ५० दलली पाणी पुरवठा योजनेतील उपांगाची कामे सद्यस्थितीत बंद आहेत. याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेबरोबर वेळोवेळी बैठका झाल्या असून त्यांनी उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पुर्तता वेळोवेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करणेत आली आहे, तरी देखील निधी प्राप्त न झाल्याने अतिरिक्त ५० दलली पाणी पुरवठा योजनेच्या प्रगतीवर परिणाम झाला आहे. शहराची वाढती पाण्याची गरज, पाणीपुरवठा योजनेची सक्षमता, पाणी साठवण क्षमता व वितरण व्यवस्था या बाबी विचारात घेतल्या तर बंद असलेली उपांगे तातडीने पूर्ण होऊन कार्यान्वित होणे अत्यंत आवश्यक आहे. वारंवार पाठपुरावा करुनही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कर्जनिधी प्राप्त होत नसल्याने योजना बंद ठेवणे संयुक्तिक नसून शहरवासियांना पाणी पुरवठ्यासाठी आत्यावश्यक सेवा उपलब्ध करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला योजना पूर्ण करणेसाठी उर्वरीत आवश्यक निधी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कळविल्यानुसार झालेल्या कामाची प्रलंबित देयके अदा करणे आवश्यक आहे. करीता सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात तरतुद केलेली नसल्याने पुनर्विलोकन करुन अथवा राखीव निधीतुन अथवा अन्य उपलब्ध तरतुदीतून रु. २.८० कोटी निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यास व कामाच्या प्रगतीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उर्वरीत योजना पूर्ण करुन कार्यान्वित करणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करुन निधी अदा करणेस ही महासभा मंजूरी देत आहे.

**सूचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुधा गोयंका :-**
मॅडम, कोणता ठराव?

**ओमप्रकाश अग्रवाल / मिलन म्हात्रे :-**
हे काय चालले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
बहुमताने करायचा असेल तर करा ना.
(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
सचिव साहेब, मागच्या सभेची प्रोसिडिंग मागवा.
(सभागृहात गोंधळ)

**शिवप्रकाश भुदेका :-**
उपमहापौर वैती साहब, आपने जो रुलिंग दिया है, उसपर आप कायम रहो।

**मा. महापौर :-**
प्रोसिडिंग पुढच्या वेळी देण्यात येईल.

**चंद्रकांत मोदी :-**
भारतीय जनता पार्टी को विनंती है की, शहर के विकास के लिए निर्णय लेना है तो आप सब बैठ जाईए।

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा.

**मदन उदितनारायण सिंग :-**

भष्ट्राचारी सताधारीयोंका धिक्कार.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रकरण क्र. ४६ चा ठराव सभागृहासमोर मांडला.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४६ :-**

मिरा भाईंदर महापालिकेच्या आरोग्य केंद्राकरीता कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४६ :-**

मा. महासभा विषय क्र. ०५ ठराव क्र. ०५ दि. १९/४/२००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात

भाईंदर पूर्व २
भाईंदर पश्चिम २
उत्तन १
मिरारोड १
काशी मिरा १

व एक फिरता दवाखाना सुरु करणेसाठी व त्यासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गाची करार पध्दतीने नेमणूक करणेसाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. यात वैद्यकिय अधिकारी - ८, परिचारीका (एन.एम.) - ८, प्रसविका (ए.एन.एम.) - २१, फार्मासिस्ट कम लिपिक - ८ या पदांचा समावेश आहे. सदर पदांवर नेमणूकीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्र इच्छुक उमेदवारांना थेट मुलाखातीसाठी बोलविण्यात आले होते. या पदावर करार पध्दतीने कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या कालावधीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मा. स्थायी समिती ठराव क्र. १७९ दि. ०८/०१/२००४ अन्वये सहा महिन्यासाठी नेमणूकीस मंजूरी घेण्यात आलेली होती. सदर कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांची मुदत संपलेली असून काहींची मुदत संपत आहे. महापालिकेने सुरु केलेल्या आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असून दि. २६ व २७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीनंतर महापालिका क्षेत्रात साथीचे आजार पसरु नये म्हणून महानगरपालिकेने केलेल्या उपाययोजने अंतर्गत विविध विभागात वैद्यकीय शिबीरे आयोजित करण्यात आलेली होती. त्यावेळी सदर कर्मचाऱ्यांनी चांगले काम केलेले आहे.

आरोग्य केंद्राकरीता नेमलेल्या कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे करारपध्दतीने मासिक वेतन अदा करणेत येते.

१) वैद्यकीय अधिकारी - मासिक रु. १०,०००/-
२) परिचारीका (एन.एम.) - मासिक रु. ४,५००/-
३) फार्मासिस्ट कम लिपिक - मासिक रु. ३,५००/-
४) प्रसविका (ए.एन.एम.) - मासिक रु. ३,०००/-

महानगरपालिकेने सुरु केलेल्या आरोग्य केंद्रात नेमलेल्या कर्मचाऱ्यांची सवर्गानुसार नांवे, त्यांचा हजर दिनांक व ६ महिने पूर्ण होण्याची तारीख खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| नाव | हजर दिनांक | ६ महिने संपल्याचे मुदत दिनांक |
|---|---|---|
| डॉ. चंद्रशेखर कांबळे | ३१/०१/२००५ | ३०/७/२००५ |
| डॉ. प्रमोद पडवळ | ११/०२/२००५ | १०/८/२००५ |
| डॉ. अंजली पाटील | २४/०१/२००५ | २३/७/२००५ |
| रत्नप्रभा पिसाळ | २४/०२/२००५ | २३/८/२००५ |
| नंद किशोर लहाने | २५/०१/२००५ | २४/७/२००५ |
| डॉ. वंदना पाटील | २४/३/२००५ | २३/९/२००५ |
| डॉ. अरविंद काकडे | १०/०२/२००५ | ०९/८/२००५ |
| डॉ. बालनाथ चकोर | १७/०१/२००५ | १६/७/२००५ |
| **एन. एम.** | | |
| श्रीमती लिटा कारवालो | ३१/१/२००५ | ३०/७/२००५ |
| श्रीमती ज्योती सातवे | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती रसिका दळवी | २४/१/२००५ | २३/७/२००५ |

| नाव | हजर दिनांक | ६ महिने संपल्याचे मुदत दिनांक |
|---|---|---|
| श्रीमती मीना तेरडे | १४/१/२००५ | १३/७/२००५ |
| श्रीमती मेघना चुरी | ११/२/२००५ | १०/८/२००५ |
| श्रीमती शकुंतला देवळेकर | ३/३/२००५ | २/९/२००५ |
| श्रीमती जागृती वेताळे | ३/३/२००५ | २/९/२००५ |
| **फार्मासिस्ट कम लिपीक** | | |
| श्री. राहुल भोईर | १४/१/२००५ | १३/७/२००५ |
| श्री. सचिन करंडे | १४/२/२००५ | १३/८/२००५ |
| श्रीमती रुपाली कोलते | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्री. संजीव धुमाळे | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती वैशाली मोरे | ३०/४/२००५ | २९/१०/२००५ |
| श्री. प्रकाश थोरात | १७/३/२००५ | १६/९/२००५ |
| श्री. सुधिर पावले | १९/४/२००५ | १८/१०/२००५ |
| श्रीमती धनश्री भोईर | ३/२/२००५ | २/८/२००५ |
| श्री. योगेश शिंदे | ७/५/२००५ | ६/११/२००५ |
| **ए.एन.एम.** | | |
| श्रीमती रेश्मा शेट्टी | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती रुपाली दरेकर | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती भोंगाडे पद्‌मा | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती परीदा पठाण | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती संध्या शिंगाडे | २९/१/२००५ | २८/७/२००५ |
| श्रीमती प्रिया पागधरे | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती शितल पवार | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती सरिता ठाणकर | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती प्रमिला देसाई | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती सिमा चव्हाण | २४/१/२००५ | २३/७/२००५ |
| श्रीमती जयश्री सावंत | २९/३/२००५ | २८/९/२००५ |
| श्रीमती निलिमा मोकल | १८/३/२००५ | १७/९/२००५ |
| श्रीमती जॉयसी हॅन्ड्रीक्स | १०/३/२००५ | ९/९/२००५ |
| श्रीमती अश्वीनी पोतदार | ९/३/२००५ | ८/९/२००५ |
| श्रीमती संदेना पवार | १५/३/२००५ | १४/९/२००५ |
| श्रीमती करुणा पागधरे | २३/३/२००५ | २२/९/२००५ |
| श्रीमती सुनिता मोठे | १/४/२००५ | ३१/९/२००५ |
| श्रीमती उर्मिला घेगड | २०/४/२००५ | १९/१०/२००५ |
| श्रीमती आरती गरव | १/४/२००५ | ३१/९/२००५ |

वरील सर्व कर्मचाऱ्यांची मुदत संपलेल्या तारखेपासून एक दिवसाची सेवा खंडीत करुन पुढील सहा महिन्यासाठी नेमणुकीस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे.

**सूचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४७ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

प्रकरण क्र. ४७ चा ठराव सभागृहासमोर मांडला.

**धृवकिशोर पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४७ :-**

नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर स्वागत कमानी उभारणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे ७९०४० चौ. कि.मी. एवढे असून शहर उत्तन ते काजुपाडा व दहिसर चेकनाका ते वर्सोवा ब्रीज असे पसरलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर दहिसर चेकनाका ते वर्सोवा ब्रीज तसेच ठाणे-घोडबंदर रस्त्यावर काजूपाडा येथुन प्रवेश होतो. महाराष्ट्रातील इतर महापालिकेत अशा प्रकारे प्रवेशद्वारावर स्वागत कमानी उभारलेल्या आहेत. अशा कमानी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर उभारल्यास महापालिकेच्या शोभेत भर पडणार आहे. प्रशासनाने स्वागत कमानी बांधण्यास सक्षम विभागाच्या परवानग्या घेण्यांत याव्यात. तसेच अर्थसंकल्पात या करीता पुरेशी तरतुद करण्यात यावी. प्रस्तावित तीन ठिकाणी स्वागत कमानी उभारण्यास तांत्रीक सल्लागाराची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत नकाशे, डीझाईन व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यास येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्यांत येत आहे.

**सूचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**तुळशिदास म्हात्रे :-**

सभेच्या शासनाप्रमाणे ह्या बी.जे.पी. वाल्यांनी गोंधळ मांडल्यामुळे हे सर्व ठराव झालेले आहेत.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४८ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबा, ज चे प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत ते पुढच्या सभेमध्ये घेण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४८ :-**

सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंह चौहान यांचे दिनांक १३/०९/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर परिसरातील तळमजला व चाळींमध्ये राहणाऱ्यांच्या घरामध्ये २६ व २७ तारखेस अतिवृष्टीचे पाणी घुसल्याने झालेल्या नुकसानापोटी १ वर्षाचा घरपट्टी कर माफ करणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ४९ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगागधर अग्रवाल (गाडोदिया) यांचे दिनांक १६/०९/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत महानगरपालिकेचा कत्तलखाना उभारणेस शासकिय जागा उपलब्ध करुन घेणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५० :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन कृष्णा पाटील यांचे दिनांक १६/०९/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - पाण्याचा निचरा बरोबर होत नसल्याने नागरीकांच्या आरोग्यास धोका उद्‌भवत असल्याने त्याबाबत प्रस्ताव.

**ठराव क्र. ४८ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५१ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५१ :-**

सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस यांचे दिनांक १६/०९/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मनपाने ठरवून दिलेल्या मुदतीत कर भरणाऱ्या मालमत्ता कर धारकास अपघात विमा संरक्षण योजना लागु करणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५२ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५२ :-**

सन्मा. सदस्य श्री. आसिफ शेख यांचे दिनांक १६/०९/२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर नागरीकांना तहसिलदार कार्यालयामार्फत देण्यात येणारे विविध दाखले मिरा भाईंदर मध्येच मिळणेसाठी नगरभवन येथील तलाठी कार्यालयात तहसिलदार कार्यालयामार्फत एक खिडकी योजना करण्यास संमती मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :-**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**